म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २५९८
IRBK-0102598
IRBK-0102598
IRBK-0102598

# दुसरा पेशवा

चार अंकी ऐतिहासिक नाटक


ग्रंथालय शाखा.
अ. क्र. २५८
दा. क्र.
ता. ०१/८७
कि.


लेखक :

**वि. वा. शिरवाडकर**

IRBK-0102598


देशमुख आणि कंपनी, पुणें

एप्रिल १९४७

किंमत २ रुपये

सर्वाधिकार लेखकाच्या स्वाधीन
चित्रकार : श्री. दीनानाथ दलाल

★

प्रकाशक : रा. ज. देशमुख, शनिवार पेठ, पुणें
मुद्रक : रमाकांत वेलदे, सुदर्शन प्रेस, नासिक

# दूसरा पेशवा

एक ऐतिहासिक नाटक

# समर्पण

गडकरी आणि खाडीलकर

यांच्या

नाट्यप्रतिभेस

आ. ग्रं. ५१४ २५/३/५२

व

# : १ :

[ पडदा वरती जातो तेव्हां घंटा, तुतारी, शिंगें वगैरे वाद्यांचे संमिश्र आवाज ऐकूं येतात.

हा आवाज सुरवातीला जास्त ( जवळपास होत असल्याप्रमाणें ) आणि पडदा उघडल्यानंतर कमी ( दूर होत असल्याप्रमाणें ) ऐकूं येतो.

पडदा उघडल्यावर सातारा येथील छत्रपतींच्या राजवाड्यांतील एक महाल—मसलतखाना दिसूं लागतो. महालामध्यें समोर मध्यभागीं एक तक्तवजा उच्चासन असून त्याच्या दोन्हीं बाजूला उंची कोच ठेवलेले आहेत. मुख्यासनाच्या मागच्या बाजूला एक प्रशस्त खिडकी असून तिच्यावर झालरीचा मखमली पडदा लावलेला आहे. सकाळची वेळ दर्शविणारा सूर्यप्रकाश खिडकींतून दिसत आहे. घंटा, तुतारी वगैरे वाद्यांचा आवाजहि खिडकीच्या दिशेनेंच येत असतो.

कोचांवरती श्रीपतराव प्रतिनिधी, सुमंत, सरलष्कर हैबतराव, चिटणीस, मुतालिक पुरंदरे ही खाशीं मंडळी बसली आहेत. शाहू महाराजांची भव्य मूर्ति एका छोट्या, झुबकेदार कुत्र्याला हातावर घेऊन मधल्या आसनावर आरुढ झालेली आहे. शाहूची शरीरयष्टी धिप्पाड असली तरी त्याच्या मुद्रेवर सौजन्य आणि शांति हेच भाव विशेषत्वानें दिसून येतात. एक लांब कफनीवजा रेशमी अंगरखा त्यानें पेहेरला असून डोक्यावरचे केस खांद्यावर पडण्याइतके वाढलेले आहेत. बहुतेकांचें लक्ष बाहेरील आवाजाकडे आणि शाहूचें लक्ष बाह्यात्कारीं तरी कुत्र्याकडे लागलेलें असतें. कांहीं तरी बोलणें सुरू होऊन त्यांत खंड पडलेला आहे. ]

**चिटणीस :** [ उल्हासानें ] पंतप्रधान बाजीराव साहेबांची स्वारी सा...
ऱ्याच्या वेशींतून पुढें आली आहे !

**प्रतिनिधी :** होय. बाजीराव पेशव्यांचेंच आगमन हें. छत्रपतींच्या राजधानींत छत्रपतींची स्वारीसुद्धां इतकी गाजायची नाहीं, इतकी गर्जायची नाहीं !

**शाहू :** [ शाहू संथपणें एकेक शब्दावर थांबत बोलत असतो. बोलतांना श्रोत्यांकडे त्याचें फारसें लक्ष नसतें. बोलण्यापेक्षां ऐकण्याचा आनंद त्याला अधिक आहे, जेव्हां तो बोलतो तेव्हां बोलण्यावांचून गत्यंतरच नसतें. ] छत्रपतींना गाजायची अथवा गर्जायची काय आवश्यकता ? ( उठून खिडकीजवळ जातो आणि सस्मित चेहऱ्यानें बाहेर बघतो )... लोकांवर आमचं राज्य आहे पण लोकांच्या अंतःकरणावर राज्य मात्र बाजीरावाचं आहे. शहराच्या साऱ्या पेठा नव्या वधूसारख्या शृंगारून बसल्या आहेत...रस्त्यांतून, घरांच्या सज्ज्यांतून, घरांच्या कौलारावर सुद्धां हजारों लोक पंतप्रधानांच्या दर्शनासाठीं तिष्ठत उभे आहेत ! [ खिडकीवरचा पडदा सारून मागें येतो. बाहेरील आवाज ऐकूं येईनासा होतो ] मुतालिक, बाजीराव इकडेच येणार आहेत ना ? (आसनावर बसतो.)

**मुतालिक :** प्रथम नगरदेवतेचं दर्शन घेऊन, प्रधानांची स्वारी सरकारचा आशिर्वाद घेण्यासाठीं येणार आहे. फार वेळ पेशव्यांना राजधानींत राहतां येणार नाहीं. उत्तरेकडच्या स्वारीचा मुहूर्त करून, दसऱ्याचा दिवस साधायचा आहे त्यांना.

**सुमंत :** पुण्यांत वेगळी राजधानी केल्यापासून साताऱ्यांत राहायला पेशव्यांना वेळच मिळत नाहीं !

**प्रतिनिधी :** महाराज, आज विजयादशमीचा मंगल दिवस आहे. आगळिकीची भाषा बोलून छत्रपतींचं मन पेशव्यांविषयीं कलुषित करावं असा माझा हेतू नाहीं. छत्रपतींच्या तख्ताशेजारी, पहिल्या स्थानावर बसण्याचा सन्मान प्रतिनिधींना लाभलेला आहे. त्यांना पेशव्यांच्या महतीचा मत्सर वाटत नाहीं. पण या सन्मानाच्या जागेची जबाबदारी, महाराज, मला ओळखली पाहिजे, पाळली पाहिजे. पेशव्यांच्या मोठेपणाचा मला मत्स...

वाटत नाहीं. त्याप्रमाणें पेशव्यांच्या मोठेपणाची मला भीतीहि वाटत नाहीं. आणि म्हणूनच मी महाराजांना स्पष्टपणानं सांगतों, सांगणं हें माझं कर्तव्य आहे म्हणून सांगतों, कीं पेशव्यांच्या उद्योगाला छत्रपतींनीं पायबंद घातलाच पाहिजे. आजची ही संधी गेली तर पेशवे पुन्हां वर्षभर समोर यायचे नाहींत !

**मुतालिक** : पेशव्यांच्या उद्योगाला, म्हणजे पेशव्यांच्या पराक्रमाला ?

**प्रतिनिधी** : बाजारबुणग्यांच्या सेना उभ्या करून उभीं शहरं जमीनदोस्त करीत जाणं, या आडदांड उद्योगाला मुतालिकसाहेब, आपण पराक्रम म्हणत असाल तर आपले शब्दार्थ मला संमत नाहींत इतकंच मी म्हणेन ! पराक्रम ! पराक्रम ! पराक्रम !......पराक्रमाचं वरदान ईश्वरानं कांहीं श्रीवर्धनकर भटांच्याच घराण्याला केलेलं नाहीं !

**सरलष्कर** : शिवछत्रपतींच्या दौलतीमध्यें शौर्याची आयात जंजिऱ्याकडूनच झाली, असं कोणी समजत असेल, तर तें साफ खोटं आहे !

**शाहू** : प्रतिनिधी, सरलष्कर, सुमंत, आपल्यासारख्या संभावितांचा सल्ला आम्ही मानींत नाहीं असं कधींही होणार नाहीं. आपण बोलतां आहांत तें गादीच्या हिताकरितां यांतहि आम्हांला तिळमात्र शंका नाहीं. पण आम्हांला वाटतं, आपणां सर्वांचा थोडा गैरसमज होत आहे. आपल्या शब्दांत थोडा दुराग्रह दिसत आहे. कोल्हापूरकरांना पंखाखालीं घेऊन, निजामानें स्वराज्यावर केलेल्या स्वारीची धूळ अद्याप खालीं बसलेली नाहीं. बाजीराव आणि चिमाजी आप्पा यांनी अपार मर्दुमकी गाजवून निजामाला त्याच्या तोफखान्यासह त्या प्रसंगीं गारद केला नसतां तर आजच्या छत्रपतींना जन्माचे बंदीवान होऊन एखाद्या किल्ल्यांत खितपत पडावं लागलं असतं ! त्या दावानलांतून आम्हीं निभावून गेलों, तें पेशव्यांच्या राजनिष्ठेमुळेंच नव्हे काय ?

**सुमंत** : पंतप्रधानांची राजनिष्ठा नेहमीं राजासाठींच असतें असें नाहीं. त्यांत स्वतःच्या कल्याणाचीहि चिंता असूं शकते !

**शाहू** : प्रामाणिक माणसानं, प्रत्यक्ष पुरावा दिसेपर्यंत इतरांचा प्रामाणिकपणाहि गृहित धरून चालायला पाहिजे.

**प्रतिनिधी** : महाराज, माफ करा, आपण सांगतां या गोष्टीला साधुत्व म्हणत असतील; राजकारण म्हणत नाहींत! राजकारणांत कांहीं गो. दूरदृष्टीनें हेराव्या लागतात, अनिष्टाचीं पावलं कानोसा घेऊन अगोदर ऐकावीं लागतात. प्रत्यक्ष पुरावा पदरांत पडण्याची प्रतीक्षा करूं लागलों तर मान तुटून पडल्याविना कारस्थानाची सत्यता सिद्ध व्हायचीच नाहीं!

**चिटणीस** : कसलं कारस्थान? प्रतिनिधींसारख्या जबाबदार माणसांनीं, कटु शब्दांचा असा निराधार उपयोग करावा ही खेदाची गोष्ट आहे!

**प्रतिनिधी** : निराधार? बाजीराव पेशव्याची प्रत्येक कृति या विधानाला आधारभूत आहे! स्वामीमहाराजांच्या सेवेचं निमित्त करून, दौलतीच्या जुन्या, अनुभवी मानकऱ्यांना हतप्रभ करण्याचं कारस्थान, शनिवार वाड्याबरोबर उभं राहिलं नाहीं अशी ग्वाही, चिटणीस, आपण द्याल काय? कोणत्या जुन्या, नामांकित घराण्याचा बोज पंतप्रधानांनीं राखला आहे? सेनापती दाभाड्यांना गुजराथच्या चतुःसीमेंत बद्ध करून त्यांचं समाधान झालं नाहीं म्हणून गुजराथच्या भूमीवरहि पेशव्यांच्या फौजा मस्ती करूं लागल्या! निंबाळकरांचं सरलष्कर हें अधिकारपद नांवापुरतंच शिल्लक राहिलं. या सुमंतांच्या शब्दाशिवाय परराष्ट्रीय राजकारणाचं पान हलूं नये अशी यांच्या हुद्द्याची थोरवी आहे. पण उत्तरेकडील, रजपुतांकडील किंवा निजामाकडील मसलती करतांना, बाजीराव अथवा चिमाजीपंत सुमंतांना एका शब्दानं तरी विचारतात काय? निजामाकडे सुमंत वर्चस्व ठेवून होते, तेंहि पेशव्यांना सहन झालं नाहीं. जी कथा सेनापतींची, सरलष्करांची आणि सुमंतांची, तीच भोंसल्यांची, आंग्र्यांची आणि गायकवाडांची! छत्रपतींच्या दौलतीचे जुने आधार नाहींसे करायचे आणि पेशव्यांच्या दौलतीसाठीं नवे आधार उभे करायचे या एका सूत्रावर पुण्याचं सारं राजकारण चाललेलं आहे. चिटणीस, याला मी कारस्थानच म्हणतों!

**चिटणीस** : चिटणिसांचं घराणं कांहीं पेशव्यांच्या कृपाकटाक्षाखालीं उदयाला आलेलं नाहीं. संभाजीराजांच्या अमदानीपासून चिटणिसांचीं माणसं

सतीचं वाण घेऊन आघाडीवर आहेत. दौलतीच्या जुन्या, मातबर सरदार घराण्यांत आम्हां चिटणिसांची गणना होते. आणि प्रतिनिधी, या परंपरेच्या अधिकारानं मी सांगतों कीं पेशव्यांच्या राजकारणाचा आपण लावलेला हा अन्वय खरा नाहीं! बाळाजी विश्वनाथांनीं ऐन संकटकाळीं स्वामींची सेवाचाकरी अत्यंत दक्षतेनें केली—

**शाहू** : बाळाजी विश्वनाथ! असला थोर कारभारी गवसायला पूर्वजन्मींची पुण्याई लागते. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठींच आम्ही बाजीरावाला पेशवेपद दिलं.

**चिटणीस** : आणि बाजीराव आपल्या वडलांचं अपूर्ण राहिलेलं कार्यच पुरं करीत आहेत. स्वामींच्या पुण्यप्रतापानं एखाद्या दिग्विजयी वीराप्रमाणें साऱ्या भरतखंडांत मराठ्यांचा जरीपटका मिरवीत आहेत, हिंदुपदपाद-शाहीचा पाया घालीत आहेत! प्रतिनिधी, इतिहासांत नमूद झालेल्या कर्तबगारीची प्रशंसा शाळकरी मुलंसुद्धा करतील; डोळ्यासमोर, वर्तमान-काळांत घडणाऱ्या इतिहासाचं आणि कर्तबगारीचं आकलन होणंच फार दुर्घट असतं!

**सुमंत** : पेशव्यांची कर्तबगारी कोण नाकारतं? पेशवे कर्तबगार नसते तर त्यांच्या भल्याबुऱ्या राजकारणाची चर्चा करण्याचा प्रसंगच आला नसता! पेशवे कर्तबगार आहेत परंतु त्यांची ही कर्तबगारी छत्रपतींच्या दौलतीला लाभदायक नाहीं हाच आमचा आक्षेप आहे.

**चिटणीस** : जुन्या सरदारांचा बोज पेशवे राखीत नाहींत असं आपण म्हणतां. जुन्या मानकऱ्यांना हतप्रभ करण्यासाठीं पंतप्रधान नवे मानकरी निर्माण करीत आहेत असा आपला आक्षेप आहे. मी म्हणतों, जो स्वयंप्रकाशी आहे, त्याला हतप्रभ करण्याचं सामर्थ्य कोणांतहि असत नाहीं! सूर्य उमाठ्यावर आला कीं चंद्राला पंडुरोगानं बिछान्यावर पडलेल्या रुग्णाइताची कळा येते. यांत कांहीं सूर्याचा दोष आहे का?

**प्रतिनिधी** : चिटणीसांचे पाय पृथ्वीवर असले तरी त्यांची नजर नक्षत्रांच्या जगांत विलास करते आहे. त्यामुळें जमिनीवर, डोळ्यासमोर घडणाऱ्या घटना त्यांना दिसूं शकत नाहींत. दूरदृष्टी मर्यादित असली तर हिताची

असते. ती फारच दूर म्हणजे चंद्रसूर्यापर्यंत जाऊं लागली म्हणजे पृथ्वीवरच्या व्यवहारांत थोडीशी पायघसर होणारच !

**सरलष्कर** : ब्राह्मणांना दोन जन्माप्रमाणें दोन जिभाहि असल्या पाहिजेत; इतके अलंकार एकुलत्या एक जिभेला कांहीं झेंपायचे नाहींत.!

**शाहू** : प्रतिनिधी, बाजीराव वृत्तीनें थोडेसे हूड आहेत हें आम्हालाहि मान्य आहे. परंतु ते हूड, बेदरकार आहेत म्हणूनच मोंगलांसारख्या धटिंगणांचीं मनगटं ते धरूं शकतात. बालपणापासून दुर्दैवानें आमची पारध केल्यामुळें म्हणा, कीं पादशहांच्या अंतःपुरांतील संवय म्हणून म्हणा, आम्हाला दूर राहून विश्रांती घेण्याची आवश्यकता वाटते. पण आमची विश्रांती आंधळी नाहीं ! राज्यकारभारावर आणि कारभाऱ्यांच्या राजकारणावर आमची दृष्टि आहे. आम्हालाहि कधीं कधीं वाटतं कीं बाजीराव उद्दामपणानं वागत आहेत, दौलतीला दुखापत करीत करीत आहेत—

[ हुजऱ्या प्रवेश करतो ]

**हुजऱ्या** : श्रीमंत पंतप्रधान बाजीरावसाहेब पेशवे, सरदार राणोजी शिंदे, सरदार मल्हाराव होळकर !

[ हुजऱ्या जातो आणि बाजीराव, राणोजी व मल्हारराव यांच्यासह प्रवेश करतो. तिशिच्या भरांत असलेला बाजीराव उंच, देखणा आणि पिळदार आहे. त्याचा वेष पेशवाई पद्धतीचा साधा आणि पांढराशुभ्र आहे. प्रथमदर्शनीं आदर आणि दरारा निर्माण करण्याचें सामर्थ्य त्याच्या व्यक्तित्वांत आहे. बाजीरावाची बोलण्याची पद्धती वक्तृत्वपूर्ण असून शब्दांनींसुद्धां आपण इतरांना जिंकलें पाहिजे ही भावना तींत दिसते. त्याच्या दोन्ही बाजूला असलेले शिंदे होळकर हे सरदार त्याच्याच वयाचे आहेत. आंत येतांच प्रथम बाजीराव आणि नंतर शिंदे-होळकर छत्रपतीला मुजरे करतात. ]

**शाहू** : [ किंचित् उपरोधानें ] आपल्या राजधानींतून आमच्या राजधानींत आज कशाकरतां आगमन केलंत ?

**बाजीराव :** महाराष्ट्राला एकच राजा आहे आणि एकच राजधानी आहे ! विजयादशमीच्या मुहूर्ताला स्वामींच्या पायाचं दर्शन आणि स्वामींचे आशीर्वाद घेण्यासाठीं आलों आहे.

**शाहू :** बाजीराव पेशव्यांना आमच्या आशीर्वादांची काय आवश्यकता ? त्यांच्या म्यानांतली समशेर इतकी शिकंदर आहे, कीं वडीलधाऱ्यांच्या आशीर्वादाशिवायहि ते पांची खंड पृथ्वि पादाक्रांत करतील !

**बाजीराव :** महाराज, सेवकाकडून कांहीं अपराध घडला असेल तर स्पष्ट-पणानं बोलण्याची कृपा करावी. कोठलंही शासन स्वीकारायला बाजीराव सिद्ध आहे. पण करवतीवर किनखाप चढवून, चाकराचं अंतःकरण असं कापूं नये ! बाजीराव पेशव्याची समशेर शिकंदर आहे, होय आहे ! पण मराठ्यांच्या वैऱ्यांसाठींच ती सतत म्यानांतून बाहेर पडत आली आहे, आणि मराठ्यांच्या वैऱ्यांसाठींच ती म्यानांतून बाहेर पडेल !

**प्रतिनिधी :** सगळं अंतर्बाह्य जग सांप्रत मराठ्यांच्या वैऱ्यांनीं व्यापून गेलं आहे असं दिसतं ! पूर्वींच्या काळीं मराठ्यांचे वैरी महाराष्ट्राच्या बाहेर असत, आज ते महाराष्ट्रांतच फार निपजूं लागले आहेत !

**बाजीराव :** वैरी हा परक्या धर्माचा आणि परक्या देशाचाच असतो, ही कल्पना प्रतिनिधी, पुरातन असली तरी खरी नाहीं. वैरी स्वतःच्या धर्मांत, स्वतःच्या देशांत नव्हे स्वतःच्या घरांतसुद्धां असूं शकतात ! घरांतल्या शत्रूंची ही दुर्दैवी परंपरा पूर्वकालीं महाराष्ट्रांत होती आणि आजहि आहे. शिवाजी महाराज एवढे सांबाचे अवतार पण त्यांनाहि परकीयांप्रमाणें स्वकीयांशींहि लढावं लागलं. दुसऱ्या छत्रपतींचा विश्वासघात स्वकीयांनींच केला आणि आज चौथ्या छत्रपतींच्या राज्यांतहि कांहीं स्वकीयच दौल-तीचं वैर साधीत आहेत !

**प्रतिनिधी :** होय होय ! आज महाराष्ट्रांतली अशेष राजनिष्ठा मुळा-मुठेच्या तीरावर राजवाडा बांधून राहिली आहे !

**बाजी** स्वारीचं प्रत्येक भाग्यवंतांची राजनिष्ठा छत्रपतींच्या शेजारीं बसून आशीर्वाद घेण्यासाठींहि करूं शकते ! पण इतरांचं नशीब इतकं बलवत्तर तेजोभंग करणं हें म त्यांच्या स्वामिनिष्ठेला घोड्यावर स्वार होऊन, डोंगर-

माथीं तुडवीत, मुळामुठेच्यांच नव्हे तर गंगासिंधूच्या पैलथडीला जाऊन मराठ्यांचा झेंडा उभारावा लागतो.

**शाहू** : [ किंचित् हंसून ] पंतप्रधानांनी घरीं बसणाऱ्यांचा असा अधिक्षेप करूं नये ! कारण महाराष्ट्राचे आजचे छत्रपतीसुद्धां घरींच बसतात असा–लोकप्रवाद आहे !

**बाजीराव** : [ स्मित करून ] मराठी मुलखाची सरहद्द ओलांडण्याचं छत्रपतींना काय कारण ? आमच्या, आमच्या सैनिकांच्या रूपानें स्वामींचे सहस्रावधी हात लाहोर पेशावरपर्यंत पसरले आहेत, प्रत्यहीं पसरत आहेत ! देवानं देवालयाच्या गाभाऱ्यांतच रहावं. आम्ही आणि आमचे साहसी मानकरी—

**सरलष्कर** : [ उपहासानें ] मानकरी ? धनगर, गुराखी, पाणके आणि शागीर्द ! !

**बाजीराव** : [ त्वेषानें ] होय, धनगर, गुराखी, पाणके आणि शागीर्द ! सरलष्कर, सह्याद्रि पर्वताचीं हीं सारीं पठारं धनगरांनीं, गुराख्यांनीं, आणि शागीर्दांनीं व्यापलेलीं आहेत ! हा महाराष्ट्र देश धनगर गुराख्यांचा आहे म्हणूनच उत्तरेकडच्या अहंकारी वीरांना तो शेळ्यांप्रमाणें आणि गाईगुरांप्रमाणें हाकारूं शकतो. या धनगर गुराख्यांनीं या देशाचं महाराष्ट्र हें नांव सार्थ केलं आहे ! मराठा या तीन अक्षरांत प्रचंड दरारा निर्माण केला आहे ! हे धनगर, गुराखी आणि शागीर्द हातांत समशेरी आणि भाले घेऊन सह्याद्रीच्या गुहांतून बाहेर पडले म्हणजे दिल्ली लाहोरचे शहरकोट भीतीनें कापूं लागतात आणि काबूल कंदाहारचीं सिंहासनं भयभीत होतात ! धनगर गुराखी म्हणून तुम्ही उपहासानं यांची हेटाळणी करा, पण माझ्या दोन्ही हाताला असलेले हे वाघसिंह धनगर गुराखी आहेत याचा मला अभिमान वाटतो. पंतप्रधान बाजीराव पेशवा हा स्वतः धनगर आहे, स्वतः गुराखी आहे, स्वतः शागीर्द आहे !

**प्रतिनिधी** : पंतप्रधान म्हणतात तें खरंच आहे ! बाहेरून ज्या वार्ता आमच्या कानांवर येतात त्या लक्षांत घेतल्या तर बाजीरावसाहेबांनीं आपल्या

ब्राह्मण्याला, आपल्या ज्ञातिधर्माला तीलांजली देण्याचा संकल्प केला आहे असंच दिसतं !

**बाजीराव** : राहत्या घराचे उंबरठे ज्यांना ओलांडायचे नाहींत त्यांनीं कर्मकांडाचे, धर्माचे देव्हारे सुखेनैव माजवावेत ! बाजीरावाच्या धर्माचं नांव मराठा आहे, बाजीरावांच्या जातीचं नांव मराठा आहे ! प्रतिनिधी, शिवाजी-महाराजांनीं केवळ एक राज्य स्थापन केलं नाहीं तर एक नवा धर्महि स्थापन केला. या जातिभेदातीत धर्माचा महाराष्ट्रानं स्वीकार केला म्हणूनच पर-स्थांच्या जुलमी राजवटीवर तो प्रहार करूं शकतो.

**सुमंत** : या अकारण प्रहार करण्याच्या पद्धतीलाच आम्ही मस्तीचं राजकारण म्हणतों !

**बाजीराव** : आपण ज्याला मस्तीचं राजकारण म्हणतां त्याला आम्ही मराठ्यांचं राजकारण म्हणतों ! वेशीवर शत्रू आला म्हणजे पिवळीं वस्त्रं परिधान करून जोहार करण्यासाठीं बाहेर पडायचं या राजस्तानी राजकारणा-नंच भारताची आजवर हानी केली आहे. शत्रूला स्वतःच्या दाराशीं नव्हे तर त्याच्या राहत्या घरांतच पादाक्रांत केला पाहिजे. मराठ्यांचं राजकारण आज महाराष्ट्राच्या सरहद्दीबाहेर चालतं तें याच धोरणानें !

**प्रतिनिधी** : हे शब्द फार श्रुतिरंजक आहेत ! परंतु या धोरणामुळेंच उत्तर-दक्षिणेंतील सर्व राजसत्ता आज छत्रपतींच्याविरुद्ध एकवटूं लागल्या आहेत. माळव्यांतील मोगल सुभेदाराशीं समजुतीनें वाटाघाटी केल्या असत्या तर तें प्रकरण इतकें विकोपाला गेलें असतें काय ?

**बाजीराव** : कोठलंहि प्रकरण विकोपाला जाण्याची धास्ती आजवर बाजीरावानं बाळगलेली नाहीं ! शब्दाला उत्तर शब्दानं देतां येतं, पण समशेरीला उत्तर समशेरीनंच द्यायला पाहिजे ! वाटाघाटींचा वृद्ध मार्ग मृतप्राय झाल्यावरच माळव्यांत चिमाजी आप्पानें तरवार उपसली आहे !

**चिटणीस** : महाराज, आज पंतप्रधान विजयादशमीच्या मुहूर्तानें उत्तरे-कडच्या स्वारीचं प्रस्थान ठेवणार आहेत, स्वारीवर जाण्यापूर्वी स्वामींचा आशीर्वाद घेण्यासाठीं ते आलेले असतां अशा अनुचित शब्दांनीं त्यांचा तेजोभंग करणं हें माझ्या अल्पमतीला योग्य वाटत नाहीं !

**शाहू** : तुम्ही म्हणतां तें खरं आहे चिटणीस. बाजीराव, आम्हीं बोललों तें केवळ विनोदानं, तुमची परीक्षा पाहण्यासाठीं. तुमच्याबद्दल आम्हाला तिळमात्र अनादर नाहीं. तुमच्या बालवयापासून आम्हीं तुम्हांला पुत्रासारखें मानीत आलों आहोंत. आमच्या अंतःकरणांतली ती माया आजहि अखंड आहे. ही कीलकसंवत्सराची विजयादशमी तुमच्या पराक्रमानं दौलतीला लाभदायक आणि तुम्हाला कीर्तिदायक होवो असा आमचा अंतःकरणपूर्वक आशीर्वाद आहे.

**बाजीराव** : स्वामींचा आशीर्वाद हेंच सेवकाचं सामर्थ्य आहे.

[ मुजरा करतो ]

## प्रवेश दुसरा

[ पुण्यांतील एका देवालयाचें पुढील दालन. देवालयाचा मालक आपल्या तळहाताचें निरीक्षण करीत बाहेरच्या बाजूनें प्रवेश करतो. त्याचें नांव विसाजी. ]

**विसाजी** : नवीन रेषा उमटली! अगदीं ढळढळीत नवीन रेषा उमटली! तुम्हांला हा योग आहे म्हणून लहानपणींच एका ज्योतिषानं सांगितलं होतं. पण आतांपर्यंत ही रेषाच उमटली नाहीं. आणि म्हणून तो योगहि आला नाहीं! पण आतां उमटली–एखाद्या सडकेसारखी अगदीं स्पष्ट उमटली!

[ कावेरी आंतून येते. ]

**कावेरी** : कुठं जायची आहे ही नवी सडक? पुण्याच्या भर पेठेंतून तळहाताकडे पहात वेड्यासारखें बडबडत आलांत–कांहीं जनाची नाहीं पण मनाची तरी?

**विसाजी** : रेषाच उमटली! त्याला कोण काय करणार? अहाहा, काय सुंदर रेषा आहे! एखाद्या चंद्रमुखीच्या केशकलापांतील भांगाच्या रेषे-इतकीच ही सुंदर आहे! ही जितकी सुंदर तितकीच तीहि सुंदर असणार!

**कावेरी** : कसला योग उमटला आहे हा?

**विसाजी :** कसला योग ? अजून तुझ्या ध्यानांत आलं नाहीं ? अग वेडे, हा तृतीय लग्नाचा योग आहे ! तिसऱ्या बायकोची रेषा आहे ही !

**कावेरी :** तिसऱ्या बायकोची रेषा ? आणि हें खुशाल दुसऱ्या बायकोच्या समोर सांगतां ?

**विसाजी :** दुसऱ्या बायकोच्याच काय, पहिल्या बायकोचं पिशाच्च समोर येऊन उभं राहिलं तरी त्याच्यासमोरसुद्धां सांगेन ! सत्याला कोणाच्या बायकोची भीति आहे ! या रेषेचं बळ पाठीशी असतांना साऱ्या जगाला जाहीर करायला मला दिक्कत वाटायची नाहीं ! आतां खुद्द चिमाजी अप्पा किंवा बाजीराव जरी --

**कावेरी :** कशाला त्या थोरामोठ्यांचीं नांवं घेतां ? त्यांच्याशीं प्रत्यक्ष गांठ पडली कीं साता जन्माच्या अजागळासारखे--

**विसाजी :** आणखी कांहीं दिवस थांब तूं ! तीहि रेषा उमटायची आहे. लहानपणीं त्या ज्योतिषानं हेंहि सांगितलं होतं कीं छत्रपतींच्या दरबारांत पहिल्या जागेवर बसण्याचा योग तुम्हांला आहे. आतां दरबारांत पहिल्या जागा दोन आहेत. एक प्रतिनिधींची, दुसरी पेशव्यांची. प्रतिनिधी आपलेच आहेत. तेव्हां त्यांची जागा हिरावून घेण्यांत अर्थ नाहीं. परंतु पेशव्यांची जागा मात्र मला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. फक्त ती रेषा मात्र एकदां उमटली पाहिजे ! मग दाखवतो या श्रीवर्धनच्या कोंकणस्थांना !

**कावेरी :** देवासमोर घंटा बडवून हाताला वळखणी पडतात अन् म्हणे रेषा उमटल्या !

**विसाजी :** देवासमोर घंटा बडवतों त्याचंहि कारण या हातावरच आहे ! पण आतां ईश्वरसेवेची रेषा अस्पष्ट व्हायला लागली असून राजसेवेची रेषा मात्र बुरख्यांतून बाहेर येणाऱ्या बाईसारखी हलके हलके स्पष्ट होऊं लागली आहे !

**कावेरी :** तळहातावरच्या रेघोट्यावर अशी पेशवाई मिळत असती तर या पुणें शहरांत एकहि शागीर्द शिल्लक राहिला नसता ! त्यांच्या हातांवर सगळ्या रेषाच रेषा !

**विसाजी** : या रेषांची अशी थट्टा करूं नकोस. दैवाच्या पाऊलवाटा आहेत या ! दैव हें माणसाच्या कर्तृत्वापेक्षांच नव्हे तर खुद्द देवापेक्षांसुद्धां एका मात्रेनें अधिक आहे ! त्याच्यापुढें कोणाचीच मात्रा चालत नाहीं !

**कावेरी** : बाजीरावसाहेब कांहीं हातावरच्या रेषा आणि कुंडलींतले ग्रह पाहून लढाया मारीत नाहींत ! दिल्लीच्या सरदारांना धूळ चारून बाजीरावांनीं छत्रसाल राजाचं गजेंद्रासारखं संरक्षण केलं ! ही वार्ता पुण्यांत आल्यापासून केवढा जयघोष चालला आहे त्यांच्या पराक्रमाचा ! त्यांच्या लष्करांत बारगीर व्हायची तरी तुमची लायकी आहे का ?

**विसाजी** : [लायकी ही जरा अंतरावरून समजणारी गोष्ट आहे. नवऱ्याची लायकी त्याच्या बायकोला कधींच कळत नाहीं. जगाच्या इतिहासांत तसा दाखलाच नाहीं. आणि पराक्रम, 'पराक्रम काय घेऊन बसलीस ? आम्हीही पराक्रम करूं. ! पण तशी वेळ आली पाहिजे ! ती वेळ येऊं दे, पराक्रमाची ती रेषा हातावर उमटूं दे आणि आपल्याला झेपेल असा शत्रू समोर येऊं दे, मग बघशील माझा पराक्रम !] Dramatic

**कावेरी** : इतकं सारं झाल्यावर तुम्हींच कशाला, मीसुद्धां स्वतः पराक्रम करीन ! आणि तोहि तुमच्यापेक्षां कांकणभर जास्तच करीन ! म्हणे पराक्रम करणार ! तुमच्या घराण्यांतल्या तीन पिढ्या देवळाच्या गाभाऱ्यांतून बाहेर पडल्या नाहींत—

**विसाजी** : घराण्याचं म्हणशील तर पेशवाईचं पद आमच्याचकडे यायला हवं ! आम्हीं आज इंगळे असलों तरी मूळचे पिंगळेच ! शिवाजीचा पहिला पंतप्रधान हा एक पिंगळाच होता; पुढें पंतप्रधानकी गेल्यावर उपनांवांतील 'प' चा लोप झाला आणि पिंगळ्यांचे इंगळे झाले. पण आतां हा विसाजी इंगळे पंतप्रधान होणार आणि पुन्हां पिंगळेहि होणार ! खोटं वाटतं तुला ? ही पहा राजसेवेची रेषा—

**कावेरी** : तुमच्या सगळ्या रेषा ठाऊक आहेत मला ! आतां चिमाजी आप्पा काशीबाईसाहेबांना घेऊन देवदर्शनाला यायचे आहेत. नीट तयारींत रहा. अन् ती कुठली नवी रेषा उमटली आहे तिचं पुन्हां नांव काढाल तर पहा !

**विसाजी :** नांव ! आतां या रेषेचा आदेश पाळण्यावांचून गत्यंतरच नाहीं !

**कावेरी :** मी जिवंत असतांना तुम्ही तिसरं लग्न करणार ?

**विसाजी :** मला काय हौस आहे तिसरं लग्न करायची ? दोन बोहलीं चढून माझे पाय थकून गेले आहेत. आतां या उतारवयांत तिसऱ्या बोहल्यावर चढायचं म्हणजे डोंगरावरच चढण्यासारखं आहे ! पण या प्राक्तनापुढें कुणाचा इलाज ! आतां हा हात तोडून टाकला तरच लग्नाचा योग चुकेल. पण दोनाचा एक करण्यापेक्षां दोनाचे चार करणेंच अधिक फायद्याचें आहे हा अगदीं साधा, सरळ हिशेब आहे !

**कावेरी :** या हिशेबांत माझा हात जमेला धरला नाहीं, तर तोहि दाखवावा लागेल मला ! जातें मी आंत. ते पहा कालचे ते वैद्यबुवा आले आहेत. त्यांना साफ सांगा कीं चिमाजी आप्पांची भेट अशी फुकाफुकीं व्हायची नाहीं !

[ कावेरी आंत जाते आणि वैद्य बाहेरून प्रवेश करतो. ]

**वैद्य :** नमस्कार शास्त्रीबुवा !

**विसाजी :** कितीहि नमस्कार केले तरी साफ सांगतों कीं आप्पासाहेबांची भेट अशी फुकाफुकीं व्हायची नाहीं ! अहो, चिमाजी आप्पा यायचे आहेत देवाच्या दर्शनाला. मोठ्यांच्या मुलाखती अशा कुठें देवळांत आणि धर्मशाळेंत होत असतात का ?

**वैद्य :** वाड्यावर भेट होत नाहीं म्हणून तर देवळाचा हा आडमार्ग पत्करावा लागला ! पेशव्यांपेक्षा पहारेकऱ्यांचाच जोर जास्त ! खुद्दापर्यंत वर्दीच पोहोंचत नाहीं.

**विसाजी :** तुमच्या बटव्यांतील एखादी रामबाण मात्रा त्याला पाजायची होती !

**वैद्य :** रामबाण मात्रेचाहि प्रयोग करून पाहिला. पण पहारेकऱ्याच्या लाठीसह तो प्रयोग आमच्याच अंगावर उलटूं लागला ! आप्पासाहेबांची जरब वाड्यावर इतकी आहे कीं खुद्द बाजीरावसाहेबांनासुद्धा त्यांच्या परवानगीशिवाय वाड्यांत प्रवेश मिळत नाहीं म्हणतात !

**विसाजी** : मग आतां इतक्या जबरदस्त माणसाला भेटायचें म्हणजे.... कठीणच आहे जरा !

**वैद्य** : म्हणून तर शास्त्रीबुवा, आपल्या सहाय्याची याचना करतों मी. तुम्ही ब्राह्मण आहांत, मीहि ब्राह्मण आहे. आपण परस्परांना सहाय्य केलं पाहिजे.

**विसाजी** : ठीक आहे. ब्राह्मण्यावरतीच आलांत तेव्हां प्रयत्न केला पाहिजे. पण हें पहा, आप्पासाहेब कांहीं एकटे यायचे नाहींत. काशीबाई-साहेबांबरोबर म्हणून ते येत आहेत. तेव्हां त्यांच्याशीं बोलायला संधी मिळेलच असं नाहीं. प्रकृतीनें यथातथा असले तरी स्वभावाचे फार करडे आहेत आप्पासाहेब. परंतु तुमच्यासाठीं प्रयत्न करून पहातों. बरं पण–एक राहिलं....आपण ब्राह्मण खरे, पण कोणते ब्राह्मण ?

**वैद्य** : मी...मी...आपण कोण ?

**विसाजी** : मी नंतर सांगतों. आपण कोण ?

**वैद्य** : मी कोंकणस्थ ब्राह्मण आहे....माझं नांव महादेवशास्त्री गोखले.

**विसाजी** : मी देशस्थ आहे. आपलं काम व्हायचं नाहीं ! अहो, तुम्हां मंडळींना काय पंचाइत ? पंचाइत आमची. या कोंकणस्थांच्या कारकीर्दींत देवळांतल्या घंटा मात्र आम्हां देशस्थांच्या हातीं राहिल्या आहेत !

**महादेवशास्त्री** : हाताहाताचे गुण आहेत हे ! त्याला कोण काय करणार ? कांहीं हातांना घंटा चांगल्या वाजवतां येतात तर कांहीं हातांना तरवार चांगली चालवतां येते !

**विसाजी** : हाताचा गुण नाहीं, गोताचा गुण आहे हा ! कुणींहि कोंकण-स्थानं पुणें शहरांत शागीर्द म्हणून यावं, अंगांत गुण नसतांहि चार दिवसांमध्यें त्याचा सरदार होतो !

**महादेवशास्त्री** : आणि देशस्थाला सरदार केलं तर चार दिवसांत अंगच्या गुणानं तो शागीर्द होतो !

**विसाजी** : माझ्यासमोर, या विसाजी पिंगळ्यासमोर तुम्हीं देशस्थांची नालस्ती करतां ?

**महादेवशास्त्री** : आणि माझ्यासमोर तुम्ही कोकणस्थांची निंदा केली तीं ?

**विसाजी :** तुमचं काम व्हायचं नाहीं ! आप्पासाहेबांसमोर तुम्हीं उभे राहिलांत तरी मी त्यांना साफ सांगेन कीं या गृहस्थांशीं बोलूं नका !

**महादेवशास्त्री :** तेवढं केलं तरी माझं काम होईल ! पण हें पहा शास्त्री-बुवा, आपण ब्राह्मणांनीं असं परस्परांशीं भांडणं चांगलं का ? मग ब्राह्मणेतरांशीं कोण भांडेल ? तुम्हीं देशावरचे आम्हीं कोकणांतले, पण आपण सारेच द्विज आहोंत !

**विसाजी :** तेंहि खरंच ! तुम्हीं गोरे, आम्ही काळे; आमच्याकडे जोंधळे पिकतात, तुमच्याकडे अनुस्वार पिकतात; इकडच्या हवेंत आळस वाढतो, तिकडच्या हवेंत अक्कल वाढते. पण शेवटीं आपण सगळे ब्राह्मणच !

**महादेवशास्त्री :** अहो, राज्य छत्रपतींचं आहे आणि चलती खरी कुणब्याधुणब्यांची आहे ! हे शूद्र आणि अतिशूद्र असे कांहीं मातले आहेत कीं साऱ्या पृथ्वीतलावर त्यांचंच राज्य जणूं सुरूं झालं आहे !

**विसाजी :** खरं आहे, अगदीं खरं आहे वैद्यबुवा. आणि याचं कारण म्हणजे आजचे पेशवे ! पेशवे ब्राह्मण खरे पण ब्राह्मण्याची तिळमात्र चाड नाहीं त्यांना !

**महादेवशास्त्री :** मी तरी तेंच म्हणतों. पेशवे ब्राह्मण नाहीं अगदीं कोंकणस्थ ब्राह्मण आहेत ! पण काय उपयोग त्याचा ? वाड्यांतलीं माणसं आपलीं त्यांच्या पश्चात् कांहीं नेमधर्म, पुण्यकर्म चालवतात इतकंच. पण खुद्द पेशव्यांना आपल्या ब्रह्मधर्माची, आपल्या ब्रह्मकर्तव्याची कांहीं-तरी जाणीव आहे का ? बाजीरावनं हाताशीं धरलेलीं माणसं पहा. कोणी धनगर, कोणी गुराखी, कोणी सुतार, कोणी लोहार, कोणी महार ! छे छे–

**विसाजी :** कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ म्हणून म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं !

**महादेवशास्त्री :** (हलक्या आवाजांत) अहो, मी तर ऐकलं आहे कीं बाजीरावसाहेब मद्यपानहि करतात !

**विसाजी :** तुम्हीं कांहींच ऐकलं नाहीं ! मी तर असं ऐकतों कीं, जरा जवळ या, बाजीरावसाहेब–(हातानें दर्शवीत) मांसाहारसुद्धां करीत असतात म्हणून !

**महादेवशास्त्री :** नमःशिवाय ! नमःशिवाय ! काय या आर्यावर्ताचं होणार आहे परमेश्वराला ठाऊक ! यथा राजा तथा प्रजा. आज पेशवे चोरून

मद्यमांस सेवन करतात. आणखी कांहीं वर्षांनीं याच पुण्यांतले प्रतिष्ठित ब्राह्मण उघडपणें ताह्मनांतून दारू पितील आणि केळीच्या पानाभोंवतीं कोंबडीच्या चित्रावती घालतील! भगवंता, धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे अशी ग्वाही तूं गीतेंत दिली आहेस, ये बाबा लौकर! असो, मग आपल्या कामाचं काय ?

**विसाजी :** याच जागीं मी तुमची आप्पांशीं ओळख करून देतों. या संकटकाळांत आपण परस्परांना आधार द्यायलाच हवा. तुमची वाड्यांत ये–जा सुरू झाली म्हणजे आम्हांला विसरूं नका मात्र.

**महादेवशास्त्री :** तें कालत्रयीं होणार नाहीं. पण आप्पासाहेब ऐकतील का ?

**विसाजी :** काशीबाईसाहेब स्वतः बरोबर आहेत ना ? सततच्या आजीरामुळें कोठलाहि नवीन वैद्य कुणाचं प्रमाणपत्र घेऊन पुढं आला कीं साक्षात् अश्विनीकुमार समोर आल्याप्रमाणें त्यांना वाटतं. औषधं घेणं आणि देवदर्शन करणं हा बाईसाहेबांचा नित्याचा उद्योग आहे. त्यांच्याकडून आपलं काम झाल्याशिवाय रहायचं नाहीं. शिवाय जंजिऱ्याच्या शिद्यांचं शिफारसपत्र तुमच्याजवळ आहेच ! वाड्यांत शिरकाव झाला म्हणजे तेथलं आसन कायम ठेवणं तुमच्याच हातीं आहे. गरीबांच्या घरांत पांचदहा पोरं असायचीं त्याप्रमाणें श्रीमंताच्या घरांत पांचदहा रोगहि सापडायचेच.

**महादेवशास्त्री :** त्याची विशेष चिंता नाहीं. वाड्यांत जाऊन आल्याचा एकदा गवगवा झाला म्हणजे या पुणें शहरांत कांहीं कमी नाहीं. ( बाहेर ललकारी होते. ) ही पहा, ललकारी झाली. मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वींच—

**विसाजी :** तुम्ही निर्धास्त रहा !

[ बाहेर जातो. चिमाजी अप्पा, काशीबाई, दासी आणि विसाजी प्रवेश करतात. चिमाजीची शरीरप्रकृति बाजीरावासारखी सुदृढ नाहीं. परंतु देहयष्टी कृश असली तरी त्याच्या मुद्रेवर विलक्षण करारीपणा दिसून येतो. बाजीरावाच्या मानानें त्याचा स्वभावसुद्धां फार गंभीर दिसतो. बाजीरावाची पत्नी काशीबाई ही देखणी परंतु दुखणेकरी आहे. ]

**चिमाजी** : वहिनीसाहेब, आपण पुढें मंदिरांत व्हावं. [ किंचित् हंसून ] उत्तरेकडून रावसाहेब सुखरूप परत यावे म्हणून इथेंच आपल्याला नवस बोलायचा आहे ना ?

**काशीबाई** : अशी थट्टा करायची नाहीं अं भावजी ! मीं केलेल्या नवसांपेक्षां आणि घातलेल्या प्रदक्षिणांपेक्षा स्वारीची समशेरच त्यांचं रक्षण करायला अधिक समर्थ आहे हें मला ठाऊक आहे. पण मग आम्ही बायकांनीं आमच्या अंतःकरणाचं समाधान कसं करावं ? आमची आपली वेडी श्रद्धा कीं जागत्या दैवतापुढें केलेल्या प्रार्थना कधीं विफल व्हायच्या नाहींत !

**चिमाजी** : वहिनीसाहेब, मी थट्टेनं बोललों नाहीं. माझ्यासारख्या कर्मठाकडून श्रद्धेची थट्टा कशी होईल ? मला इतकीच मौज वाटली कीं तुम्ही इकडे रावसाहेबांची काळजी करतां आणि रावसाहेब तिकडे तुमची काळजी करतात. मी दक्षिणेकडे यायला निघालों तेव्हां त्यांनीं मला बजावून तुमच्या प्रकृतीकडे लक्ष द्यायला सांगितलं. स्वारीवर असतांना रावसाहेब सहसा घरांतल्या गोष्टींकडे लक्ष घालीत नाहींत—

**काशीबाई** : [ आनंदानें ] तरी मी जातांना सांगितलं कीं माझ्या प्रकृतीची चिंता करूं नका म्हणून. मोठमोठ्या प्रश्नांचे मनसुबे चालायचे, त्यांत मनावर आणखी हें ओझं नको.

**चिमाजी** : चिंता ही गोष्ट अशी आहे कीं ती मनांत प्रवेश करतांना माणसाची परवानगी विचारीत नाहीं ! बंगशाचा पाडाव करून बुंदेलखंडांत रावसाहेबांनीं एवढा मोठा विजय मिळवला पण त्यांच्याकडून येणाऱ्या पत्रांत त्या कर्तृत्वाच्या हकीगतीपेक्षां तुमच्या माझ्या तब्येतीची चौकशीच अधिक असते. ठीक शास्त्रीबुवा, चला, मंदिरांतलं कार्य उरकून घेऊं.

**विसाजी** : परवानगी असेल तर आपल्या आणि बाईसाहेबांच्या चरणाशीं एक विनंति आहे.

**चिमाजी** : कसली विनंति ?

**विसाजी** : विनंति माझ्या स्वतःसाठीं नाहीं. साऱ्या स्वार्थाचा होम करून

आम्ही देवाच्या दाराशीं बसलों आहोंत! श्रीमंत सरकारांची अल्पस्वल्प सेवा हातून घडावी या सदिच्छेनेंच—

**चिमाजी** : सर्वांच्या सदिच्छा आम्ही गृहित धरतों. काय सांगायचं तें सरळ सांगायची कृपा करा.

**विसाजी** : हे माझे परमस्नेही महादेवशास्त्री. नामांकित वैद्य आहेत, कोंकणस्थ ब्राह्मण आहेत.

**चिमाजी** : कोंकणस्थ ब्राह्मण असणं ही कांहीं वैद्याच्या अथवा कोणाच्याहि पात्रतेची निशाणी नव्हे!

**विसाजी** : नाहीं तसं नाहीं...आपलं सांगितलं...परंतु यांची आयुर्वेदांतील गति फार मोठी आहे, कोंकणांतल्या खास औषधींची माहिती यांना फार चांगली आहे. जंजिऱ्याच्या नबाबानं यांना गौरव करून जवळ ठेवलं होतं पण म्लेंच्छ राजाचा आश्रय स्वीकारणं त्यांना प्रशस्त वाटलं नाहीं आणि म्हणून ते पुण्याला आले.

**चिमाजी** : ठीक आहे. ( वैद्याकडे पाहून ) आपण सरकारी वैद्यांना भेटा, त्यांनीं भलावणी केली तर दरबारकडून आपली बूज झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**महादेवशास्त्री** : सरकार, अधिक बोलण्याची क्षमा करा. दरबारकडून मान्यता मिळवावी एवढीच माझी आकांक्षा नाहीं. प्रत्यक्ष वाड्यांत येऊन जर श्रीमंतांची कांहीं सेवा–

**काशीबाई** : कोंकणांतल्या औषधींची तुम्हांला विशेष माहिती आहे म्हणतां?

**महादेवशास्त्री** : होय बाईसाहेब. आणि कोंकणाइतका औषधींत समृद्ध असा दुसरा प्रांत नाहीं.

**काशीबाई** : ( चिमाजीस ) मग मी म्हणतें यांना एकदां वाड्यांत घेऊन यावं. पुष्कळ वैद्यांचे उपचार झाले पण रामचंद्राची तब्येत कांहीं चांगली सुधारत नाहीं!

**चिमाजी** : ठीक आहे वहिनीसाहेब. शास्त्रीबुवा, जातांना तुम्हांला बरोबरच घेऊन जाऊं.

[ महादेवशास्त्री लीनतेनें नमस्कार करितात. त्यांच्याशिवाय सर्वजण आंत जातात. विसाजी धांदलीनें परत येतो. ]

**विसाजी** : वाड्यांत तुमचा प्रवेश झाला ! छान झालं ! पण या गडबडींत एक आनंदाची वार्ता तुम्हांला सांगायची राहूनच गेली !

**महादेवशास्त्री** : कसली वार्ता ? कांहीं वतन—

**विसाजी** : अहो वतन कसलं घेऊन बसलांत ? माझ्या हातावर रेषा उमटली !

**महादेवशास्त्री** : रेषा ? कसली रेषा ?

**विसाजी** : आतां काय सांगावं ? अहो लग्नाची, तिसऱ्या लग्नाची रेषा उमटली !

**महादेवशास्त्री** : छान ! छान ! आम्ही आपले अजून पहिल्याच पायरीवर रेंगाळतों आहोंत. भाग्यवान आहांत !

**विसाजी** : भाग्य? पुरुषस्य भाग्यम् म्हणतात तें हेंच! पण अशा गोष्टींत आप्तमित्रांचं सहाय्य असलं तरच कार्य सुकर होतं. म्हणून तुम्हांला सांगणं कीं कुठें कांहीं जमायसारखं आढळलं तर तात्काळ कळवा मला. वैद्य म्हणून अनेक घरांत तुमचा आतां प्रवेश होणार—हें लक्षांत असूं द्या !

**महादेवशास्त्री** : अवश्य ! अवश्य लक्षांत ठेवतों.

**विसाजी** : मग चला तिकडेच. तुम्हांला गोत्र-प्रवर सांगतों आणि टिपणहि देतों.

[ जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ बुंदेलखंडांतील बाजीरावाची छावणी. मध्यरात्रीची वेळ होऊन गेलेली आहे. बाजीराव आपल्या डेऱ्यामध्यें एकटाच आहे. डेऱ्यामधील दिवे मालवण्यांत आलेले असल्यामुळें आंत अंधार पडलेला आहे. बाजीराव नुकताच बाहेरून आपल्या

डेऱ्यांत झोंपण्यासाठीं आला आहे, असें त्याच्या हालचालविरून दिसतें. अंगावर मुसलमानी पद्धतीचा, घरगुती, साधा पेहेराव आहे.

डेऱ्यांमध्यें एका बाजूला एक झोंपायचा पलंग, मध्यभागीं पेशवाई पद्धतीची बैठक आणि या बैठकीच्या जवळपास दोन कोच आहेत. पडदा उघडतो त्यावेळीं बाजीराव कोचावर बसलेला असतो. क्षणभरानें तो उठतो आणि डेऱ्याच्या कनातीजवळ जाऊन प्रवेशद्वाराजवळचा पडदा दूर सारून बाहेर बघतो. दूरवर कांहीं मशाली-दिवट्यांचा प्रकाश आणि अंधेऱ्या आकाशाचा कांहीं भाग दिसतो. क्षणभर तो देखावा पाहून बाजीराव पुन्हां पडदा सारतो आणि आंत येतो. ]

**बाजीराव** : नृत्यांगनांच्या पायांतील नूपुरांची रुणझुण संपली, सारंगीच्या स्वरांना बिलगणारी मंजूळ रागदारी विरून गेली, प्रकाशाचीं फुलं उधळणारे बिलवरी दिवे मालवले गेले आणि बाजीराव पेशव्याच्या भोंवतीं या दाट एकांतानें, या निःशब्द शांततेनें, या गाढ अंधारानें वेढा घातला ! उत्सवाच्या पाठोपाठ येणारी ही अकारण उदासीनता, विजयाच्या पावलावर पाऊल टाकून येणारा हा अंतःकरणाचा पराभव ! –पण माझ्यासारख्या मानवाची काय कथा ? प्रत्यक्ष परमेश्वरानें ज्यांचा सांभाळ केला त्या पांडवाचीसुद्धां विजयानंतर येणाऱ्या या अकारण उदासीनतेपासून, या अंतःकरणाच्या पराभवापासून मुक्तता झाली नाहीं ! दिवसाच्या मागून येणारी ही रात्र आणि जीवनाच्या मागून येणारा मृत्यू–किती सारखेपणा आहे त्यांत ! दिवसाचे क्षण रात्रीकडे आणि आयुष्याचे दिवस मरणाकडे अखंडपणानें वहात असतात. मृत्यू ! विराट वटवृक्षाप्रमाणें हीं दोन अक्षरं साऱ्या मानवी संसारावर आपल्या अनंत फांद्यांची, पारंब्यांचीं काळी छाया पसरून उभीं आहेत... पण बाजीरावाला मृत्यूची कदर कां वाटावी ? जीवनाच्या सरहद्दीवर जाऊन मृत्यूशीं व्यापार करणारे सौदागर आम्हीं ! बाजीराव पेशव्यानें केवळ आचारानेंच नव्हे, तर विचारानें सुद्धां आपल्या सहकारी सैनिकांशीं समरस झालं पाहिजे. या डेऱ्याच्या भोंवतीं, नाचरंगानंतर झोंपीं गेलेले, आवडत्या लाव-

ण्यांचे चरण तारस्वरानें आळवणारे, शेंकड हिंदुस्थानला कळून चुकलं आहे, मुलखांतील माणसांची आठवण करीत राहुस्यांत पडून मनावर घेतलं, यांचें सहकारी-जीवनाच्या आनंदानें ते इतके धुंद झाले आहेत कीं, त्यांना मृत्यूचं स्मरण नाहीं आणि मृत्यूची भीतीहि नाहीं. बाजीराव पेशवा हा जीवनाची चिकित्सा करणारा तत्त्ववेत्ता नाहीं, तर जीवनाचा उपभोग घेणाऱ्या आणि जीवन समृद्ध करणाऱ्या सैनिकांचा तो सेनापती आहे! आणि म्हणूनच हा मद्याचा पेला !— ( एका तिपाईवर असलेल्या सुरईतून पेला भरून पिऊं लागतो. ) साऱ्या सज्जनांनीं अव्हेरलेला साऱ्या धर्मांनीं धिक्कारलेला, हा मद्याचा पेला ! जे जन्मापासून गुलाम आहेत, जित आहेत, त्यांना या चिमुकल्या पेल्याची भीति ! बाजीराव पेशवा जेता आहे, त्याला हा पेला जिंकूं शकणार नाहीं ! अंतःकरणावरील एकाकीपणाचा भार कमी करणारा, श्रमलेल्या शरीराला विश्रांती देणारा, हा एक क्षुद्र चाकर आहे आणि तो क्षुद्र चाकरच राहील ! छत्रपतींच्या या पंतप्रधानाला कोणीच जिंकूं शकणार नाहीं...! नाहीं, हें खरं नाहीं ! आज छत्रसालाच्या दरबारांत नृत्यगायन करणारी ती सुकुमार कंचनी ! बंगशाचा पराभव केल्या-बद्दल, पेशव्यांचा गौरव करण्यासाठीं छत्रसालानं उत्सव केला; पण या उत्सवांत, एका कंचनीकडून त्यांनीं खुद्द पेशव्याचाहि पराभव केला ! ( पेला दूर ठेवून कोचावरती बसतो. ) इंद्रनीलासारखे नेत्र आणि चांदण्या-सारखी नजर असलेली, उषःकालच्या दंवासारखी कोमल, साऱ्या सुंदर, सुगंधी फुलांच्या संमेलनाप्रमाणें—

( तें सुंदर चित्र दृष्टीसमोर उभें करण्याकरतांच कीं काय डोळे मिटून कोचाच्या पाठीवर मान टेकतो. )

[ प्रवेशद्वारावरील पडदा बाजूला सरकतो आणि एका स्त्रीची आकृति त्यामधून आंत येते. ]

**बाजीराव** : ( चाहूल ऐकून ) कोण आहे ?

**स्त्री** : मी—एक स्त्री.

**बाजीराव** : तूं स्त्री ऐस अथवा पुरुष ऐस; पेशव्यांच्या डेऱ्यामध्यें मध्यःरात्रीं असं वर्दीशिवाय यायचं कारण ?

**स्त्री** : वर्दी ! श्रीमंत पेशव्यांकडे येण्यासाठीं वर्दी कशाकरतां ?

गुहेच्या दारावर पहारा का ठेवीत असतात ? ज्या[illegible]तरवारी कमरेची शोभा वाढवण्यासाठीं असतात, त्या उत्तरेकडील राजेरजवाड्यांच्या वस्तीवर वर्दीची आवश्यकता, दख्खनच्या पराक्रमी—

**बाजीराव** : या विश्रांतीच्या वेळेला केवळ माझी स्तुती करण्यासाठीं तूं माझ्याकडे आलीस ?

**स्त्री** : ( क्षणभर थांबून ) आपणच बाजीराव ?

**बाजीराव** : होय, मीच बाजीराव ! कशासाठीं आलीस तूं ?

**स्त्री** : आपण मघाशीं ओळखलंत.आपली स्तुती करण्यासाठींच आलें आहे मी!

**बाजीराव** : बाजीराव पेशव्याला स्तुती प्रिय आहे, पण स्तुतीपेक्षाहि त्याला विश्रांति अधिक प्रिय आहे. आणि!...अधिक आवश्यकहि आहे !

**स्त्री** : विश्रांतीपेक्षांसुद्धां स्त्री आपल्याला अधिक प्रिय आहे, अशी वार्ता उत्तरेकडेसुद्धां आमच्या कानावर येते ! शिवाय, पुरुषाच्या नजरेनं स्त्री आणि विश्रांती हीं कांहीं वेगळीं नव्हत !

**बाजीराव** : [ कोचावरून उठतो ] बाईसाहेब, हीं उत्तरेकडचीं नाणीं दक्षिणेकडे चालायचीं नाहींत ! स्त्री म्हणजे विश्रांती असती, तर मोगलां-प्रमाणें मराठेहि मोठमोठे जनानखाने घेऊन स्वारीवर निघाले असते....तूं दाक्षिणी भाषा बोलतेस, पण भाषेचा मतलब मात्र दक्षिणी स्त्रियांना झेंपण्या-सारखा नाहीं....तूं दक्षिणी नाहींस !

**स्त्री** : मी–मी यवन आहे.

**बाजीराव** : मला वाटलंच ! आमच्या दक्षिणी कोकिळा घरांतल्या घरांत मंजूळ कूजन करतील; आकाशांत जाऊन पंख पसरण्याचं सामर्थ्य त्यांच्यांत नाहीं. तूं यवन आहेस ! यवनांचा संहारकर्ता म्हणून ज्या पेशव्याची कीर्ति साऱ्या देशांत दुमदुमते आहे, त्याच्या—

**स्त्री** : माफ करा, पण यवनांचा संहारकर्ता हीच आपली आवडती; अभिमानाची किताबत काय ?

**बाजीराव** : नाहीं ! कीर्तीला खोटं बोलायची संवय असते ! मी यवनांचा संहारकर्ता आहे आणि रक्षणकर्ताहि आहे ! चिमाजीआप्पानं माळव्यांत

गिरिधरबहादुराला नामशेष केल्यावर साऱ्या हिंदुस्थानला कळून चुकलं आहे, कीं छत्रपतींच्या मनांत आलं आणि पेशव्यांनीं मनावर घेतलं, तर हिंदुस्थानांतील यच्चयावत् यवन राजवटींच्या, मराठ्यांना चिंधड्या उडवतां येतील! पण समशेरीच्या अगोदर स्नेहाचा उपयोग करण्याची आम्हा हिंदूंना जन्मजात संवय आहे. पण तें जाऊंदे. मध्यरात्रीं स्त्रियांबरोबर राजकारणाची चर्चा करण्याची मला आवड नाहीं! तूं यवन आहेस. तूं तरूण आहेस हें तुझ्या स्वरावरूनहि समजतं. तूं लावण्यवतीसुद्धां आहेस का?

**स्त्री** : लावण्याची देणगी देवानं दिली नसती, तर आपल्यासारख्या लोकोत्तर वीरापुढें उभं राहण्याचं धैर्य माझ्याच्यानं झालं नसतं.

**बाजीराव** : [ स्मित करीत ] केवळ माझी स्तुती करण्यासाठीं नव्हे, तर स्वतःचीहि स्तुती करण्यासाठीं तूं इथं आली आहेस!

**स्त्री** : कां करूं नये? आपल्याला आपल्या पराक्रमाचा अभिमान वाटतो, मला माझ्या लावण्याचा अभिमान वाटतो. एका क्षेत्रांतले आपण राजे आहांत, दुसऱ्या क्षेत्रांतली मी राणी आहे!

**बाजीराव** : [ हंसत ] या राणीसरकारांचं नांव?

**स्त्री** : नांव?...माझं नांव आपल्या ऐकिवांत नसणार.

**बाजीराव** : स्त्रियांचीं नांवं ऐकिवांत आलीं तरी तीं लक्षांत ठेवण्याचं कारण पडत नाहीं!

**स्त्री** : माझं नांव मस्तानी!

**बाजीराव** : मस्तानी! मस्तानी...! किती योग्य नांव आहे!

**मस्तानी** : मी समजलें नाहीं!

**बाजीराव** : अनोळखी पुरुषाच्या एकांतांत साहसानं प्रवेश करणाऱ्या स्त्रीचं नांव मस्तानीच असायला हवं!

**मस्तानी** : माझ्या या साहसामुळें, आपण रागावलां आहांत?

**बाजीराव** : असं सुंदर साहस पाहून कुठलाही सैनिक रागावणार नाहीं! दिवे लावूं नका?

**मस्तानी** : लावा कीं! माझा अभिमान खोटा नाहीं हें आपल्याला दिसून येईल.

[ बाजीराव झुंबरांतील दिवे लावतो. मस्तानीचें अलौकिक सौंदर्य त्या प्रकाशांत प्रकट होतें. बाजीराव स्तिमित होऊन तिच्याकडे पहात रहातो. मुसलमानी वेष परिधान केलेली मस्तानी खालीं मान घालून लाजून उभी राहते. ]

**बाजीराव** : मस्तानी ! छत्रसालाच्या दरबारांत नृत्य करणारी ती मोहक कंचनी !

**मस्तानी** : होय. तीच मी !

**बाजीराव** : देवानं दिलेलं सौंदर्य आणि माणसानं ठेवलेलं नांव यांच्यांत इतकी संगती कधींच साधली नसेल !...कीं त्या कंचनीचा विचार करीत राहिल्यामुळें, पहाटच्या वेळीं पडणारं हें एक सुरम्य स्वप्न आहे ! नाहीं, स्वप्नंसुद्धां इतकीं सुंदर नसतात. मस्तानी ! कां अशी लाजून कां उभी राहिलीस ? बोलत कां नाहींस मस्तानी ? मस्तानी—

**मस्तानी** : [ खालीं पहात, हलक्या आवाजानें ] महाराज, दख्खनच्या पराक्रमी राजांनी, एका क्षुद्र यावनीच्या नांवाचा असा जप करणं बरं का ?

**बाजीराव** : तुला क्षुद्र कोण म्हणेल ? अप्सरांच्या संगतींत राहणारे अमरलोकचे रहिवासीसुद्धां, मस्तानिचं हें लावण्य पाहिल्यावर तिच्या नांवाचा जप करायला लागतील. क्षुद्र यावनी ! सौंदर्य क्षुद्र नसतं आणि सुंदरींना जांत नसते ! दरबारांत दुरून पाहिलेलं तें सौंदर्यसुद्धां इतकं दिव्य नव्हतं ! मस्तानी, खरं सांग, चांदण्याच्या रुपेरी सागरांत नौका घालून एखाद्या यक्ष-लोकांतून तूं इथं आली आहेस का ?

**मस्तानी** : सरकार, मी...मीं...

**बाजीराव** : किती चाचरतेस ? किती बावरतेस ? अंधारांतलं धैर्य प्रकाशामध्यें मावळून गेलं ?

**मस्तानी** : बायकांचं धैर्य अंधारांतच असतं ! प्रकाशांत त्यांना त्या आपल्या धैर्याचीसुद्धां लाज वाटायला लागते !

**बाजीराव** : प्रकाशांतली ही भाषासुद्धां कांहीं कमी धीराची नाहीं !

**मस्तानी** : [ बोललं पाहिजे अशा निर्धारानें ] महाराज, कोणत्याहि स्त्रीनं केलं नसेल आणि करूं नये असं साहस करून मी इथं आलें? पालखी-मेण्यांत बसून, दासदासींचा लवाजमा घेऊन छत्रसालाची मानलेली कन्या म्हणून मोठेपणानें मिरवत आलें असतें तर...तर कदाचित् आपल्याला तें आवडलं नसतं, आणि माझी—माझ्या अंतःकरणाची ओळखहि आपल्याला पटली नसती. म्हणून घोड्यावर स्वार होऊन, कमरेला कट्यार बांधून, मध्यरात्रींच्या काळोखांतून एखाद्या वादळासारखी मी बाजीरावाकडे आलें !

**बाजीराव** : कशाकरतां ? छत्रसाल राजानं तुला इकडे रवाना केलं ?

**मस्तानी** : कोठल्याहि मानवी राजानं मला इथें पाठवलं नाहीं ! अवघ्या मानवमात्रावर सत्ता गाजवणाऱ्या त्या सार्वभौमानें ..प्रेमानें—

**बाजीराव** : [ चकित होऊन ] प्रेमानं ?

**मस्तानी** : महाराज, दक्षिण देशांतच माझा जन्म झाला, माझं बालपण गेलं. यौवनांत पाऊल टाकण्यापूर्वींच श्रीमंतांनीं केलेल्या पराक्रमाच्या कथा माझ्या कानावर बरसूं लागल्या. मला जाणिव नव्हती, पण त्याच नव्हाळींत, अंतःकरणाच्या प्रत्येक उमलत्या पाकळीवर बाजीरावं हें जादूचं नांव लिहिलं गेलं ! स्वरूपाचा दिमाख, आणि सुस्वराची देणगी घेऊन मी हिंदुस्थानांत आलें, नावाजलें पण माझ्या प्रफुल्लित यौवनाची नजर एखाद्या सूर्यपुष्पाप्रमाणें सतत या सूर्याकडेच वळलेली होती ! बाजीरावाला बघितलं नव्हतं; पण बाजीरावाचं नांव मात्र, मस्तानीच्या हृदयांत राजवाडा बांधून राहिलं होतं. आज दरबारांत आपलं दर्शन झालं ! मेणाच्या पुतळ्यासारखीं...मी विरघळून, वितळून जात आहे असं वाटलं मला. माझ्या स्वप्नांतल्या बाजीरावापेक्षांहि समोर दिसणारे बाजिराव अधिक रूपशाली होते, अधिक तेजोमय होते. या तेजाच्या राशींत एखाद्या ठिणगीप्रमाणें विलीन होण्यासाठीं, सातां जन्माचीं बंधनेंही मीं तोडलीं असतीं—आणि आज एका जन्माचीं तरी तोडलीं आहेत ! ही माझ्या अंतकरणाची कहाणी. आपण माझ्या सौंदर्याची प्रशंसा केलीत, पण या सौंदर्याच्या मागें एक जिवन्त, जळतं मन आहे हें समजल्यावर आतां आपण . कदाचित्—कदाचित् माझा तिरस्कारहि करूं लागाल !

**बाजीराव** : तुझा तिरस्कार ! तुझा तिरस्कार करणं हें कदाचित् माझं कर्तव्य असेल. पण तें कर्तव्य पार पाडण्याचं सामर्थ्य, या घटकेला तरी माझ्यामध्यें उरलेलं नाहीं ! परंतु मला अद्यापहि हें खरं वाटत नाहीं ! गुलाबांच्या पुष्पाकांत निथळणारं हें आरस्पानी सौंदर्य मानवासाठीं नाहीं !

**मस्तानी** : ( एकदम पुढें होऊन गुडघ्यावर बसते आणि बाजीरावाचे पाय धरते ) सरकार, मानवांच्या या राजासाठीं, मानवांच्या या राजासाठीं आहे तें ! पुरुषाच्या पराक्रमाला स्त्री आपल्या सौंदर्याचा हा नजराणा अर्पण करीत आहे !

**बाजीराव** : ( तिचा हात धरून तिला उठवीत ) ऊठ, मस्तानी, तुझी जागा बाजीरावाच्या हृदयाजवळ आहे, त्याच्या पायाजवळ नव्हे !

: पडदा :

## : २ :

### प्रवेश पहिला

[ पुणें शहरांतील एक रस्ता. स्वारींत मोठें यश मिळवून बाजीराव परत आल्यामुळें सर्वत्र स्वागताची धामधूम आहे. रस्त्यानें लोकांची उत्साहपूर्ण रहदारी आणि आरडाओरड चालू असते. विसाजी आणि महादेवशास्त्री प्रवेश करतात आणि एका बाजूच्या कोपऱ्याला उभे राहतात. ]

**विसाजी** : महादेवशास्त्री, जंजिऱ्याच्या नबाबाला आणि पुण्याच्या पेशव्यांना पाणी नाहीं तरी औषधं पाजणारे नामांकित वैद्य तुम्हीं! तुम्हांला मी विचारतों कीं सध्या या पुणें शहराला जडलेल्या रोगाचं निदान तुम्हाला करतां येईल का ?

**महादेवशास्त्री** : फार सोपं निदान आहे तें! विसाजीपंत, माणसापेक्षां समाजालाच अधिक जडणारा रोग आहे हा! या रोगाचा प्रवेश प्रथम

हृदयांत होतो आणि नंतर तो वाताप्रमाणें मस्तकांत शिरून त्याचाहि बोजवारा उडवतो. मस्तकाच्या मागोमाग डोळेहि जातात आणि शेजारधर्म पाळण्यासाठीं कीं काय डोळ्याबरोबर कानहि जातात! या रोगामुळें माणसं निर्बुद्ध, आंधळीं आणि बहिरीं होतात.

**विसाजी** : म्हणजे तीं फक्त मुकीं आणि पांगळीं व्हायचीं तेवढी राहतात!

**महादेवशास्त्री** : मुकीं तर होत नाहींतच, उलट मद्यपी माणसांप्रमाणें या रोगानं रोग्याच्या जिभेला आणखी तरतरी मात्र येते. पायाचं म्हणाल तर असलेल्या दोन पायांत आणखी दोन पायांची भर पडून माणसाचं रूपांतर साक्षात् पशूंत होतं. ही धावणारीं माणसं पहा! दोन पायांच्या बळावर तीं इतक्या उत्साहानं धावूं शकतील का?

**विसाजी** : भयंकरच रोग आहे हा! रोगाचीं लक्षणं झालीं पण त्याचं नांव—

**महादेवशास्त्री** : या रोगाचं नांव विभूतिपूजा! शिवाय हा साथीचा रोग आहे. सारं पुणं, नव्हे सारा मराठी मुलूख या रोगानं पछाडला आहे. जिकडे जावं तिकडे एकच. बाजीराव! बाजीराव! बाजीराव! जणूं बाजीरावानं आकाशाला शिडी लावून तिथल्या चांदण्या खुडून आणल्या!

**विसाजी** : असं केलं तरी काय हो या बाजीरावानं? याच्या बापाच्या हातावर रेषा उमटली म्हणून हा पंतप्रधान झाला. उद्यां आमच्या हातावर ती रेषा उमटली म्हणजे आम्हीहि पेशवेच काय पण दिल्लीचे बादशहासुद्धां होऊं!

**महादेवशास्त्री** : दारादारांपुढें सवाष्णींनीं ओवाळलं म्हणे बाजीरावाला!

**विसाजी** : मग त्या बायकांचं पुढें काय झालं? पुन्हां कांहीं घरांत जायला मिळालं नसेल त्यांना! पळत पळत उत्तरेकडे जातो आणि पुन्हां पळत पळत दक्षिणेकडे येतो! या पळापळीला काय पराक्रम म्हणायचं? आम्हालाहि पळतां येतं. पाय आहे तिथं पळणं आहेच! मागें एकदां पुण्यांत निजामाच्या स्वारीची हूल उठली तेव्हां पुण्याच्या शनिवार पेठेंतून आम्ही जे तडक पळालों ते पहिला मुक्काम साताऱ्याच्या रविवार पेठेंतच केला!

**महादेवशास्त्री** : लोक गाढव असतात हेंच खरं! घरांसमोर सडा-संमार्जनं काय केलीं, रांगोळ्या काय घातल्या, गुढ्या काय उभारल्या, तोरणं काय लावली! स्वारी गांवांत आल्यापासून तर पेठापेठांतून दिंड्या निघून शनिवारवाड्याकडे चालल्या आहेत. हें पहा, हे पहा, कसे दारू प्याय-ल्यासारखे झिंगून चालले आहेत!

**विसाजी** : जरा गंमत करूं का त्या कुणबटाची? मारे कमरेला तरवार लावून ओरडत चालला आहे! अहो, जरा इकडे या!

[ रस्त्यानें जाणारा एक शिपाई विसाजीजवळ येतो. ]

**विसाजी** : काय हो, असे पिसाटासारखे कसला पुकारा करीत चाललां आहांत?

**शिपाई** : पिसाटासारखे? तुम्ही पुण्यांतले नाहीं वाटतं?

**विसाजी** : मीच नव्हे माझ्या तीन पिढ्या पुण्यांतच रहात होत्या!

**शिपाई** : आणि तरीहि बाजीरावसाहेब परत आले हें तुम्हाला कळलं नाहीं? सारं शहर संगमाच्यापुढें त्यांना सामोरं गेलं होतं!

**विसाजी** : पण मी म्हणतों, बाजीराव परत आले यांत इतकं माथीं फिरण्यासारखं काय आहे? मी सुद्धां काल सासवडला गेलो होतों तो आज सकाळीं परत आलों!

**शिपाई** : तुम्हींच कशाला! पहाटे पर्वतीकडे चरायला गेलेले बैलसुद्धां रोज संध्याकाळीं पुण्यांत परत येतात!

**विसाजी** : मी तरी तेच म्हणतों. उत्तरेकडे चरायला गेलेला एक बैल चरणं आटोपून—

**शिपाई** : [ तरवारीला हात घालून ] खबरदार! एक अक्षर अधिक बोलशील तर त्या छिनाल जिभेचे तुकडे करून टाकीन! त्या देवमाणसाची माझ्यासमोर, त्याच्या खांद्याला खांदा लावून लढलेल्या एका मराठ्यासमोर निंदा करतोस?

**महादेवशास्त्री** : जाऊं द्या हो. त्यांनीं आपली गंमत केली जरा!

**शिपाई** : पुन्हां अशी गंमत कराल तर गर्दन उतरून पडेल.

[ जातो. ]

**विसाजी :** ( भीति कमी झाल्यावर ) महादेवशास्त्री, तुम्ही म्हणतां तें अगदीं खरं आहे. लोक गाढव, अगदीं सपशेल गाढव आहेत ! पहाना, मी सहज गंमत केली तर तो गाढवासारखा मला मारायला उठला !

**महादेवशास्त्री :** अहो, बाजीरावाच्या धर्मद्रोही धोरणामुळें हे शूद्र लोक असेच सर्वत्र मातून गेले आहेत ! तुम्ही ती बातमी ऐकली कीं नाहीं ?

**विसाजी :** कोणती आणखीन् बातमी ?

**महादेवशास्त्री :** बाजीरावानं येतांना एक मुसलमान बाई पळवून आणली आहे !

**विसाजी :** एकच ? मी तर समजतों कीं प्रत्येक स्वारीहून परत येतांना शेदोनशें बऱ्यावाईट बायकांचा खुर्दा तो कमरेला लावून येतो !

**महादेवशास्त्री :** ती नेहमीची गोष्ट वेगळी, ही वेगळी. या म्लेंच्छ प्रकरणानं थेट शनिवारवाड्यांत प्रवेश केला आहे !

**विसाजी :** तेंहि ऐकलंय्. काय मस्तानी कीं सुस्तानी नांव आहे तिचं !

**महादेवशास्त्री :** मस्तानी ! एका मुसलमान तमासगिराची पोरगी आहे ती ! आणि हे म्हणे आमच्या गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपतींचे पंतप्रधान !

**विसाजी :** छे ! छे ! पंतप्रधान झाले म्हणून त्यांचा हा भ्रष्टाकार आम्ही सहन करणार नाहीं ! उद्यां रामेश्वराच्या मंदिरांत पुण्यांतील समस्त ब्रह्म-वृंदाची सभा बोलवतों.

**महादेवशास्त्री :** मी तरी तेंच म्हणतों. आपल्याला भूमीहि अनुकूल आहे. अनेक प्रतिष्ठित ब्राह्मणांशीं माझं बोलणं झालं, पेशव्यांचं हें शूद्राचरण सर्वांनाच अमान्य आहे. चला, पुढील कार्याची रूपरेखा आपल्याला आखा-यला पाहिजे. पण इथं त्यासंबंधीं बोलायची सोय नाहीं.

**विसाजी :** पण यामुळें शनिवारवाड्याशीं आलेला तुमचा संबंध सुटेल ना ?

**महादेवशास्त्री :** तो संबंध सकाळीं जडला आणि संध्याकाळीं सुटला ! पण वाड्यांत जाऊन आल्याची कीर्ति झाल्यामुळें दिवसांतनं चारसहा घरीं जाण्याइतकं बस्तान बसलं आहे !

•

**विसाजी :** मग कुठें कांहीं आढळलं का ?

**महादेवशास्त्री :** कांहीं ठिकाणीं नुसते रोगी आढळतात, कांहीं ठिकाणीं पैसेहि आढळतात—

**विसाजी :** तसं नव्हे हो ! आमच्या हातावर उमटलेली नवीन रेषा तुम्हीं विसरलांत ! म्हटलं त्या दृष्टीनं कुठं कांहीं--

**महादेवशास्त्री :** तेंहि बघतों आहे. एक स्थळ हेरलं आहे. पण त्याची नक्की खबर लौकरच काढून तुम्हांला कळवतों मी !

**विसाजी :** ठीक ! तुम्हांला म्हणून सांगतों कीं एक चवथी रेषाही इथं डोकावूं लागली आहे ! ती पुरती उमटायच्या आंत तिसरीचा कार्यभाग झाला पाहिजे !

[ दोघे जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ शनिवारवाड्यांतील काशीबाईचा महाल. महालाच्या एका कोंपऱ्यांत नक्षीदार पिठांवर चढवलेला एक मोठा थोरला आरसा असून आरशाच्या जवळपास शृंगारसाहित्य आणि अलंकारांच्या मंजुषा आहेत. समोरच्या बाजूला गालिचांची बैठक आणि कोच आहेत. काशीबाई वेषभूषा करीत आरशासमोर उभी असून, तिची दासी पार्वती तिला त्या कामांत साहाय्य करीत आहे. ]

**काशीबाई :** खरंच पार्वती, हा जयपुरी चंद्रहार गळ्यांत बरा दिसेल कीं...भावजींनीं फिरंग्यांकडून आणलेली ती मोत्यांची माळ बरी दिसेल ? जयपुरी असला तरी हा हार घाटामध्यें जरा बेडौलच आहे नाहीं ? [ हार घालून आरशांत पहाते. ] नकोच हा ! मी म्हणतें ही सरीसुद्धा नको, या पुतळ्यासुद्धा नको ! स्वारींचा स्वभाव तुला ठाऊक आहे ना ! एकदां अशीच दागिन्यांनीं नखशिखांत मढून त्यांच्यासमोर गेलें आणि सहज

विचारलं, हा सुवर्णफुलांचा हार गळ्यांत बरा दिसतो का ? तेव्हां म्हणायचं झालं...( थांबते. )

**पार्वती** : काय म्हणाले ?

**काशीबाई** : ( स्मित करीत ) कांहींतरीच म्हणायचं झालं! मला नाहीं सांगतां यायचं तें!

**पार्वती** : म्हणाले असतील मी इतक्या साधेपणानं राहतों—

**काशीबाई** : अग तसं नाहीं! म्हणाले, त्या सोन्याच्या हारापेक्षां माझा हातच...तुझ्या...मी नाहीं सांगत जा! स्वारी एकदां बोलायला लागली म्हणजे कसलाहि सुमार रहात नाहीं! आण पाहूं ती माळ. ( पार्वती माळ काढून देते व काशीबाई ती गळ्यांत घालतें. )

**पार्वती** : छान दिसते आहे!

**काशीबाई** : पार्वती, तुला एक विचारतें. खरं सांगशील का ?

**पार्वती** : तुमच्यापाशीं कधीं खोटं बोलेन का मी ?

**काशीबाई** : तसं नाहीं ग! पण...सांगशील का खरं ?

**पार्वती** : सांगेन! सांगेन!

**काशीबाई** : मग विचारूं ? पहा बरं—

**पार्वती** : विचारा!

**काशीबाई** : ती मस्तानी माझ्यापेक्षां दिसायला फारच चांगली आहे का ग ? मी पाहिलं तिला आज...पण माझी नजर कांहीं निर्मळ असायची नाहीं! म्हणून तुला विचारतें. खरंच माझ्यापेक्षां फार सुंदर आहे का ती ?

**पार्वती** : बाईसाहेब, माझी नजर तरी कुठें निर्मळ आहे ? या गोष्टीचं मला कांहींच का दुःख नाहीं ?

**काशीबाई** : आहे ग! तुला कांहींच वाटत नसेल असं थोडंच म्हणतें मी! पण...पंण माझ्या मनाची जखम तुलाच काय, कोणालासुद्धा कळायची नाहीं. बाकीं तुझ्याच तोंडून वदवून कशाला घ्यायला हवं ? स्वरूपांत तिची माझी तुलनासुद्धां व्हायची नाहीं. तिच्याशेजारी उभी राहिलें तर चंद्रज्योतीशेजारी पण ती पेटवल्यासारखं दिसेल तें!

**पार्वती** : कांहींतरीच बोलणं तुमचं बाईसाहेब. सोन्याची समई म्हणा!

**काशीबाई** : सोन्याची समई झाली तरी तिचा प्रकाश कांहीं चंद्रज्योती-सारखा पडत नाहीं !

**पार्वती** : क्षणाचा प्रकाश आणि कायमचा काळोख ! चंद्रज्योतीच्या उजे-डांत कांहीं संसार उजळ करतां येत नाहीं. म्हणूनच बाईसाहेब, मला वाटतं कीं, श्रीमंतांचं मन फार दिवस कांहीं तिथं गुंतून रहायचं नाहीं !

**काशीबाई** : देवानं कपाळावर लिहिलेलीं अक्षरं माणसाला थोडींच वाचतां येतात ?...पण मी कांहीं सवत म्हणून तिला पाण्यांत पहात नाहीं. सासूबाईंनी, सगळ्याच जणींनी मला बजावलं कीं, स्वारींना सांगून तिला वाड्याबाहेर ठेवण्याची व्यवस्था कर म्हणून ! तिनं वाड्यांत यावं, रहावं हें भाऊजींनादेखील पसंत नाहीं. पण स्वारीजवळ बोलायला त्यांनासुद्धा धीर झाला नाहीं. मी सांगितलं असतं तर अैकणं झालं असतं, हो नक्कीच अैकणं झालं असतं ! पण म्हटलं, बाहेर देशांतल्या वनवासांतून स्वारी विजयी होऊन परत आली; त्यांचं हें सुख हिरावून घेण्याचा मला–मलासुद्धां अधिकार नाहीं ! त्यांत मी अशी सततची दुखणेकरीण—

**पार्वती** : बाईसाहेब, मला आपलं वाटतं, तुम्ही राधाबाईसाहेबांचं अैकलं असतं तर बरं झालं असतं. ठिणगी पायाच्या आंगठ्यानें विझवतां येतें पण तिचा वणवा झाला म्हणजे समुद्राचं बळहि मग पुरं पडत नाहीं. एरव्हींचं साहून नेतां येतं. बायकांचे डोळे कांहीं घराच्या भिंती ओलांडून पलिकडे जात नाहींत. पण आतां ही आपत्ती घरांतच आली. पुन्हां ना आपल्या धर्माची ना जातीची !

**काशीबाई** : आपत्तीला जात कसली आणि धर्म कसला ? पार्वती, पुरुषांच्या दृष्टीनं स्त्रियांना एकच जात असते आणि ती म्हणजे स्त्रियांची !

[ बाजीराव हंसत प्रवेश करतो. पार्वती चटकन् निघून जाते. ]

**बाजीराव** : शाबास ! स्त्रिया इतक्या समंजसपणानं बोलूं लागल्या तर पुरुषांचं जीवन फार निर्वेध होईल !

**काशीबाई** : आणि समंजसपणानं बोलणाऱ्या त्या स्त्रियांच्या जिव-नाचं काय ?

**बाजीराव** : त्यांनाहि त्या औदार्याचं पारितोषिक मिळाल्याशिवाय रहात नाही !

**काशीबाई** : इहलोकीं कीं परलोकीं ?

**बाजीराव** : इहलोकांतच नव्हे तर इहलोकांतील पुणें शहरांत, पुणें शहरांतील शनिवारवाड्याच्या एका महालांत ! हा नवरत्नांचा हार पाहिलांत ? दोन लक्ष मोगलांचा चुराडा करून आम्ही वीस हजार मराठे बुंदेलखंडांतून परत येत असतांना, मेवाडच्या महारणीनं हा हार मला नजराणा म्हणून पाठवून दिला. दिल्लीच्या कोशागरांतसुद्धां या जवाहरांचें जोडीदार सापडायचें नाहींत ! पेशव्यांच्या गृहदेवतेला तो मी अर्पण करतों.

**काशीबाई** : बुंदेलखंडांतून येतांना पेशव्यांनीं केवळ हा हारच आणला असता तर त्यांच्या गृहदेवतेनें तो आनंदानें स्वीकारला असता. पण पेशव्यांनीं केवळ हार आणला नाहीं तर एक...गृहदेवताहि आणली !

**बाजीराव** : [ तोंडावरील हास्य आणि स्वरांतील खेळकरपणा एकदम मावळतो ] या गोष्टीची चर्चा इथें झाली नाहीं तर चालणार नाहीं का ?

**काशीबाई** : आपण म्हणाल तर इथं ती होणार नाहीं ! पण साऱ्या पुण्यांत, साऱ्या महाराष्ट्रांत होणारी चर्चा कुणाला थांबवतां येईल ?

**बाजीराव** : [ कोचावर बसतो ] परसांत बसून अशा चर्चा करण्यासाठीं ज्या क्षुद्रांचा जन्म आहे, त्यांच्या चर्चेची आणि निंदेची मला कदर वाटत नाहीं ! जे शब्द मला ऐकायची इच्छा नसते ते मी ऐकत नसतों ! पण कर्तव्य म्हणून ज्यांचे शब्द मला ऐकायला पाहिजे त्यांनींच ही चर्चा आरंभली तर... तर ..

**काशीबाई** : तर काय, त्यांना शासन करणार ?

**बाजीराव** : बाजीराव पंतप्रधान आहे तो घराच्या बाहेर ! या चार भिंतीमध्यें तो केवळ एक पुत्र आहे, पिता आहे, पती आहे आणि बंधू आहे ! स्वतःशिवाय इतर कोणालाहि शासन करण्याचा मला इथें अधिकार नाहीं ! म्हणून शासन करायचीच वेळ आली तर तें मी स्वतःलाच करीन !

**काशीबाई** : [ गालिच्यावर त्याच्याजवळ बसते ] रागावलांत ? क्षमा करायची मला. कांहींतरी वेड्यासारखं बोलून गेलें मी !

**बाजीराव :** मी तुझ्यावर रागावलों नाहीं. तूं विचारलेल्या आणि न विचारलेल्या प्रश्नांना माझ्याजवळ उत्तरें नाहींत म्हणून वाटणारा हा उद्वेग आहे. माझ्या स्वतःच्या असमर्थतेचा, दुर्बळपणाचा हा राग आहे !

**काशीबाई :** दुर्बळ ! सारा भरतखंड पादाक्रांत करणाऱ्या वीराला दुर्बळ कोण म्हणेल ?

**बाजीराव :** माझे शत्रू म्हणणार नाहींत, पण माझे मित्र म्हणतील; माझ्या घरांतलीं माणसं म्हणतील ! होय. मी दुर्बळ आहे. वैऱ्यांच्या समोर मी कितीहि बलवान् असलों तरी ज्यांना मीं माझं म्हटलं आहे त्यांच्यासमोरं मीसुद्धां दुर्बळ आहे, आणि स्त्रियांच्यापुढें तर माझ्या दुर्बळतेला मर्यादा नाहीं !

**काशीबाई :** ( हंसून ) मग गुन्हेगाराला गुन्हा कबूल आहे ?

**बाजीराव :** ( स्मित करून ) होय, मीं गुन्हा केला आहे, करीत आहे आणि बहुधा पुढेंहि करीत राहीन ! तिन्ही काळांतील ही गुन्हेगारी जमेला धरून राणीसाहेब जी शिक्षा फर्मावतील ती मला मान्य आहे !

**काशीबाई :** शिक्षा करणारे दांत आपलेच आणि अपराध करणारे ओंठहि आपलेच ! हा उदेपुरी रत्नहार गुन्हेगारानें आपल्या हातानं सरकारच्या गळ्यांत घालावा एवढीच शिक्षा तूर्त फर्मावण्यांत येत आहे !

**बाजीराव :** स्त्रिया न्यायाधीशाच्या कामाला अपात्र असतात यांत शंका. नाहीं. कोणत्याही पुरुषानं इतकी सौम्य शिक्षा केली नसती !

[ हार घालतो. ]

## प्रवेश तिसरा

[ विसाजीचें घर. विसाजी आणि महादेवशास्त्री बाहेरून प्रवेश करतात ]

**विसाजी :** पुण्याचे ब्राह्मण हे असेच ! बोलतांना बोलण्यांत आणि करण्याची वेळ आली म्हणजे पळण्यांत, पृथ्वीतलावर कोणालाहि हार जायचे नाहींत ! करणं हें क्रियापदच यांच्या कोशांत नाहीं !

**महादेवशास्त्री** : नाहीं तर काय ! रामेश्वराच्या मंदिरांत आपण एवढा डाव जमवून आणला पण शेवटीं सारं पाण्यांत गेलं !

**विसाजी** : तो संन्याशी येण्यापूर्वीं एकेकजण काय बृहस्पतीसारखा बोलत होता ! राजाचं कर्तव्य, प्रजेचा अधिकार, श्रुतींची आज्ञा, स्मृतींचा आधार ! कांहीं विचारूं नका ! आपलं मयूरासन सोडून सरस्वती यांच्या पगडीखालीं येऊन बसली आहे असंच एखाद्याला वाटायचं !

**महादेवशास्त्री** : त्या बैराग्यानंच सारा बेरंग केला ! धूमकेतूसारखा तो अकस्मात् सभेमध्यें उगवला नसता तर आज पुण्यांतला सारा ब्रह्मवृंद शनवारवाड्यावर जाऊन पेशव्यांची हजरी घेता ! तो येण्यापूर्वीं, बाजीरावाला विचारणा करण्याचा ठराव सर्वांनीं संमत केला होता !

**विसाजी** : पण मी म्हणतों, त्या गोसावड्याचं या धर्ममार्तंडांनीं ऐकावंच कां ? म्हणे बाजीराव अवघ्या भारतांत आज हिंदूंचं रक्षण करताहेत म्हणून त्यांच्या खाजगी वर्तनाची लोकांनीं चिकित्सा करूं नये ! लोकांनीं त्यांच्या वर्तनाची चिकित्सा करूं नये तर काय त्यांच्याबरोबर मरायला जावं ? ज्याचं स्वतःचं वर्तन धर्मशुद्ध नाहीं तो काय देशांतल्या धर्माचं रक्षण करणार ? क्षयरोग्यानं औषधालय खोलण्यासारखंच आहे हें ! म्हणे स्वराज्य—

**महादेवशास्त्री** : ज्या स्वराज्यांत आमच्या धर्माचं रक्षण होत नाहीं तें स्वराज्य आम्हाला नको !

**विसाजी** : मुळींच नको ! त्यापेक्षा दिल्लीची अविंध बादशाही फार उत्तम ! ब्राह्मणांच्या धर्मकर्माला तिनं नेहमीं उत्तेजनच दिलं आहे. तुम्हाला ठाऊक नसेल, पुण्यावर मोगलांची सत्ता होती तेव्हां आमच्या देवळाचं वर्षासन दोन शेकड्यांनीं अधिक होतं ! या स्वराज्यांत तें कमी झालं ! जाऊं द्या, रेषा आहे तोंपर्यंत सद्दी आहे हें तात्पर्य. आज ब्राह्मणांनीं आपलं कर्तव्य सोडलं तरी बाजीराव कांहीं मद्यमांससेवन सोडणार नाहींत. पुन्हा केव्हां तरी वेळ येईल ! बरं, आपल्या त्या कामाचं काय झालं ?

**महादेवशास्त्री** : तेंच सांगण्यासाठीं तुमच्याबरोबर आलों. काम झाल्यासारखंच आहे. एक फारच सुंदर वधू तुमच्यासाठीं शोधून काढली आहे !

**विसाजी** : वाहवा! मित्र असावे तर असे! अखेर आमची आणि सौंदर्याची गांठ पडणार म्हणतां! अगदीं थेट मस्तानी आहे का हो?

**महादेवशास्त्री** : जवळजवळ मस्तानीच! तिनं खाल्लेल्या विड्याचा पीक गळ्याच्या आंतून उतरतांना दिसतो म्हणतात, ही वयानं लहान असल्यामुळें हिच्या विड्याचा पीक गळ्याच्या बाहेरून उतरतांना फार तर दिसेल, इतकेंच! पूर्णिमेचा चंद्र, चाफ्याची कळी, कमलाचं फुल, हत्तीची गती, सिंहाची कंबर–सारीं काव्यांतलीं मोजमापं तंतोतंत लागूं पडतात!

**विसाजी** : तरी मी म्हणत होतों, या तिसऱ्या रेषेचं फळ फार सुंदर असणार म्हणून! अहाहा! अगदीं केवड्यासारखीं गोरीपान असेल नाहीं!

**महादेवशास्त्री** : अगदींच केवड्याइतकीं नाहीं. थोडी कमी येईल. थोडी म्हणजे बरीच–जरा काळीच आहे म्हणाना! हो, इतर सौंदर्य सगळं असलं तरी रंगानं चांगलीच काळी आहे ती!

**विसाजी** : अस्सं! ठीक ठीक! काळ्या रंगाला आपली मुळींच हरकत नाहीं. कृष्णासारखे आपले देवसुद्धां सावळे म्हणजे काळेच आहेत. आणि शास्त्रीबुवा, खरं सांगायचं म्हणजे नाकडोळे नीटस असले तर काळाच रंग अधिक मोहक दिसतो!

**महादेवशास्त्री** : आतां एक मात्र आहे! मुलगी सुंदर असली तरी एका पायानं जरा, जरा कसली चांगलीच लंगडी आहे.

**विसाजी** : ( ओरडून ) लंगडी आहे? (जरा सावरून) चालेल, लंगडीसुद्धां चालेल! मी तर म्हणतों, बायकांना दोन पायांची आवश्यकताच नाहीं. घरांतल्या घरांत फिरण्यापुरता एक पाय असला म्हणजे पुरे! दोन पाय असले कीं पळायची वासना होते. पतिव्रतेला पायच नसतात! ठीक मग आतां—

**महादेवशास्त्री** : आणखीहि एक सांगितलं पाहिजे. हो, वस्तु घरांत आणायची म्हणजे सारा तपशील माहीत असावा. मुलगी एका डोळ्यानं आंधळी आहे मात्र.

**विसाजी** : ( ओरडतो ) आंधळीहि आहे!—बऽरं. हरकत नाहीं. एकाच डोळ्यानं आंधळी आहे ना? मग तर कांहींच प्रत्यवाय नाहीं. जें एका डोळ्यानं दिसतं तेंच दोन डोळ्यांनीं दिसतं. दोन डोळ्यांनीं दुप्पट दिसत

असतं तर गोष्ट वेगळी! पण हें सोडलं तर मुलगी अगदीं मस्तानी आहे म्हणतां!

**महादेवशास्त्री** : त्यांत शंकाच नाहीं. आतां...नाक जरा बसकं आहे—

**विसाजी** : नाकाचं जाऊं द्या हो. तीन हात शरिरांत टिचभर नाकाचं महत्त्व तें किती?

**महादेवशास्त्री** : आणि तोंडावर देवीहि आहेत थोड्याशा!

**विसाजी** : देवीचं समजा. देवदर्शनासाठीं बाहेर जायला नको. पण बाकी—

**महादेवशास्त्री** : बाकीं अगदीं अप्सरा! शाखा, गोत्र, प्रवर वगैरे सारं कांहीं उत्कृष्ट जुळतं आहे. बाप थोडा आपत्तींत आहे. त्याला शेंसवाशें मोहरा द्याव्या लागतील मात्र!

**विसाजी** : शेंसवाशें मोहरा!

[ कावेरी प्रवेश करते ]

**कावेरी** : तुमच्या काकानं ठेवल्या आहेत! जा पाहूं तुम्ही बाहेर! पुन्हा अशा गोष्टी बोलायला इथं आलांत तर पहा!

**विसाजी** : अग पण ते–मी—

**कावेरी** : एक शब्द बोलूं नका. तुमच्या खांद्यावर डोकं आहे पण डोक्यांत मात्र कांहीं नाहीं! चांगली आंधळी पांगळी अप्सरा माझ्या छातीवर आणतां! ( वैद्याकडे वळून ) तुम्हांला जा म्हटलं ना?

[ महादेवशास्त्री जातो ]

आणि तुम्हीहि आंत चला. पुन्हां त्या तिसऱ्या रेषेचं नांव काढलंत तर तो हातच विळीनं कापून टाकीन. तिसरं लग्न करायला निघाले!

आंत जातात.

✤

# प्रवेश चवथा

[ शनिवारवाड्यांतील बाजीरावाचा महाल. साताऱ्याहून परत आलेला बाजीराव महालांत एकटाच बसलेला आहे. दुपारची वेळ टळून गेलेली आहे. बाजीराव एका प्रशस्त कोचावर अस्वस्थतेनें बसला असून जवळच्या एका तिपाईवर मद्याचें साहित्य आहे. ]

**बाजीराव** : ( उठून ) मानाजी ! मानाजी--

**मानाजी** : ( प्रवेश करून ) जी सरकार !

**बाजीराव** : सूर्य मावळतीवर आला. अद्यापसुद्धां ती आली नाहीं ?

**मानाजी** : नाहीं सरकार.

**बाजीराव** : [कांहींसें स्वतःशीं] अद्याप आली नाहीं ! आज आम्ही साताऱ्याहून परत येणार हें तिला ठाऊक असतं तर अशी पहाटे उठून सिंहगडच्या जंगलांत ती शिकारीला गेली नसती !

**मानाजी** : होय सरकार.

**बाजीराव** : मला धास्ती वाटूं लागली आहे ! सह्याद्रींतल्या साऱ्याच वनचरांवर तिला विजय मिळवतां यायचा नाहीं !--बरोबर जबाबदार माणसं आहेत ना ?

**मानाजी** : खाशा कोतवालींतील बारा भालाईत स्वार बाईसाहेबांनीं बरोबर घेतले आहेत सरकार.

**बाजीराव** : जा तूं. ती आल्याबरोबर मला खबर दे.

( मानाजी जातो. )

**बाजीराव** : ती जादुगारीण जवळ असली म्हणजे घटकांचीं पळें होतात आणि ती जवळ नसली म्हणजे पळांचीं युगें होतात ! या कंटाळवाण्या, सावकाराप्रमाणें सभोंवार तिष्ठत राहणाऱ्या काळाला छेदूं शकणारें हें एकच शस्त्र-( मद्याचा पेला उचलतो. ) मस्तानीच्या सौंदर्याचा, मस्तानीच्या सान्निध्याचा मी गुलाम होऊं लागलों आहे काय ? होय, ही गुलामगिरीच आहे ! फुलांप्रमाणें सुगंधी असली आणि संगीताप्रमाणें आकर्षक असली

तरी ही गुलामगिरीच आहे! मधुर गीताच्या आलापांनीं श्रोत्याच्या हृदयाला वेढे बसावे त्याप्रमाणें या कोमल गुलामगिरीच्या शृंखलांनीं बाजीराव बांधला जात आहे! कमलपुष्पाच्या पाकळ्यांचा कैदखाना—पण हा कैदखानाच आहे! जिंकणारा जिंकला गेला, विजयाचा पराभव झाला, अभिमानाची मान नम्र झाली! खरोखर, अबलांच्या सामर्थ्याला सीमा नाहीं! पृथ्वी पादाक्रांत करण्यासाठीं बाहूबल असलेला पुरुष परमेश्वरानें निर्माण केला आणि पुरुषाला पादाक्रांत करण्यासाठीं डोळ्यांत आसवं असलेलीं स्त्री त्यानें स्वतःच्या अंतःकरणापासून सिद्ध केली!

( मद्य पिऊं लागतो. )

[ चिमाजीआप्पा प्रवेश करतो आणि थबकून दाराजवळ उभा राहतो. ]

**चिमाजी** : रावसाहेब!

**बाजीराव** : ( घांदलीनें पेला दूर ठेवीत ) कोण, आप्पा!

**चिमाजी** : ( क्षणभर थांबून ) वडलांच्यापुढें माझ्यासारख्या कनिष्ठांनीं काय बोलावं? परंतु माझ्या नम्र बुद्धीला वाटतं कीं आपल्या हातून होत आहे तें बरं नाहीं. ज्ञातिधर्माच्या आणि व्यक्तिधर्माच्या दृष्टीनं हा प्रमाद आहे!

**बाजीराव** : ( गोंधळून ) होय, हा...प्रमाद आहे.

**चिमाजी** : आपण पार्थासारखे पराक्रमी आहांत आणि श्रीकृष्णासारखे बुद्धिमान आहांत! आपल्या तेजोबलावरच महाराष्ट्राचं महाभारत आज लिहिलं जात आहे. काल साताऱ्यामध्यें दरबारांत आपलं स्वागत करतांना छत्रपतींच्या डोळ्यांत प्रेमाचीं आसवं उभीं राहिलीं, प्रतिनिधींसारखे आंतरिक वैरीहि आपले स्तुतिपाठ गाऊं लागले, दौलतीचे लढवय्ये मानकरी आपलं भाषण ऐकल्यावर तरवारी उपसून आपल्या सभोंवार जयघोष करीत जमा झाले! साऱ्या महाराष्ट्राची, नव्हे, साऱ्या भारताची नजर आपल्याकडे नव्या निष्ठेनें पाहूं लागली आहे. या प्रेमाची, या निष्ठेची, या श्रद्धेची जबाबदारी आपल्या शिरावर आहे याची अत्यंत नम्रपणानं मी आपल्याला आठवण करून देतों. धावडशीहून ब्रम्हेंद्रस्वामींनीं आपल्या अभिनंदनासाठीं सेवक पाठवले आहेत. त्यांचे शुभाशिर्वाद आपल्याला सांगण्यासाठीं मी आलों

होतों. अधिकाराचा अतिक्रम करून कांहीं शब्द उच्चारून गेलों असेन तर धाकट्यांचा राग धरूं नये. जातों मी.

[ चिमाजी जातो. ]

**बाजीराव** : राग! वेड्या, तुझ्यावर मला कधी रागावतां येईल कां? माझ्या आप्पाचा इतका विरोध असेल, त्याचं मन दुखावत असेल तर-तर या क्षणाला हा मद्याचा पेला मी कायमचा झुगारून देतों, फेकून देतों!

[ पेला दूर भिरकावून देतो. त्याच क्षणी—फुटणाऱ्या काचेची खळखळ होत असतांच—मस्तानी प्रवेश करते. शिकारीला आवश्यक असा वेष तिनें केलेला असून तिच्या कमरेला मोठा थोरला जंबिया अडकवलेला आहे. ]

**मस्तानी** : देव पावला!

**बाजीराव** : कुणाला?

**मस्तानी** : मस्तानीला आणि मस्तानीच्या या देशाला, महाराष्ट्राला! इकडे येतांना आप्पासाहेबांची चर्या पाहिली आणि मीं ओळखलं कीं या महालांत त्यांच्या नजरेला जें दृश्य दिसलं तें कांहीं फारसं मनोवेधक नव्हतं! मी अहोरात्र सांगत असतां हा पेला हातांतून दूर झाला नाहीं, पण आप्पासाहेबांच्या केवळ दृष्टीपातानें तो हातांतून दूर झाला आणि दुभंग होऊन पायाशीं पडला!...मला भीती वाटायला लागली आहे!

**बाजीराव** : भीती?

**मस्तानी** : [ किंचित् हसते आणि जंबियाचा पट्टा काढून तो तिपाईवर टाकते ] मी भीती म्हणालें? मला आनंद म्हणायचं आहे! या पेल्याच्या गुलामगिरींतून आपली सुटका झाल्याचा आनंद!

**बाजीराव** : एखाद्या माणसाच्या अंतःकरणाची ओळख त्याच्या अगदीं अंतःकरणाजवळ असलेल्या माणसांनासुद्धा होत नाहीं हेंच खरं! मद्याच्या या चिमुकल्या पेल्यामध्यें बाजीराव आपल्या साऱ्या कर्तृत्वासह बुडून जाऊं शकेल असं तुलासुद्धा वाटतं कां?

**मस्तानी** : आपणच काय, पण सातां समुद्रांना पुरून उरलेली पृथ्वीसुद्धा आपल्या वक्षस्थळावरील साऱ्या पर्वतांसह या चिमुकल्या पेल्यामध्यें बुडून जाऊं शकेल! म्हणूनच म्हटलं, देव पावला!

**बाजीराव** : देव इतक्या सुखासुखीं पावत नाहीं! जी भीती तूं दडवलीस तीहि अस्थानीं आहे आणि जो आनंद तूं व्यक्त केलास तोहि अस्थानीं ठरण्याचा संभव आहे! बाजीरावाकडे यायला मस्तानीनं पुन्हा असा उशीर केला तर पायदळीं पडलेला हा पेला परत ओंठाशीं आल्यावाचून रहायचा नाहीं!

**मस्तानी** : [ जवळ येऊन ] राग आला का? स्वारी आल्याची वार्ता समजली आणि घोड्यावरून उतरल्याबरोबर तशीच इकडे धावत आलें. राग मलाच यायला हवा आणि खरं म्हणजे मी रागावलेलीच आहे!

**बाजीराव** : कां? सारा दिवस रानांत घालवूनहि शिकार गवसली नाहीं?

**मस्तानी** : मी कांहीं शिकारीसाठीं शिकारीला जात नाहीं!

**बाजीराव** : मग वाघसिंहांना आपलं सौंदर्य दाखवण्यासाठीं?

**मस्तानी** : कांहीं तरीच! एका सिंहानं मला गिळून टाकलं तेवढं पुरें आहे! ओळखा पाहूं आपणच!

**बाजीराव** : मी कसं ओळखणार? बायकांच्या हृदयांतलीं रहस्यं कळूं नयेत म्हणून परमेश्वरानेंच त्या स्थळावर कडेकोट बंदोबस्त करून ठेवला आहे!

**मस्तानी** : बायकांच्या हृदयापर्यंत जायची पुरुषांना इच्छा असतेच कुठें? घरांत जायचं नसलं म्हणजे दाराशींच उभं राहणं सोइस्कर असतं! बायकांच्या हृदयाला रहस्य म्हटलं म्हणजे तें ओळखून घेण्याची जबाबदारी टळते!

**बाजीराव** : मला ही जबाबदारी तरी टाळायची नाहीं! कां रागावलीस तूं?

**मस्तानी** : खरंच समजत नाहीं का? साताऱ्याहून एक स्वार अगोदर पाठवला असतां तर मी अशी दिवसभर जंगलांत जाऊन बसलें असतें वाटतं? पण दरबारच्या गौरवांत आणि स्वागताच्या जलशांत या बिचाऱ्या कंचनीची आठवण कुठून व्हायला?

**बाजीराव** : जिनं अवघ्या स्मृतीचा ताबा घेतला आहे तिची वेगळी आठ-

वेण कशीं करतां येईल ? साताऱ्यांत बाजीरावाच्या नांवाचा, पण बाजीरावाच्या अंतःकरणांत मात्र मस्तानीच्या नांवाचा जयघोष चाललेला होता !

**मस्तानी** : पुरें झालीं हीं मोहक बोलणीं ! बायका बिचाऱ्या भोळ्याभाबड्या. दोन सुंदर शब्दांचे पाश टाकून केव्हांहि त्यांना बोलतां बोलतां ओढून घ्यावं !

**बाजीराव** : पुरुषांना शब्द तरी उच्चारावे लागतात. पण स्त्रिया हें संहाराचं काम केवळ डोळ्यांनींच करतात ! पण त्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर राहिलंच ! कशाकरितां शिकारीला जातेस तूं ?

**मस्तानी** : हरलों म्हणून कबूल करा ! आपल्या तोंडून हरलों हा शब्द ऐकला म्हणजे फार मौज वाटते !

**बाजीराव** : असत्य नेहमींच ऐकायला आल्हाददायक असतं ! बरं बुवा हरलों—

**मस्तानी** : म्हणजे हें खोटं ! मी नाहीं सांगणार !

**बाजीराव** : खरंच हरलों. तुझ्यापुढें मी हरलों ! हें अगदीं त्रिकालाबाधित सत्य आहे. सांग बघूं आतां.

**मस्तानी** : जें ठाऊक आहे तेंच वदवून घ्यायचं ! मी शिकारीला जातें ती हत्यारं वापरायची आणि घोडा भरधाव फेकायची संवय अधिक वाढावी म्हणून ! स्वारीवर असतांना आपल्या रिकिबीच्या बरोबर माझ्या रिकिबी असायला हव्यात. रेसभर मी मागे रहातां कामा नये !

**बाजीराव** : मग तुला स्वारीवर न्यायला प्रत्यवाय नाहीं ! कारण बाजीरावबरोबर जाऊं पाहणाऱ्या प्रत्येक माणसानें पळण्यामध्यें तरबेज रहायला पाहिजे.

**मस्तानी** : अर्थात् पुढच्या दिशेला !

**बाजीराव** : मागच्या दिशेलासुद्धा. पुढच्या दिशेला सारेच पळतात. मागच्या दिशेला पळण्यासाठीच खरं मनोधैर्य लागतं !

**मस्तानी** : आमच्या पराक्रमी पेशव्यांची अशी नालस्ती करूं नका ! पेशवे लढतात, पळत नाहींत !

**बाजीराव** : तुमच्या पेशव्यांची आणि त्यांच्या पराक्रमाची आम्हाला

अधिक माहिती असण्याचा संभव आहे! पळण्याची सिद्धता ठेवूनच ते लढायला जातात.

**मस्तानी** : पळणाऱ्या माणसाला कोणी पराक्रमी म्हणेल वाटतं?

**बाजीराव** : पराक्रमाच्या त्या पुरातन, दगडी कल्पना या शिवाजीच्या महाराष्ट्रांत तरी शिल्लक राहिलेल्या नाहींत. मराठ्यांचा पराक्रम पळण्यावर आधारलेला आहे. बाजीराव पळण्यांत पारंगत नसता तर मोगलांपुढें आणि रजपुतांपुढें तो पावलोंपावलीं पराभूत झाला असता!

**मस्तानी** : पराक्रमाच्या त्या दगडी कल्पनाच मला वाटतं अधिक श्रेष्ठ आहेत!

**बाजीराव** : अधिक रानटी आहेत! रजपूत-मोगलांचा पराक्रम आपल्या जीवनाचं समर्पण करण्यांत आहे, तर आम्हां मराठ्यांचा पराक्रमं जीवनाचं संरक्षण करण्यांत आहे. ते मरण्यासाठीं लढतात, आम्हीं जगण्यासाठीं आणि जिंकण्यासाठीं लढतों. अखेरच्या विजयासाठीं आम्हीं प्रसंग पडेल तेव्हां हंसतमुखानें पळतों, पराभवांचं स्वागत करतों! पळण्याची अथवा पराभवाची आम्हाला लज्जा वाटत नाहीं. मराठे लोक अधिक सुसंस्कृत आहेत!

**मस्तानी** : आणि जे क्षणार्धांत आपल्या प्राणांचं बलिदान करतात त्या वीरांची संस्कृति काय हीन समजायची?

**बाजीराव** : अर्थातच! रानटी लोकांना आपल्या जीविताबद्दल आस्था नसते कारण त्यांच्या जीवितांत जगण्यासारखं फारसं कांहीं असत नाहीं. ज्यांचं जीवन समृद्ध आहे ते आपल्या प्राणांचा असा सुखासुखीं त्याग करणार नाहींत! मस्तानी, तूं माझ्या शौर्यावर मोहित होऊन माझ्याकडे आलीस; आतां दीड वर्षानंतर तुला सांगायला हरकत नाहीं कीं मी पराक्रमी नाहीं, शूर नाहीं; तर पळण्यांत पारंगत असलेला एक साधा मराठा शिपाई आहे!

**मस्तानी** : फार उशीरां सांगितलंत! परंतु पराक्रमासंबंधींच नव्हे तर बाजीरावासंबंधींच्या माझ्या कल्पनासुद्धा दगडी, अगदी संगमरवरी आहेत! आपल्या शब्दांनींसुद्धा त्या वितळणार नाहींत!

[ मानाजी प्रवेश करतो. ]

**मानाजी** : सरकार, आप्पासाहेबांचा निरोप आहे. जंजिऱ्याच्या शामला-कडून वकील आले असून ताबडतोब आपली भेट होण्याची ते प्रार्थना करीत आहेत. भेट घेऊन त्यांना लागलींच माघारी परतायचं आहे.

**बाजीराव** : ठीक आहे. इकडेच त्यांना पाठवून दे.

[ मानाजी जातो. ]

**मस्तानी** : इकडेच बोलावलंत ? मी जातें—

**बाजीराव** : जायचं कारण नाहीं. आणि जायला माझी परवानगीहि नाहीं !

**मस्तानी** : भलतंच काय ? अगोदरच वाड्यांत आणि पुण्यांत चर्चेला प्रारंभ झाला आहे—

**बाजीराव** : ज्या गोष्टीला प्रारंभ आहे तिला शेवटहि असल्याशिवाय रहात नाहीं. त्या शेवटाकडेच माझी नजर आहे.

**मस्तानी** : ( असहाय्यतेनें ) नको. जायला परवानगी असावी ! मसलत आटोपतांच मी परत येतें—

**बाजीराव** : परवानगी नाहीं !

[ मानाजी ललकारी देतो. जंजिऱ्याचा वकील, त्याचे दोन सहकारी आणि चिमाजी आप्पा प्रवेश करतात. बाजीरावला मुजरा करून ते उभे राहतात. चिमाजी मस्तानीकडे एकदां पाहतो आणि तिला वाट देण्यासाठी दरवाजांपासून दूर होतो. ]

**बाजीराव** : बसा, नबाबांकडून कांहीं तातडीचा निरोप आहे ?

**वकील** : होय सरकार....

**चिमाजी** : मस्तानी बाईसाहेबांना जायची परवानगी असावी !

**बाजीराव** : ती इथं असायला माझी हरकत नाहीं.

**चिमाजी** : माझी आहे! ( अधिक सौम्यपणानें ) आणि मला वाटतं स्वतः बाईसाहेबांचीहि आहे.

**मस्तानी** : होय, माझीच हरकत अधिक आहे. मी परवानगी घेतें !

[ जाऊं लागते, सर्वजण बाजूला होतात. ]

: पडदा :

## : ३ :

### प्रवेश पहिला

[आठ वर्षांचा काळ उलटलेला आहे. नादीरशहाच्या] स्वारीचें भयानक संकट उत्तर हिंदुस्थानावर आलेलें आहे.

सातारा येथील छत्रपतींच्या राजवाड्यांतील एक दालन. वेळ सकाळची. शाहू आणि प्रतिनिधी प्रवेश करतात. नुकतेच आलेले कांहीं खलिते शाहूच्या हातांत आहेत.]

**शाहू :** खुद्द दिल्लीपतींना, महमदशहालासुद्धा अटक झाली!

**प्रतिनिधी :** होय, महाराज. नादीरशहानं बादशहाला अटकेंत ठेवून आपल्या नांवाची द्वाही दिल्लींत फिरवली आहे. सादतखानासारखे कांहीं ताम्र फितूर झाले; जे फितूर झाले नाहींत त्यांना तृणाप्रमाणें पायाखालीं चिरडण्यांत आलें आहे.

**शाहू** : पुराणेतिहासांत तैमूरशहानं केलेल्या स्वारीचा वृत्तान्त आम्हीं ऐकला आहे. तसलीच दानवी आपत्ती आज आमच्या भारतावर पुन्हां आली आहे !

**प्रतिनिधी** : तैमूरची स्वारीसुद्धां या मानानें कमी लेखावी लागेल. जासूदांकडून घडोघडीं ज्या वार्ता येत आहेत त्यावरून उत्तर देशांत प्रलयकालच ओढवला आहे असं दिसतं. हजारों माणसांच्या कत्तली होत असून दिल्ली शहराचा कबजा तर प्रत्यक्ष काळपुरुषानंच घेतला आहे. शिशिरांत पडणाऱ्या पाचोळ्याप्रमाणें रस्त्यांत प्रेतांच्या राशी पडत आहेत ! देवालयांतले देव आणि स्त्रियांचं पावित्र्य प्रत्यहीं नष्ट होत आहे, नगरें बेचिराख होत आहेत. प्रजेचा इतका संहार, इतका विनाश यापूर्वी भारतांत कधींहि झाला नसेल !

**शाहू** : हिंदुस्थानची लज्जा मराठ्यांनीं राखली पाहिजे आणि मराठेच ती राखायला समर्थ आहेत !

**प्रतिनिधी** : नादीरशहाचा रोख मराठ्यांवरच आहे. जयपूरहून वकिलाचा इशारा आहे कीं दीड लक्ष तूर्क आणि दुराणी घेऊन नादीरशहा दक्षिणेकडे ढाला वळवण्याची मसलत करीत आहे.

**शाहू** : चिमांजी अद्याप कसे येत नाहींत ? बाजीरावांसाठीं स्वारीचं आज्ञापत्र आम्हीं तयार करून ठेवलं आहे. परंतु आवश्यक असेल तर आम्ही स्वतः जातीनें, सारे मानकरी सभोंवार घेऊन बादशहांना कुमक करण्यासाठीं दिल्लीकडे जायला सिद्ध आहोंत.

**प्रतिनिधी** : स्वामींनी हे श्रम आणि ही जबाबदारी घेऊं नये असं मला वाटतं. नादीरशहाचा निःपात करायला बाजीरावसाहेबांचं कर्तृत्व पुरेसं आहे. किंबहुना बाजीरावांचा अनुभव, त्यांच्या लढण्याच्या पद्धती आणि त्यांच्या नांवाचा दरारा या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतल्या तर इराण्याचं पारिपत्य करण्याची जबाबदारीं सर्वस्वीं त्यांच्यावरच सोपवणं इष्ट आहे.

**शाहू** : प्रतिनिधींचे हे शब्द बाजीरावांनी ऐकले असते तर त्यांना खचित समाधान वाटलें असतें !

**प्रतिनिधी** : अवघ्या राष्ट्रावर ही आपत्ती ओढवली असतांना जे लोक घरांतले कलह भांडत बसतील ते अधम राष्ट्रद्रोही होत ! प्रतिनिधींच्या

हातून असलं पापकृत्य व्हायचं नाहीं. आम्ही पेशव्यांना विरोध केला तो स्वार्थासाठीं नव्हे, दौलतीसाठीं! गेल्या आठदहा वर्षांत पेशव्यांनी हिंदुपद-शाहीची वैभवशाली इमारत उभी केली आहे. त्यांच्या कर्तबगारीच्या प्रवाहांत घरांतली वैरं वाहून गेलीं! आणि म्हणूनच मी अभिमानानं सांगतों कीं नादीरशहाचं पारिपत्य करायला बाजीराव हे एकटेच समर्थ आहेत.

[ चिमाजी प्रवेश करतो. ]

**चिमाजी** : या शब्दांबद्दल मी प्रतिनिधींना अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतों. महाराजांचा आशीर्वाद आणि आपल्यासारख्यांच्या सदिच्छाच पेशव्यांना या संकटांत सहाय्य करतील.

**शाहू** : प्रतिनिधी, हें आज्ञापत्र आम्ही तयार केलं आहे. तें दप्तरांत रवाना करून त्यावर शिक्कामोर्तब करण्याची व्यवस्था करा. आम्ही तिकडे येतोंच.

**प्रतिनिधी** : आज्ञा.

[ आज्ञापत्र घेऊन जातो ]

**शाहू** : चिमाजी, पंतप्रधानांना एका जबरदस्त शत्रूशीं, साक्षात् यमराजा-शींच झुंज द्यायची आहे. फौजफाट्याची दरोबस्त तयारी झालेली आहे ना?

**चिमाजी** : सारी सिद्धता आहे महाराज. शनवारवाड्याच्या उंबरठ्यावर पाय ठेवून रावसाहेब उभे आहेत. आज्ञापत्र हातीं पडतांच ते घोड्यावर स्वार होतील.

**शाहू** : आणि रावसाहेबांच्या प्रकृतीची वार्ता काय?

**चिमाजी** : प्रकृती ठीक आहे–पण–पण–

**शाहू** : पण काय?

**चिमाजी** : स्वामींना सारं माहीत आहे. मस्तानी आणि मद्य यांचा मोह अद्याप सुटत नाहीं.

**शाहू** : आम्ही समजतों बाजीराव तुमच्या शब्दाचं उल्लंघन करीत नाहींत, तुमच्या शब्दामुळे ते मर्यादेंत राहात असतील.

**चिमाजी** : आमच्या शब्दासाठीं आठ दिवस अलिप्त राहतात! परंतु हें आठ दिवस वैऱ्यासारखे जातात. कोणाशीं बोलत नाहींत, चालत नाहींत,

घरांत असून घराबाहेरच्याप्रमाणें राहतात. हा सप्ताह संपला कीं हातांत मद्याचा पेला दिसूं लागतो !

**शाहू** : मद्यपान मर्यादित राहिलं तर सामान्यतः तें संपादूं शकेल. पण आत्तांचा प्रसंग सामान्य नाहीं ! मद्य हें स्वभावतः अमर्याद आहे. आणि या आणीबाणीच्या प्रसंगीं ही मर्यादा सुटली तर केवळ पेशव्यांच्या पराक्रमाचाच नव्हे, तर साऱ्या मराठी दौलतीचा विनाशकाल जवळ ओढवेल !

**चिमाजी** : म्हणूनच महाराजांचा सल्ला घेण्यासाठीं मी जातीनं आलों. आपल्याशिवाय आम्हाला वडीलधारे कोणी नाहींत.

**शाहू** : काय करायचं ठरवलंय् तुम्हीं ?

**चिमाजी** : मोहिमेवर जाण्याचा मस्तानीनं हट्ट धरला तर तिला अटक करायचं ठरवलं आहे !

**शाहू** :- मस्तानीला अटक ?

**चिमाजी** : मस्तानीला अटक करणं हा एकच आणि अखेरचा मार्ग आतां शिल्लक राहिलेला आहे. याच वेळीं गोष्टी निकरावर याव्या हें खचित दुर्दैव आहे ! पण त्या आल्या आहेत. आम्ही स्वारीवर जाण्यापूर्वीं रघुनाथ आणि जनार्दन या दोघांचेहि व्रतबंध उरकून घेण्याचें ठरलें आहे–आईची तशी इच्छा आहे. परंतु पुण्यांत याचवेळीं बहिष्काराची वावटळ उठली असून रावसाहेबांनीं प्रायश्चित्त घेतल्याशिवाय शनिवारवाड्यांत पौरोहित्य करण्यास कोणी तयार होतील असा संभव दिसत नाहीं !

**शाहू** : प्रायश्चित्त घ्यायला बाजीरावांची तयारी आहे ?

**चिमाजी** : कांहीं प्रतिष्ठित पंडितांनीं रावसाहेबांची त्यासाठीं भेट घेतली, पण क्रोधाच्या भरांत रावसाहेबांनीं त्यांचा अपमान केला आणि त्यांना परत पाठवलं !

**शाहू** : याच्या मुळाशीं मस्तानी आहे ?

**चिमाजी** : सर्व अनर्थांच्या मुळाशीं मस्तानीच आहे ! मस्तानीमुळें मद्य-मांसाहार आणि मद्य–मांसाहारामुळें मस्तानी अशी ही संकटांची कारणपरंपरा आहे. त्या एका जळत्या निखाऱ्यानं पेशव्यांच्या घरांत अग्नीचा कल्लोळ

उठवला आहे! म्हणून साऱ्या अनिष्टाला कारणीभूत असलेली ही यावनीच रावसाहेबांपासून दूर केली पाहिजे.

**शाहू** : पण वस्तू दूर केली तर साहेबांचं चित्त अप्रसन्न होण्याचा संभव आहे!

**चिमाजी** : तो संभव मी जमेला धरला आहे. परंतु लढाईच्या, मोहिमेच्या नादांत रावसाहेब इतके रमून जातात कीं या वातावरणाच्या बाहेर जातांच त्यांच्या चित्ताची जखम भरून आल्याशिवाय रहाणार नाहीं. धोका आहे पण तो पत्करला पाहिजे. घराण्याच्या इभ्रतीसाठीं, राज्याच्या रक्षणासाठीं आणि खुद्द रावसाहेबांच्या हितासाठीं!

**शाहू** : चिमाजी, आम्हांला ठाऊक आहे, इतर कोणाहीपेक्षां तुमची निष्ठा रावसाहेबांवर अधिक आहे. तुम्ही कराल तें त्यांच्या कल्याणासाठीं यांत आम्हाला मुळींच संदेह वाटत नाहीं. तुम्हांला योग्य वाटेल आणि सुचेल त्याप्रमाणें करा! माझ्या त्या उमद्या, लाडक्या सिंहाचं मन विशेष दुखावलं जाऊं नये इतकीच माझी इच्छा आहे. आमचं आतां म्हातारपण झालं. तुमच्या वडलांनीं या दौलतीचं बीजारोपण केलं. बाजीरावसाहेबांनीं जिवाची तमा न बाळगतां, सतत घोड्यावर स्वार राहून, छावणीचं घर करून त्या बिजाचा वृक्ष फळाफुलांनीं समृद्ध केला. त्यांच्या श्रमी जिवाला दुःख झालेलं माझ्या म्हाताऱ्या डोळ्यांना पहावणार नाहीं एवढंच मला सांगायचं आहे. चला, आज्ञापत्र सिद्ध झालं असेल.

[ दोघे जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ पुणें शहरांतील रस्ता. विसाजी, महादेवशास्त्री आणि इतर कांहीं ब्राह्मण प्रवेश करतात. ]

**विसाजी** : प्रायश्चित्त!

**महादेवशास्त्री** : अर्थात् प्रायश्चित्तच !

**ब्राह्मण** : बाजीरावानें प्रायश्चित्त घेतल्याशिवाय कोणत्याहि ब्राह्मणानें शनिवारवाड्यांत पाऊल टाकतां कामा नये !

**विसाजी** : मग आमच्या दक्षणा, आमचीं वर्षासनं बुडालीं, तरी हरकत नाहीं !

**ब्राह्मण** : खुशाल बुडोत ! दक्षणा आज बुडतील, उद्यां मिळतील. पण धर्म बुडाला कीं त्या कायमच्याच बुडाल्या. म्हणून सज्जनहो, धर्म बुडूं देतां कामा नये !

**महादेवशास्त्री** : शाबास ! पुण्याचे ब्राह्मण सत्यासाठीं, धर्मासाठीं कसलाहि त्याग करायला सिद्ध आहेत हें साऱ्या आर्यावर्ताला समजेल !

**विसाजी** : आणि हेंहि समजेल कीं पुण्याच्या ब्राह्मणांना बाजीराव पेशव्याचीसुद्धां भीति वाटत नाहीं !

**ब्राह्मण** : मुळींच वाटत नाहीं ! आम्ही साफ, स्पष्ट, स्वच्छ बाजीरावना सांगणार कीं मुलांचे व्रतबंध करायचे असतील तर प्रथम आपण प्रायश्चित घेतलं पाहिजे !

**महादेवशास्त्री** : नाहीं तर व्रतबंध होणार नाहीं !

**विसाजी** : आज होणार नाहीं, उद्यां होणार नाहीं, परवां होणार नाहीं ! पेशव्यांच्या घरांत व्रतबंध म्हणून होणार नाहीं !

**ब्राह्मण** : कुठलंच धर्मकृत्य होणार नाहीं !

**महादेवशास्त्री** : कांहीं विद्वान् म्हणतात कीं बाजीराव नादीरशहाच्या स्वारीवर निघत आहे, त्याला या वेळीं विरोध करूं नये ! पण मी म्हणतों धर्माला काळ नाहीं अन् वेळ नाहीं !

**विसाजी** : आणि धर्म नादीरशहा बिदीरशहा ओळखीत नाहीं !

**ब्राह्मण** : पण काय हो, बाजीराव रागावले आणि त्यांनीं कांहीं भलतंच केलं म्हणजे ?

**महादेवशास्त्री** : आतां आणखीन् काय भलतंच करायचं ठेवलं आहे त्यांनीं !

**ब्राह्मण** : तसं नाहीं हो ! आपल्या बाबतींत कांहीं भलतंच केलं–म्हणजे–समजा कोतवाली स्वार वगैरे आपल्यावर सोडले तर ?

**विसाजी** : हो, हा प्रश्न मात्र महत्त्वाचा आहे ! धर्म न मानणारा माणूस तो. ब्रह्महत्त्या करायला मागेपुढें पहायचा नाहीं !

**ब्राह्मण** : कर्दनकाळांसारखे दिसणारे ते कोतवालींतले भयानक शिपाई–

**विसाजी** : त्यांचे ते उंच, पहाडी घोडे आणि त्यांच्या हातांतल्या त्या लांब लखलखत्या तरवारी—

**ब्राह्मण** : खांद्यावरच्या त्या अजस्त्र काळ्या बंदुका—

**विसाजी** : आणि कमरेला लटकणारे करवती जंबिये—

**ब्राह्मण** : मला वाटतं हें सारं प्रकरण सध्या तहकूब करावं ! म्हणजे प्राणहि राहतील आणि वर दक्षिणाहि मिळेल !

**विसाजी** : मलाहि असंच वाटूं लागलं आहे. मी म्हणजे भितों आहें अशांतला भाग नाहीं. पण ते कोतवालींतले शिपाई जरा ब्रह्मद्वेष्टेच आहेत.

**महादेवशास्त्री** : आतां आपण कांहीं केलं तरी हें प्रकरण थांबत नाहीं. रामेश्वराच्या देवळांत हजारों लोक जमा झाले असून नगरांतलि प्रतिष्ठित पंडितांनीं आणि वेदाचार्यांनीं मोर्चाचं नेतृत्व घेतलं आहे. या थोर पुरुषांवर हत्यार चालवायची कोणाची ताकद आहे ? आणि अंतस्थ बातमी अशी कीं चिमाजी आप्पा आपल्याच बाजूचे आहेत !

**विसाजी** : मग चला ! चिमाजीपुढें बाजीरावची काय कथा ?

**महादेवशास्त्री** : आज सोन्यासारखी संधी आहे. दोन चार दिवसांत बाजीराव स्वारीवर निघायचे आहेत. त्यापूर्वीं वाड्यांतील सर्व मुलांचे व्रतबंध त्यांना उरकून घ्यायचे आहेत.

**ब्राह्मण** : सर्वांचे म्हणजे त्यांत मस्तानीचा मुलगासुद्धां जमा आहे काय ?

**महादेवशास्त्री** : त्याचीसुद्धां मुंज लावावी असा बाजीरावचा आग्रह आहे म्हणतात !

**विसाजी** : आम्ही त्याची मुंज लावणार नाहीं ! मस्तानीच्या गोतांतला एखादा मौलवी त्यासाठीं घेऊन या म्हणावं. तो लावील !

**महादेवशास्त्री** : चला, लौकर रामेश्वराला गेलं पाहिजे.

**विसाजी** : हो, नाहींतर तिकडे बाजीराव प्रायश्चित्त घेऊन स्वारीवरहि निघायचा !

[ सर्व जण जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ शनिवारवाड्यामधील मस्तानीचा महाल. वेळ दुपारची. महालांत बाजीराव आणि मस्तानी हीं दोघें असून बाजीराव प्रक्षुब्ध मनस्थितींत आहे. महालाच्या बाहेरून, शनिवारवाड्यापाशीं आलेल्या ब्राह्मण जमावाच्या आरोळ्या आणि घोषणा आंत ऐकूं येत आहेत. बाजीराव उठून खिडकीजवळ जातो आणि संतापानें खिडकी बंद करून परत अलीकडे येतो. ]

**बाजीराव** : बाहेर जाऊन या क्षुद्र कीटकांना ठेंचून चिरडून टाकूं का ?

**मस्तानी** : असा संताप करून घ्यायचा नाहीं ! पंतप्रधानाच्या थोर हुद्दयाची जबाबदारी आपल्यावर आहे आणि आज तर नादीरशहाच्या स्वारीनं ती दुणावली आहे. क्षुद्रांकडून होणारा अपमान ही मोठेपणासाठीं द्यावी लागणारी किंमत आहे !

**बाजीराव** : [ कोचावर बसतो. ] छत्रपतींचा पंतप्रधान होण्याऐवजीं त्यांच्या फौजेंतला एखादा सामान्य बारगीर झालों असतों तर मला अधिक स्वतंत्रता लाभली असती ! पण मोठेपणाच्या दगडी कारागृहांत मी बंदीवान् झालों आहे–कायमचा बंदीवान् झालों आहे ! ज्या समाजांत जन्माला आलों त्याचं ऋण फेडण्यासाठीं तळहातावर शिर घेऊन रक्ताचा शिडकाव करावा आणि विश्रांतीसाठीं चार दिवस घरीं आल्यावर कांहीं मूर्खांचे लत्ताप्रहार माथ्यावर झेलण्यासाठीं मान नम्र करावी ! नाहीं, आतां हे आघात सहन करण्याचं सामर्थ्य माझ्यांत उरलं नाहीं !

**मस्तानी** : महाराज, माझ्या जिवाची शपथ आहे, आपल्या लाडक्या

समशेरची शपथ आहे, असा त्रास करून घेऊं नये! दोन दिवसांनीं हा शनिवारवाडा, हें शहर, हें सारं वातावरण सोडून आपल्याला स्वारीवर निघायचं आहे-तेवढा वेळ मन शांत ठेवावं.

**बाजीराव :** होय, ठेवलंच पाहिजे! पंतप्रधानानं मन शांतच ठेवलं पाहिजे!...मस्तानी, या साऱ्या सरंजामाचा मला खरोखर उबग आलेला आहे! असं वाटतं, जिथें राजकारण नाहीं, जिथें मनसुबे नाहींत, जिथं स्वाऱ्या नाहींत, जय नाहींत, पराजय नाहींत आणि घराच्या सभोंवार दंगल माजवणारे धर्माचे पालनकर्ते नाहींत अशा एखाद्या निवांत ठिकाणीं जाऊन झोंपडी बांधावी आणि मस्तानीसह तिथें वनचरांप्रमाणें सुखानं कालक्षेप करावा! माणसाच्या सुखासाठींच जन्माला आलेली ही संस्कृति माणसाच्या सुखाचाच वध करीत आहे!

**मस्तानी :** रानांत वनचरांप्रमाणें राहण्यासाठीं महाराज, आपला जन्म नाहीं! परमेश्वरानं माणसाच्या ललाटांत त्याचं अवतारकार्य लिहून ठेवलेलं असतं. मराठी दौलतीच्या सरहद्दी पेशावर काबूलपर्यंत पोंहोंचविणं हें बाजीरावांचं अवतारकार्य आहे आणि कांहीं झालं तरी तें त्यांनीं तडीला न्यायला पाहिजे.

**बाजीराव :** पायाखालीं निखारे जळत असतांना, हातांतली समशेर उभी ठेवायची ही गोष्ट मानवी शक्तीबाहेरची आहे! बाजीराव झाला तरी त्याच्या सहनशक्तीला सीमा आहे! आज आठ वर्षें घरादारांत पेटलेला हा वणवा, चितेवर पडलेल्या प्रेताप्रमाणें बोलल्याशिवाय, हातपाय हालवल्याशिवाय सहन करतों आहे—

**मस्तानी :** महाराज, राग येणार नसेल तर एक गोष्ट विचारायची परवानगी घेतें.

**बाजीराव :** तूं काय विचारणार हें मला माहीत आहे. तुझ्या जिभेनं तो प्रश्न अद्याप विचारलेला नाहीं पण तुझ्या दोन्ही डोळ्यांनीं मात्र तो अनेकदां विचारलेला आहे. आणि त्या प्रश्नाला मी काय उत्तर देईन हेंहि तुला माहीत नाहीं असं नाहीं.

**मस्तानी :** [खालीं कोचाजवळ बसून, डोळ्यांतलीं आसवं लपविण्याचा प्रयत्न

न करतां ] मला माहीत आहे, महाराज, मला माहीत आहे ! पण–पण आतां ही गोष्ट पराकोटीला पोंहोंचली आहे. माझ्यापासून आपल्याला सुखापेक्षां दुःखच अधिक व्हायला लागलं आहे, आपल्या कर्तव्यांत अंतर पडायला लागलं आहे ! मला परवानगी द्या. या पायांची आठवण करीत उत्तरेकडच्या कोठल्या तरी खेड्यांत मी आनंदानं राहीन आणि आपल्या वाढत्या पराक्रमाच्या कथा ऐकून धन्यता मानीन !

**बाजीराव** : मस्तानी जवळ नसल्यावर पराक्रम कुठचा आणि...जीवन तरी कुठचं !

**मस्तानी** : ( उठते ) असं भलतंसलतं मी बोलूं देणार नाहीं ! पेशव्यांचं जीवन इतकं स्वस्त नाहीं कीं एका क्षुल्लक कंचनीसाठीं तें बरबाद व्हावं !

**बाजीराव** : नाहीं, मस्तानी, ही कल्पनाहि मला सहन होत नाहीं ! माझ्या शिरावरील साऱ्या जबाबदाऱ्या मी झुगारून देईन, मस्तकावरील मोठेपणाचा मुकुट कस्पटासारखा फेकून देईन, पण मस्तानीला मी माझ्यापासून कधींहि दूर करणार नाहीं !

**मस्तानी** : नादीरशहासारखा शत्रु हिंदुस्थानच्या छातीवर नाचत असतांना हे शब्द माझ्या कानालासुद्धां प्रिय वाटणार नाहींत ! आपल्याशिवाय त्या दैत्याचं गर्वहरण कोण करूं शकणार ?

**बाजीराव** : [ उठून अस्वस्थपणानें फेऱ्या घालूं लागतो ] गर्वहरण ! होय, नादीरशहाचं गर्वहरण करण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती आणि अद्यापहि आहे ! त्या दीड लाख दुराण्यांना काबूलच्या पलीकडे गुरांप्रमाणें पिटाळून, सरहद्दीबाहेरील सर्व राष्ट्रांना मला कळवायचं आहे, बजावायचं आहे कीं, हिंदुस्थान कांहीं परकी सांडांना चरण्यासाठीं राखून ठेवलेलं कुरण नव्हे; लुटारूंच्या वस्तीसाठीं मुक्तद्वार ठेवलेली धर्मशाळा नव्हे ! एक शतक जातें न जातें तोंच कोणीहि समशेर परजीत यावं आणि आमच्या मुर्दाड मस्तकावर पाय रोवून आमच्या रक्ताचे घोट घ्यावे, ही स्वकीयांची आणि परकीयांची समजूत मला नष्ट करायची आहे. नादीरशहाचा पाडाव म्हणजे केवळ एका शत्रूचा पाडाव करणं नाहीं; आजपर्यंत मिळवलेल्या विजयांसारखा केवळ एक विजय संपादन करणं नाहीं. देशाबाहेरच्या दरोडेखोरांना दिला

जाणारा तो एक वस्तुपाठ आहे ! आपण मुसलमान मुलखाचा नाश करतों म्हणून मराठे दक्षिणेच्या माजघरांतून बाहेर येणार नाहींत अशी नादीरशहाची कल्पना असेल तर ती मला खोटी ठरवायची आहे. परकीय शत्रू समोर उभा राहीपर्यंत आम्हीं परस्परांशीं शत्रुत्व करूं, संग्राम करूं. पण परकीयांचं पाऊल देशांत पडतांच आमच्यांतील भेदभाव नष्ट होतील, दोन मनगटांचं एक मनगट होईल ! मुसलमानांपासून मुसलमानांचं संरक्षण करण्याकरितां सह्याद्रीचे छावे उत्तरेच्या मैदानाकडे धांवत जातात हें मला दाखवायचं आहे ! आणि...आणि आमचा बंधुभाव झुगारून, आमचा स्नेहाचा, संरक्षणाचा हात नाकारून दिल्लीचे मुसलमान जर परकीयांशीं संगनमत करूं लागले तर तेथील मोगल बादशाही मी उलथून टाकीन आणि दिल्लींत मराठ्यांचें, शाहूमहाराजांचें सार्वभौम सिंहासन प्रस्थापित करीन !.. करीन !–( हताशपणें कोचावर बसतो. ) आठ वर्षांपूर्वी हें अहंकारी क्रियापद बाजीरावच्या तोंडीं शोभत होतें ! पण आज–आज माझा आत्मविश्वास खरूं लागला आहे, सतत पेटत राहिलेल्या मनांतील महत्वाकांक्षा राखेंत विलीन होऊं लागल्या आहेत !

**मस्तानी :** महाराज, या आठ वर्षांतील प्रत्येक वर्षानं आपल्याला विजयाचा नजराणाच आणून दिलेला आहे. येणारं संवत्सर गेलेल्या संवत्सराच्याच पोटीं जन्माला येतं–[ कोचामागे उभी राहून त्याच्या केसांतून हात फिरवते. ] माझा विश्वास आहे कीं पुढील काळहि वेगळा नसणार, आपल्या साऱ्या महत्वाकांक्षा पुऱ्या होणार !

**बाजीराव :** कुणास ठाऊक ! कुठल्या तरी गाढ, उदासवाण्या, काळसर सावल्या माझ्या जीवनावर पडूं लागल्या आहेत, पसरूं लागल्या आहेत !

[ सहासात वर्षांचा समशेर धावत पळत आंत येतो व बाजीरावकडे जातो. ]

**मस्तानी :** ( किंचित् रागानें ) समशेर !

**समशेर :** ( तिच्याकडे दुर्लक्ष करून ) साहेब, रघुनाथदादा मला कसा सारखा चिडवतोय् पहा !

**बाजीराव :** ( त्याला जवळ घेऊन ) चिडवतोय् ? काय म्हणतो तो ?

**समशेर :** तो म्हणतो माझी मुंज व्हायची उद्यां, तुझी व्हायची नाहीं !

आणखीन् तो म्हणतो कीं आम्ही सगळे ब्राह्मण आहोत अन् तूं एकटा मुसलमान आहेस! मी मुसलमान आहे का हो?

**मस्तानी** : समशेर, मी रोज तुला शिकवतें तें विसरलास का?

**समशेर** : नाहीं—पण सगळे लोक म्हणतात...

**मस्तानी** : लोक कांहीं का म्हणेनात! कोणी विचारलं म्हणजे छाती काढून मी मराठा आहें म्हणून सांगत जा. अशी तक्रार आणायची नाहीं!

**समशेर** : पण माझीसुद्धा मुंज करायची ना हो साहेब?

**बाजीराव** : करायची, तुझीसुद्धा मुंज करायची बाळ! दादा तुझ्यापेक्षा मोठा आहे ना?

**समशेर** : हो.

**बाजीराव** : म्हणून अगोदर त्याची आणि स्वारीवरून आम्ही परत आलों म्हणजे मग तुझी—

**समशेर** : पण तुम्ही स्वारीवरून पुन्हां आलांच नाहीं तर?

**मस्तानी** : समशेर—

**बाजीराव** : तुझ्या मुंजीसाठीं मुद्दाम येईन, अगदीं न चुकतां येईन. मग झालं?

[ चिमाजी आप्पा प्रवेश करतो. ]

....आणि मी जर लौकर आलों नाहीं तर आप्पासाहेब तुझी मुंज लावतील. जा आतां—

[ समशेर समाधानानें जातो. ]

**चिमाजी** : रावसाहेब, समशेरचा व्रतबंध करण्याची आपली आकांक्षा सफल होऊं शकत नाहीं.

**बाजीराव** : कां, ब्राह्मणांनीं नकार दिला?

**चिमाजी** : साफ नकार दिला. अशा व्रतबंधाला कोठेंहि आधार नसल्याचं त्यांनीं सांगितलं.

**बाजीराव** : ठीक आहे, माझाहि फारसा आग्रह नाहीं. आणि प्रायश्चित्ताचं काय झालं? रघुनाथ जनार्दनचे व्रतबंध लावायला तरी त्यांची तयारी आहे ना?

**चिमाजी :** होय, तशी तयारी त्यांनीं दर्शवली आणि प्रायश्चित्ताचा आग्रहही सोडला. परंतु मी-आम्हीं सर्वांनीं त्यांना एक आश्वासन दिलं, म्हणूनच त्यांनीं हा समंजपणा दाखवला आणि म्हणूनच वाड्यावर आलेला ब्राह्मणांचा जमाव परत गेला—

**बाजीराव :** कसलं आश्वासन दिलंत ?

**चिमाजी :** पंतप्रधान यापुढें धर्मबाह्य वर्तन करणार नाहींत म्हणून !

**बाजीराव :** आणि पंतप्रधानांच्या वर्तनाची ही जिम्मेदारी कोणी पत्करायची ?

**चिमाजी :** मला अधिकार असल्यास मी पत्करीन.

**बाजीराव :** ( अगतिकपणें ) तुम्हाला सारे अधिकार आहेत !

**चिमाजी :** मग या अधिकाराच्या अंमलबजावणीला एका कठोर विनंतीनं, मागणीनं मला प्रारंभ केला पाहिजे.

**बाजीराव :** ( किंचित् अस्वस्थ होऊन ) कठोर विनंति-मागणी ?

**चिमाजी :** होय. आणि ती म्हणजे परवां स्वारीवर निघतांना मस्तानीबाईसाहेबांनीं आपल्याबरोबर येण्याचा आग्रह धरतां कामा नये.

**बाजीराव :** ( व्याकूलतेनें ) प्रण तिचा आग्रह नाहीं, तिनं यावं अशी माझी इच्छा आहे.

**चिमाजी :** आपली ही इच्छा पुरी होऊं शकणार नाहीं !

**बाजीराव :** ( क्रोधानें ओरडतो ) माझी इच्छा पुरी होऊं शकणार नाहीं? या शनिवारवाड्यांत, मी बांधलेल्या या शनिवारवाड्यांत माझ्या इच्छेला कोण प्रतिबंध करणार !

**मस्तानी :** खाविंद, आपल्या चरणाशीं प्रार्थना आहे, मनाचा तोल असा सुटूं देऊं नये.

**चिमाजी :** ( शांत परंतु निश्चयपूर्ण स्वरांत ) रावसाहेब, आपण म्हणतां तें सत्य आहे. आपण बांधलेल्या या शनिवारवाड्यांत सर्वस्वीं आपली सत्ता आहे. आपण मला अधिकार दिले, त्या अधिकारांचा माझी मनोदेवता सांगते त्याप्रमाणें मी उपयोग केला आणि यापुढेंहि करीत राहीन. परंतु आपली आज्ञा असेल तर या क्षणाला त्या साऱ्या अधिकारांचा मी त्याग करतों !

**बाजीराव** : ( असहायपणानें ) नाहीं...आप्पा, तसं नाहीं! मला तसं कांहीं म्हणायचं नाहीं! [बाजीरावापेक्षा चिमाजी अधिक कर्तबगार आहे हें लोकांना कदाचित् माहीत नसेल पण मला माहीत आहे. तुझ्या स्वयंसिद्ध अधिकारांवर मी आक्रमण करणार नाहीं.]

**चिमाजी** : मग माझी विनंति आपण मान्य केली पाहिजे. ही माझी, एका माणसाची विनंति नाहीं; सर्व लोकांची–साऱ्या महाराष्ट्राची विनंति आहे!

**बाजीराव** : पण...पण माझ्या खाजगी जीवनाशीं महाराष्ट्राचा, लोकांचा काय संबंध!

**चिमाजी** : आपण महाराष्ट्राचे नेते आहांत. सामान्य माणसाच्या जीवनाची चिकित्सा लोक करीत नाहींत.

**बाजीराव** : देशाला नीतिमत्तेचे पाठ देणारा नेता मी नाहीं! देशाच्या राजकारणाचा मी नेता आहे आणि त्या कार्यांत माझ्याकडून कांहीं अपराध घडला तर–आणि तरच मला शासन करण्याचा लोकांना अधिकार आहे!

**चिमाजी** : हें खरं नाहीं! देशाचा नेता हा केवळ राजकारणाचा नेता नसतो, तर देशांतील सामुदायिक जीवनाचा नेता असतो, राष्ट्रांतील पहिल्या श्रेणीमधील पहिला नागरिक असतो! आपण गाभाऱ्यांत मांडलेल्या मूर्तिं आपादमस्तक सुवर्णाच्या आहेत कीं नाहींत हें पारखून घेण्याचा हक्क लोकांना जरूर असायला पाहिजे...पण हा प्रश्न वादविवादानं सुटण्यासारखा असतां तर तो यापूर्वीच सुटला असता! भट कुलाच्या प्रतिष्ठेसाठीं आणि मराठी दौलतीच्या अभिवृद्धीसाठीं पंतप्रधानांनीं आपलं वर्तन सुधारलं पाहिजे आणि तें सुधारावं म्हणून नादीरशहाची स्वारी संपेपर्यंत तरी मस्तानी-बाईसाहेबांना दूर ठेवलं पाहिजे.

**बाजीराव** : पण मद्य सोडून द्यायचं, कायमचं सोडून द्यायचं मी अभिवचन देतों!— मस्तानी मद्याला जबाबदार नाहीं!

**चिमाजी** : रावसाहेब, आपल्यासमोर आणि बाईसाहेबांसमोर या गोष्टींची चर्चा करण्याची मला इच्छा नाहीं. मी निर्णय केला आहे आणि तो अंम-

लांत आणण्याचा माझा निर्धार आहे. मस्तानीबाईसाहेबांना मी विचारतों, रावसाहेबांबरोबर आपण स्वारीवर जाणार नाहीं असं अभिवचन त्या मला देतील का ?

**मस्तानी :** असं अभिवचन आप्पासाहेब, मला देतां येणार नाहीं, मी कधींहि देणार नाहीं ! मी कुठेंहि असलें तरी खाविंदांची हांक कानावरती आल्यावर, कोणत्याहि भल्या बुऱ्या मार्गानं त्यांच्याकडे गेल्याशिवाय मी रहाणार नाहीं !

**चिमाजी :** मग माझा निरुपाय आहे. या क्षणापासून, मस्तानीबाईसाहेब, आपण वाड्यांतल्या वाड्यांत बंदीवान आहांत! आपल्याला मी अटक करीत आहे !

**बाजीराव :** अटक ! मस्तानीला अटक करण्यांत आली आहे ?

**चिमाजी :** होय. अटक करण्यांत आली आहे. ( दरवाजाकडे वळून ) हंबीर, साबाजी—

[ दोन शिपाई प्रवेश करतात. ]

**चिमाजी :** हंबीर, बाईसाहेबांना बुरुजाकडच्या महालांत घेऊन जा आणि महालाच्या बाहेर चौकी बसव. खुद्द श्रीमंतांशिवाय, समशेरशिवाय आणि -बाईसाहेबांच्या दासीशिवाय कुणालाहि माझ्या परवानगीवाचून आंत सोडायचं नाहीं अथवा आंतून बाहेर जाऊं द्यायचं नाहीं !

**हंबीर :** जी सरकार.

[ बाजीराव कपाळाला हात लावून अगतिकपणें पहात आणि ऐकत बसतो. शिपाई मस्तानीच्या जवळ जाऊन उभे रहातात. ]

**चिमाजी :** बाईसाहेब, आपण चलावं. रावसाहेब आपल्याला तिकडेच येऊन भेटतील.

[ मस्तानी शिपायांबरोबर बाहेर जाते. बोलण्याचं सामर्थ्य हरपल्याप्रमाणें बाजीराव पुतळ्यासारखा स्वस्थ राहतो. ]

**चिमाजी :** (क्षणभर थांबून ) रावसाहेब, मी जातों. पण जाण्यापूर्वी एक सांगायचं आहे. दौलतीचा एक अधिकारी, हितकर्ता अधिकारी म्हणून

आतांपर्यंत मान वर करून बोललों, कर्तव्य म्हणून जें करायला हवं होतं तें मन कठोर करून केलं. आतां तुमचा धाकटा भाऊ म्हणून, तुमच्या पंखा-खालीं वाढलेला—तुमच्या आशीर्वादावरं जगणारा धाकटा भाऊ म्हणून तुमच्या पायावर डोकं ठेवतों...आणि तुम्ही क्षमा करणार नाहीं पण क्षमेची याचना करतों !

**बाजीराव** : ऊठ आप्पा ऊठ, क्षमा करण्याचा मला अधिकार असलाच तर तुला क्षमा आहे !

[ चिमाजी जातो. बाजीराव सुन्न होऊन बसलेला असतां मानाजी प्रवेश करतो. ]

**मानाजी** : सरकार, मल्हारराव होळकर आले आहेत.

**बाजीराव** : ( संतापानें ) मल्हारराव आले आहेत? मग मूर्खा, त्यांना आंत पाठवून दे. मला मल्हाररावच हवे आहेत !

[ मानाजी जातो. मल्हारराव प्रविष्ट. ]

**बाजीराव** : [ पुढें होऊन ओरडतो ] मल्हारराव, आत्तांच्या आत्तां स्वारीची द्वाही फिरवा ! लष्कराची सिद्धता आहेच. छावणींत दवंडी द्या कीं तीन घटकांच्या आंत हवेलीची सरहद्द ओलांडून फौज बाहेर पडलीच पाहिजे !

**मल्हारराव** : पण वाड्यांत उद्यां मुंज—

**बाजीराव** : [सहनशक्तीची सर्व मर्यादा सुटून क्रोधानें गरजतो] मला उलट-जबाब नको आहेत ! सूर्य अस्ताला जाण्याच्या आंत घोड्यावर स्वार होण्याचा माझा निर्धार आहे. जा, जा, जा—

## प्रवेश चवथा

[ विसाजीचें घर. विसाजी प्रवेश करतो. ]

**विसाजी** : उमटली ! शेवटीं हीही रेषा उमटली ! कावेरी, अग कावेरी ! काय ही बायको तरी ! नवऱ्याच्या हातावर पेशवाईची रेषा उमटली,

निरांजनं घेऊन दाराशीं ओवाळणं राहींच पण हांक मारल्यावर नुसती बाहेरसुद्धा यायला तयार नाहीं. या बायकांना नवऱ्यापेक्षा चुलीचंच कौतुक जास्त! पुरुषांचा जीव बायकांत आणि बायकांचा जीव चुलींत असा हा दुःखदायक त्रिकोण आहे!

**कावेरी :** (प्रवेश करून) काय म्हणून मला अशा नेहमीं नांवानं हांका मारतां हो?

**विसाजी :** तुलाच काय, जगांतील सगळ्या बायकांना हांक मारण्याचा प्रसंग आहे आज! तिसऱ्या लग्नाचा योग आला होता पण तूंच तो घालवलास! नाहींतर आज निदान दोघींच्या नांवानं तरी हांका मारल्या असत्या! बाकी तें चुकलंच जरा.

**कावेरी :** काय चुकलं हो? बायका म्हणजे तुम्हाला काय विड्या वाटतात-ओढायच्या आणि टाकून द्यायच्या?

**विसाजी :** बाकीं बायको ही विडीसारखीच असते! तोंडाच्या बाजूनं नेहमीं पेटलेली!

**कावेरी :** इतकं म्हातारपण झालं, देवाचं नांव घ्यायचे दिवस आले, पण अजून बायकांचा जप कांहीं तोंडांतून सुटत नाहीं! पुजेला बसलांत तरी लक्ष देवापेक्षा देवदर्शनाला येणाऱ्या मंडळीकडेच जास्त!

**विसाजी :** कान आहेत तोंपर्यंत ऐकलं पाहिजे, डोळे आहेत तोंपर्यंत पाहिलं पाहिजे! पण तुला तें समजायचं नाहीं. बायकांकडे पहायला पुरुषाचे डोळे असावे लागतात! आणि म्हातारपणाविषयीं म्हणशील तर म्हातारपणींच स्त्रियासंबंधीं अधिक आस्था वाटायला लागते. म्हातारपणींच माणसाला खोकला जडतो तो उगाच नाहीं. परमेश्वराचीच योजना आहे ती!

**कावेरी :** तरीच म्हटलं, ओटयावरती गेल्याबरोबर तुम्हाला खोकल्याची ढास कशी लागते! माझ्यासमोर नाहीं कधीं खोकत ते?

**विसाजी :** ही व्याधीच चमत्कारिक आहे. स्वतःच्या बायकोसमोर ती कधीं बाहेर यायची नाहीं! तें जाऊं दे. आज अत्यंत आनंदाचा दिवस आहे. घराबाहेर सडासंमार्जन कर, रांगोळ्या काढ, दारावर गुढ्या लाव आणि जेवायलाहि कांहीं गोडाधोडाचं कर!

**कावेरी** : कां ? पेशव्यांची स्वारी विजयी होऊन पुण्यांत आली ?

**विसाजी** : पुण्यांतच काय, तुझ्या घरांत, अगदी तुझ्यासमोर आली आहे. तुझ्याशीं बोलते आहे !

**कावेरी** : डोकं फिरलं कीं काय ?

**विसाजी** : ग्रह फिरले ! हातावर आज पेशवाईची रेषा दिसूं लागली, चांगली स्पष्ट दिसूं लागली. मी पेशवा होणार !

**कावेरी** : अस्सं ! बाजीरावसाहेब संन्यास घेऊन काशीला गेले वाटतं ?

**विसाजी** : तो आतां काशीला जावो, नाहींतर नाशिकला जावो ! बाजीरावची सद्दी संपली ! नादीरशहाला जिंकण्यासाठीं म्हणून गेल्या वर्षी जो वाड्याबाहेर पडला तो अजून परत येत नाहीं. खुद्द नादीरशहासुद्धा आपल्या गांवीं जाऊन पोंहोंचला असेल ! कां येत नाहीं परत बाजीराव ठाऊक आहे ?

**कावेरी** : तिकडे लढाईत, मनसुब्यांत गुंतले असतील. त्यांना कांहीं पुण्यांत येऊन देवापुढें घंटा वाजवायच्या नाहींत !

**विसाजी** : तुला कांहीं राजकारण कळत नाहीं ! उत्तरेकडून चिमाजी आप्पा परत आले पण बाजीराव परत आले नाहींत याचं कारण घरांतील कलह ! शनवारवाड्यांतून पळायचा प्रयत्न केला म्हणून मस्तानीला पर्वतीच्या बागेंत कैदेंत टाकलं, आणि मस्तानी कैदेंत पडली म्हणून बाजीराव पुण्याला परत येत नाहीं ! एका रखेलीपायीं राजकारण असं अडून राहूं लागलं कीं छत्रपती नाराज होणार, छत्रपती नाराज झाले कीं ते बाजीरावाला पेशवेपदावरून दूर करणार आणि बाजीराव दूर झाले कीं—ही रेषा ! नवीन उमटलेली ही रेषा ! त्या रिकाम्या जागेवर ही रेषा मला खेचीत नेणार !

**कावेरी** : बाई बाई ! तुमची प्रकृति फारच चिंताजनक दिसते ! आतां ते वैद्य आले म्हणजे—आलेच हे !

[महादेवशास्त्री प्रवेश करतो.]

**कावेरी** : (काकुळतीनें) शास्त्रीबुवा, तुम्ही अगदीं देवासारखे आलांत. यांना अगोदर औषध द्या पाहूं. फार बिघडली आहे तब्येत—

**महादेवशास्त्री** : तब्येत बिघडली ! म्हणजे काय झालं काय ?

**कावेरी** : सगळं कांहीं झालं आहे! होऊं नये तेंसुद्धां व्हायला लागलं आहे!

**महादेवशास्त्री** : आश्चर्य आहे! खोकला वगैरे येतो का?

**कावेरी** : खोकला ना? खोकला तर फारच येतो आहे! पूजा करतांना खोकतात, ओट्यावर गेले कीं खोकतात, आणि रस्त्यांतून चालायला लागले म्हणजे तर चालण्यापेक्षा खोकणंच जास्त! संध्याकाळच्या सुमारास खोकला फारच वाढतो! मी समोर असलें म्हणजे मात्र आपण आजारी असल्याचं मला कळूं नये म्हणून खोकला दाबून ठेवतात!

**महादेवशास्त्री** : छे, छे, हें म्हणजे आजार प्रलयावस्थेला गेल्याचं लक्षण आहे! चरकसंहितेमध्यें स्पष्टपणें सांगितलेलं आहे कीं सायंकाळीं प्रगट होणारा कफविकार म्हणजे–

**विसाजी** : अहो कफविकार––

**कावेरी** : पहा, तुम्ही कफविकार म्हणालांत तर तुम्हाला कफविकार म्हणून हांक मारायला लागले! अस्सं डोक्यामध्यें एकेक धरून बसतात! आतां तुमचा यांचा परिचय इतक्या वर्षांचा, पण तुमचं नांवसुद्धा लक्षांत येत नाहीं! मला वाटतं खोकल्याच्या जोडीला—

**विसाजी** : अहो खोकलाबाई! काय, विचार काय—

**कावेरी** : बघा, बघा, आतां खोकला तर खोकलाच! गेले विसरून माझं नांव!

**महादेवशास्त्री** : हा स्मृतिभ्रंश आहे, ही बुद्धिदीनता आहे! त्रिधातूंच्या विषमास्थितींत शूल, व्यध, तोद, भेद, प्रलाप, भ्रम, कंप, मलग्रह म्हणून जीं वृद्ध आणि कुपितदोषलक्षणें सांगितलीं आहेत—

**विसाजी** : औषधांच्या ऐवजीं या औषधांसारख्या शब्दांनींच तुम्ही वैद्य लोक रोग्यांना ठार करतां वाटतं!

**कावेरी** : पाहिलंत, हा आणखी स्मृतिभ्रंश—

**महादेवशास्त्री** : होय होय, नाहींतर वैद्य रोग्यांना मारतात अशी यांची समजूत कां व्हावी? फारच विकोपाला गेली आहे प्रकृति! पाहूं जरा हात—

**विसाजी** : आतां हात दाखवण्याचाच प्रसंग आलेला आहे! बस् झाला हा फाजीलपणा. मला कांहींएक झालेलं नाहीं. शास्त्रीबुवा, तुमचे सगळे शूल, व्यध, तोद भेद घेऊन तुम्ही घराबाहेर व्हा आणि तूं-तूं स्वयंपाकघरांत जा! उद्यां मी छत्रपतींचा पंतप्रधान होणार आणि—

**कावेरी** : हें आणखीन् एक! हें तर डोक्यांत इतकं रुतून बसलं आहे कीं विचारूं नका. सारखे हात पहातात आणि पंतप्रधान होणार, पेशवा होणार, बाजीराव मरणार म्हणून बडबडत बसतात—

**विसाजी** : ए आई, आतां—

**कावेरी** :
**महादेवशास्त्री** : } आई! आई!

**महादेवशास्त्री** : (कावेरीला उद्देशून) थांबा. जरा बाजूला व्हा. (विसाजीच्या समोर जाऊन) विसाजीपंत, ही बाई तुमची कोण आहे?

**विसाजी** : (भडकून) मी तुमचा बाप आहे!!

**महादेवशास्त्री** : (शांतपणानें) बरं बरं, तुम्ही माझे बाप आहांत. कबूल. बरं, आतां हीं बोटं किती आहेत? (बोटं दाखवतो.)

**विसाजी** : (पूर्ववत्) दहा लाख आठशें सत्तर आहेत! म्हणे बोटं किती आहेत!

**महादेवशास्त्री** : कावेरीबाई, प्रकृति फार बिघडली आहे. पण काळजी करायचं कारण नाहीं—

**विसाजी** : अहो कोण काळजी करतंय अन् कुणाची प्रकृति बिघडली आहे? तुम्हाला रोगी मिळत नाहीं तर अग्निकाष्ठं खाऊन जीव कां देत नाहीं?

**महादेवशास्त्री** : (त्याच्याकडे दुर्लक्ष करून) कावेरीबाई, यांना ज्वरसुद्धा असला पाहिजे. त्याशिवाय इतके बडबडायचे नाहींत. त्यांना आंत नेऊन बिछान्यावर झोंपवलं पाहिजे. उघड्यावर रोग्याला ठेवणं इष्ट नाहीं. धरा तुम्ही तो हात, मी हा धरतों! हं चला—

**कावेरी** : हो, तसंच करायला हवं! महिना दोन महिने बिछान्यांतच ठेवायला पाहिजे.

[ दोघेजण धरूं लागतात. ]

**विसाजी** : खबरदार अंगाला हात लावाल तर-- अहो मला कांहीं झालं नाहीं--ए चांडाळणी--ए वैदू--

[ ही आरडाओरड चालू असतां कावेरी व महादेवशास्त्री हात धरून त्याला आंत ओढत नेतात. ]

## प्रवेश पांचवा

[ शनिवारवाड्यांतील काशीबाईचा महाल. रात्र पडूं लागली असून दोन मोठाल्या समया महालांत जळत आहेत. जवळजवळ बिछान्याला खिळलेली काशीबाई अस्वस्थ होऊन बिछान्यांतून बाहेर पडते आणि पुढें येऊन एका कोचाच्या आधारानें उभी राहते. तिची दासी पार्वती जवळच आहे. ]

**पार्वती** : ताईसाहेब, वैद्यानं सांगितलं आहे कीं कांहींही हालचाल करायची नाहीं म्हणून. आणि तुम्ही मात्र—

**काशीबाई** : अग, बरं नसलं तरी बिछान्यावर का सारा वेळ पडून राहतां येतं ? आणि असं झालंय् काय मला ? वैद्य आपले एकाचे दोन सांगतात आणि उगाचच पराचा कावळा होतो.

**पार्वती** : असं कसं म्हणतां ताईसाहेब ! तिलंगणांतले मोठे धन्वंतरी वैद्य, सातारहून महाराजांनी मुद्दाम इकडे रवाना केलेले, ते का कांहींतरी सांगतील ?

**काशीबाई** : खरंच फार मोठे वैद्य आहेत का ग ते ?

**पार्वती** : दक्षिणेंतील सारे राजेरजवाडे त्यांना बोलावीत असतात म्हणून ऐकलं. निजामसाहेबानंसुद्धां—

**काशीबाई** : मग गडे मला एकदां त्यांची भेट घ्यायला हवी. तूं करशील का एवढं ?

**पार्वती** : रोज तर सकाळसंध्याकाळ पाहून जातात ते.

**काशीबाई** : अग, पण त्या वेळेस सासूबाई जवळ असतात, भावजी असतात, जाऊबाई असतात. साऱ्यांच्या देखत कसं सांगतां येईल ?

**पार्वती** : ताईसाहेब, उगीचच तुम्ही आपल्या प्रकृतीची काळजी करीत बसतां ! वैद्यावर भरवसा ठेवावा, आणि ते सांगतील त्याप्रमाणें वागावं. पुढच्या विजयादशमीला श्रीमंतांबरोबर स्वारीवर जाल तुम्ही !

**काशीबाई** : खुळी आहेस अगदीं ! माझ्या का प्रकृतीची काळजी करतें आहें मी ? माझ्या प्रकृतीची काळजी करायला पुष्कळ माणसं आहेत घरांत ! पण...पण...

[ डोळ्यांत पाणी येतें. ]

**पार्वती** : ताईसाहेब, असं काय करतां ?

**काशीबाई** : ( हुंदका अनावर होऊन ) पण स्वारी तिकडे एकटी नाहीं का ? वाड्यांतून जायचं झालं, तेव्हांच तब्येत बरी नव्हती. मोठ्या मोहिमेची जबाबदारी शिरावर घेऊन निघायचं झालं. साऱ्या देशांत पुकारा कीं कोठल्याहि भारतीय वीरानं केला नाहीं, इतका पराक्रम श्रीमंत सरकार आतां करणार आहेत—तूर्कांचा मोड करून छत्रपतींचं सिंहासन श्रीमंत दिल्लीला नेणार ! पण तिकडच्या तब्येतीची वार्ता इतरांच्या राहो, पण घरच्यांच्या तरी कानावर होती का ? तब्येत बरी नव्हती. मनालाहि स्वस्थता नव्हती. त्यांत हें मस्तानीचं प्रकरण पुढें विकोपाला गेलं ! काय वाटत असेल तिकडे मनाला ! दूरचा प्रदेश, जवळ आपलं म्हणतां येईल असं माणूस नाहीं ! भावजी एकटेच इकडे परत आल्यापासून तर माझ्या काळजाला सततचा विस्तव लागलेला आहे !

**पार्वती** : श्रीमंतांना स्वारीची सवय का नाहीं ताईसाहेब ? वाडा मोठ्या हौसेनं बांधला पण वाड्यांत कधीं स्वस्थतेनं राहणं झालं आहे का ? घरांत कोंडून राहण्यापेक्षां स्वारीच्या गर्दीतच श्रीमंतांना अधिक समाधान लाभतं. उगीचच चिंता करतां तुम्ही !

**काशीबाई** : चिंता करूं नको तर काय करूं ग ? मी चांडाळीण अशी अपंग, बिछान्याला खिळलेली ! प्रकृति बरी नसल्याच्या कानावर वार्ता येतात. कपाळावर सुंठ घालायची म्हटली तर मायेचा हात नाहीं...म्हणून म्हटलं, या वैद्यांची एकदां भेट घेतली पाहिजे. त्यांच्या हातांपायां पडून,

अंगावरचे दागदागिने देऊन त्यांना सांगेन, कीं पहिल्या डाकेबरोबर नर्मदे-कडे रवाना व्हा म्हणून !

**पार्वती :** आप्पासाहेब वाड्यांत असतांना असं आपल्याला करता येईल का ? आप्पासाहेब, राधाबाईसाहेब रागवायच्या नाहींत का ? वैद्य पेशव्यांचे पाहुणे म्हणून पुण्यांत राहताहेत. वाड्यांत विचारल्याशिवाय का ते जाणार आहेत ! सारीं जणं म्हणतील, आम्हाला काय श्रीमंतांच्या प्रकृतीची काळजी नाहीं ?

**काशीबाई :** साऱ्यांना काळजी आहे ग–पण–मग मीं तरी काय करूं ? माझा जीव माशासारखा सतत तडफडतो आहे ना ! हें दुःख सांगायचं तरी कुणाला ?

**पार्वती :** ताईसाहेब, उत्तरेकडून दिवसाआड सांडणीस्वार येतात. श्रीमं-ताच्या प्रकृतीबद्दल आजपर्यंत कुणीही निरोप आणला नाहीं. बाजारांतल्या अफवा ऐकून का जिवाला त्रास करून घ्यायचा ? तुम्ही असं करायला लागलांत तर वैद्य अगदीं धन्वंतरी असला तरी त्याचं औषध अंगीं कसं लागणार ?

**काशीबाई :** माझं प्राक्तनच खोटं ! जें शरीर उगाळून तिकडच्या पायाला लावायला पाहिजे तें असं प्रेतासारखं निर्जिव होऊन इथं बिछान्यावर खित-पत पडलं आहे ! स्वारीच्या दगदगीनं तिकडे कपाळ तापायचं झालं तर माझ्या या हातांना–( हातांकडे भ्रमिष्टाप्रमाणें पहात ) ...पार्वती, जाळून टाकूं का हात हे ?

**पार्वती :** ताईसाहेब, ताईसाहेब, माझ्या प्राणाची शपथ आहे, आतां जरा स्वस्थ पडून रहा पाहूं. !

**काशीबाई :** नको तो बिछाना ! निखाऱ्यांची चादर पसरली आहे त्या गादीवर ! मला कांहीं झालं नाहीं, मी अशीच बसतें इथें !

[ कोचावर बसते. ]

**पार्वती :** ( दाराकडे पाहून ) ताईसाहेब, आप्पासाहेब आले आहेत. तुम्हीं बिछान्यावर व्हा, नाहीं तर रागावतील ते !

**काशीबाई** : रागावूं दे. मी नाहीं जाणार बिछान्यावर !

[ चिमाजी प्रवेश करतो ]

**चिमाजी** : वहिनीसाहेब, तुम्ही अशा खाली कां बसलांत ? वैद्यानं सांगितलं तें करायला नको का ? पार्वती, तुला कळायलं हवं—

**काशीबाई** : तिनं सांगितलं, पण मला पडून बरं वाटेना म्हणून अशी उठून बसलें... (क्षणभर थांबते) ...भावजी, माझं एक मागणं आहे तुमच्याकडे.

[ पार्वती बाहेर जाते. ]

**चिमाजी** : मागणं ? वहिनीसाहेब, वडीलकीच्या अधिकारानं तुम्ही आज्ञा करायची मला.

**काशीबाई** : मस्तानीला तिकडे पाठवून द्यावं !

**चिमाजी** : मस्तानीला पाठवून द्यावं ? वहिनीसाहेब, तुम्ही असं सांगावं याचं आश्चर्य वाटतं मला ! मस्तानीला पर्वतीच्या बागेंत अटकेंत ठेवलं तेव्हां तुम्हांला मी विचारलं नाहीं असं नाहीं !

**काशीबाई** : विचारलं, आणि मीहि सांगितलं कीं अटकेंत ठेवा म्हणून. बायकांना साहजिक वाटणारा सवतीमत्सर होता तो भावजी. पण आतां... मला वाटतं, माझं मागणं आहे आल्यापाशीं कीं मस्तानीला तिकडे पाठवून द्यावं !

**चिमाजी** : मस्तानीला आम्हीं अटकेंत ठेवलं तें काय तिच्याशी आमचं वैर आहे म्हणून ? आज दहा वर्षं मस्तानी रावसाहेबांजवळ आहे. तुमच्या इतकाच मानमरातब घेऊन ती वाड्यांत राहिली. कोणी एका शब्दानंहि तिची अवज्ञा केली नाहीं. पण मस्तानीच्या संगतींत रावसाहेबांचा तोल अधिकाधिक सुटायला लागला, आणि ती स्वारीवर जात असल्यानं राजकारणहि बिनसायला लागलं ! भोपाळच्या मोहिमेंत मस्तानी रावसाहेबांबरोबर नसती तर--पण जाऊं द्या तें ! मराठ्यांच्या राजकारणाची आणि रावसाहेबांच्या हिताची हानी व्हायला लागली म्हणूनच मस्तानीला अटकाव करावा लागला. पूर्वी कधीं न आलेलं संकट नादीरशहाच्या रूपानं भारतावर आलेलं, त्याचं पारिपत्य करण्यासाठीं रावसाहेब स्वारीवर निघालेले, अशा वेळीं मस्तानीला त्यांच्याबरोबर जाऊं दिलं असतं तर--

**काशीबाई** : भावजी, मला राजकारण कळत नाहीं. जरा मर्यादा सोडून बोलतें,—माझे अखेरचे दिवस आहेत, कमी अधिक शब्दांचा राग मानूं नका—पण तुम्हांला पेशव्यांच्या राजकारणाची काळजी आहे, मला तिकडच्या प्रकृतीची काळजी आहे !

**चिमाजी** : वहिनीसाहेब, आज माझं अंतःकरण ऐरणीवर फोडायचं तुम्हीं ठरवलं आहे का ? मला—चिमाजीआप्पाला रावसाहेबांच्या प्रकृतीची काळजी नाहीं ? सख्या भावांचंहि व्हायचं नाहीं इतकं एकदील आम्हां भावंडांचं लहानपणापासून झालेलं. श्रीवर्धनच्या समुद्रकांठांवर जिवलग मित्रांप्रमाणें आम्हीं परस्परांच्या हातांत जे हात घातले ते—या घटकेला अशुभ बोलूं नये पण केवळ मृत्यूलाच तोडतां येतील; नाहीं, मृत्यूलासुद्धां तोडतां येणार नाहींत ! पेशव्यांच्या राजकारणाची काळजी वाहणं हें माझं कर्तव्यच आहे. दिग्विजयी वीराप्रमाणें रावसाहेब साऱ्या भारतांत मराठ्यांची तरवार गाजवीत आहेत. मराठी राजकारणाच्या वाढत्या संसाराची जबाबदारी मला पाळली पाहिजे. पण म्हणून रावसाहेबांच्या हिताहिताकडे कधीं माझं दुर्लक्ष होईल का ?

**काशीबाई** : तुम्ही जाणूनबुजून दुर्लक्ष करतां असं मी म्हणेन तर माझी जीभ त्या चांडाळ शब्दांच्या उच्चारानंच जळून जाईल ! असं मी कसं म्हणेन ! दोघां भावांचं प्रेम पाहून साऱ्या जगाला रामलक्ष्मणाची आठवण होते, मलाच त्यांत कांहीं अनिष्ट दिसलं तर माझ्यासारखी पापीण नाहीं ! पण भावजी, घराच्या भिंतींत कोंडलेल्या, बिछान्याला खिळलेल्या माझ्या पांगळ्या मनाची तुम्हीच कल्पना करा—

**चिमाजी** : वहिनीसाहेब, तुमच्या शब्दानं मला राग आला नाहीं बरं ! तुम्ही काय, मी काय, आपण सारेजण त्या एका देदीप्यमान् मूर्तीभोंवती प्रदक्षणा घालणारे भक्त आहोंत. त्या मूर्तीच्या संरक्षणासाठींच कित्येकदां कांहीं अप्रिय गोष्टी कराव्या लागतात, मी केल्याहि आहेत. पण माझी बुद्धि मला ग्वाही देते कीं मी जें केलं तें मराठी दौलतीच्या आणि रावसाहेबांच्याहि हिताचं आहे !

**काशीबाई :** बाहेरून तब्येतीसंबंधीं बातम्या येतात. कालपरवांच्या डाकेंत कांहीं त्यासंबंधीं लिहिलं आहे का ?

**चिमाजी :** आजच खलिते आले आहेत. प्रकृती बरी नव्हती असं लिहिलं आहे पण—

**काशीबाई :** प्रकृति बरी नव्हती ?

**चिमाजी :** काळजीसारखं कांहींहि नाहीं वहिनीसाहेब. खुद्द रावसाहेबांच्या हातचं पत्र आहे. दोन चार दिवस अंग मोडून आलं, थोडा थकवा वाटतो, इतकंच स्वतःच्या दस्तूरनं त्यांनीं लिहिलं आहे. तरी पण दरबारचे दोन नामांकित वैद्य उद्यांच्या उद्यां मी नर्मदेकडे रवाना करणार आहे.

**काशीबाई :** (भयभीत होऊन) दोन चार दिवस अंग मोडून आलं ! थोडा थकवा वाटतो आहे!–नाहीं, भावजी, नाहीं! तिकडच्या स्वभावाची मला ओळख आहे तितकी कुणालाच नसेल ! तांबड्या लाल लोखंडासारखं अंग तापानं फणफणल्याशिवाय हे साधे शब्दहि ते पत्रांतून लिहायचे नाहींत. मी तुमच्या पायां पडतें, मला उद्याच्या उद्यां तिकडे पाठवायची व्यवस्था करा—

**चिमाजी :** अशा आजारांत—

**काशीबाई :** वाटेंत मेलें तर कुंकू लुटीत स्वर्गाला जाईन ! नाहीं, मी कुणाचंहि ऐकणार नाहीं ! उद्यांच्या उद्यां मला तिकडे रवाना करा.

**चिमाजी :** ठीक आहे, मी तुमच्या इच्छेबाहेर नाहीं !

: पडदा :

# : ४ :

## प्रवेश पहिला

[ नर्मदेच्या तीरावरील बाजीरावची छावणी. बाजीराव आपल्या डेऱ्यांमध्यें बिछान्यावर बसलेला आहे. जवळ शिंदे-होळकर आहेत. सूर्यास्ताची वेळ होत आलेली आहे. ]

**होळकर** : श्रीमंत सरकारांना आमची विनंती आहे, तूर्त त्यांनीं राजकाजाचा विचार करूं नये.

**बाजीराव** : मग कसला विचार करूं ? या लोकांतील मुलुखगिरी आटोपल्यावर माझी रवानगी स्वर्गलोकांत होईल कीं रौरवांत होईल याचा विचार करीत राहूं ? दृष्टीला दिसूं लागलेल्या काळ्या दरवाजांचे अडसर उघडण्यापूर्वी जीवनांतील पापपुण्याचा जमाखर्च मनांत मांडून ठेवूं ?...जमा खर्च ! ( किंचित् हांसतो ) समर्थांनीं म्हटलं आहे, मरावं पण कीर्तीरूपानं उरावं ! परंतु सर्वांनाच हें सद्‌भाग्य कुठून लाभायला ? आमच्यासारखीं माणसं

जगांतून जातात आणि मागे कीर्ति नाहीं पण कर्ज मात्र नक्कींच शिल्लक राहतं! बाजीराव पेशवा चालला पण त्याचं कर्ज मात्र—

**शिंदे** : श्रीमंतानीं कर्जाची तमा कां करावी? मी समशेरीवर हात ठेवून ग्वाहीं देतों कीं श्रीमंत या क्षणाला कर्जातून मुक्त झाले आहेत! साऱ्या कर्जाची जिम्मेदारी मी घेतों—

**होळकर** : आणि मी सुद्धा—

**बाजीराव** : म्हणजे जुने सावकार आणि नवे सावकार आले! पण तुम्ही माझे जन्मोजन्मींचे सावकार आहांत! तुमच्या कर्जाची मला लाज नाहीं. युगामागून युगं गेलीं तरी शिंदे होळकरांच्या ऋणांतून बाजीराव पेशव्यांची मुक्तता नाहीं!

**शिंदे** : (डोळे टिपतो) सरकार, रस्त्यांतले धुळीचे कण आपण उचलले आणि त्याचं सोनं केलं. अशी भाषा बोलून—

**बाजीराव** : काय म्हणतोस राणोजी? (त्यांच्याकडे क्षणभर पाहून) काय तूं डोळे टिपायला लागलास?—आणि मल्हारराव, तूं सुद्धा? शाबास! पहाडी दिलाचे म्हणून गाजलेले, कर्दनकाळाचे कर्दनकाळ म्हणून नावाजलेले, ज्यांच्या निशाणाचे पटके क्षितिजावर दिसूं लागतांच दिल्लीसारखीं बलाढ्य शहरंसुद्धा थरथरा कापूं लागतात–ते महाराष्ट्राचे, माझे हे दोन वाघ, आपण वाघ आहोंत हें विसरून आसवं गाळूं लागले आहेत! मित्रांनों, तुमच्या अश्रूंची ही कहाणी जगाला समजली तर संसारांत माणुसकीचं मोल वाढल्याशिवाय राहणार नाहीं!...हजारों माणसांच्या मृत्यूला आपण कारणीभूत झालों. त्यांतील प्रत्येक मनुष्य मरतांना किंवा मेल्यावर अशींच कोणीतरी आसवं ढाळलीं असतील!

**शिंदे** : (आवेशानें) सरकार! ही मरणाची भाषा आतां बंद झाली पाहिजे!

**बाजीराव** : (हंसून) बंद झाली पाहिजे! राणोजी, वरिष्ठांना हुकूम सोडायची तुझी ही सवय अद्यापही जात नाहीं!

**शिंदे** : गुन्हा माफ करा सरकार, श्रीमंतांनीं—

**बाजीराव** : सरकार, श्रीमंत, पंतप्रधान, पेशवे!—हे सारे बडेजावी किताब या घटकेला निरर्थक वाटत आहेत! निर्जन वनामध्यें सोन्याची शलाका आणि दगडाचा तुकडा यांचं मोल वेगळं असत नाहीं! जगाच्या

व्यवहारांत माणूस हा माणूस नसतो, तो केवळ एक विशेषण, केवळ विशेषण असतो! तो श्रीमंत असतो, दरिद्री असतो, सज्जन असतो, दुर्जन असतो, वीर असतो, भेकड असतो! पण जीवनाची यात्रा आटोपून परमेश्वराकडे जातांना हा सारा पिसारा गळून पडतो आणि केवळ एक माणूस म्हणून तो त्याच्या पायाशीं जाऊन उभा राहतो. बाजीराव आतां पेशवाईपासून दूर होऊं लागला आहे, त्या विशुद्ध माणुसकीच्या जवळ जाऊं लागला आहे!

**होळकर :** सरकार, स्वतःसाठीं नाहीं पण दौलतीसाठीं तरी आपण ही मृत्यूची आळवणी थांबवायला हवी. अंगांत ज्वर असतांना आपण अट्टाहासानं नर्मदेवर पोहायला गेलांत—

**बाजीराव :** माझा मरणाचा अधिकारसुद्धा माझ्या मोठेपणानं हिरावून घेतला आहे कारे? आणि हा मोठेपणा! ज्या मोठेपणाच्या पायावर माझ्या साऱ्या वैयक्तिक हक्कांची ओंजळ मी वाहिली, निदान वहावी म्हणून सर्वांचा आग्रह होता तो हा मोठेपणा ......मांस काढून घेतलेल्या हाडांच्या एखाद्या कंगाल सांपळ्यासारखा या क्षणीं माझ्या डोळ्यासमोर उभा आहे! माझं जीवन हें सत्य होतं आणि मोठेपणा ही कल्पना होती! पण समाज सत्यावर चाललेला नाहीं, कल्पनांवर चाललेला आहे. आणि म्हणूनच कल्पनेच्या पायावर सत्याचं बलिदान करावं लागतं...मला करावं लागलं!

[ वैद्य येतो. ]

**शिंदे :** सरकार, राजवैद्यांनीं मात्रा उगाळून आणली आहे तेवढी घ्यावी म्हणजे ज्वर कमी व्हायला लागेल.

**बाजीराव :** जगांतल्या साऱ्या मात्रा, नव्हे जगांतले सारे राजवैद्य जरी मला उगाळून पाजले तरी आतां उपयोग व्हायचा नाहीं! ह्यापेक्षां आणखी एक मद्याचा पेला मला द्या! यमाचे दूतसुद्धा पुण्याच्या ब्राह्मणांप्रमाणें धर्मनिष्ठ असले तर कदाचित् या मद्यपी माणसापासून ते दूर होतील! मृत्यूवर विजय मिळविण्यासाठीं माणसानं शोधून काढलेली मद्य ही एक संजीवनी आहे. ती माणसाला मारते आणि त्याचवेळीं मरणालाहि पराभूत करते... पण नको! मद्यसुद्धा नको! मद्याचा पेला समोर धरला तर त्या रुपेरी तरंगावर

माझ्या मंदिराक्षीची नजर मला दिसायला लागेल! (एकदम ओरडतो) मस्तानी ! मस्तानी !

[ सर्वजण पुढें होतात ]

**होळकर** : सरकार !

**शिंदे** : रावसाहेब !

**बाजीराव** : ( तंद्रींत असल्याप्रमाणें ) माझ्या सोनेरी पक्षाला पर्वतीच्या बागेंत अटकेंत ठेवलं आहे !

**शिंदे** : येत्या डाकेनं आप्पांकडे निरोप रवाना करतों कीं मस्तानीबाई-साहेबांना ताबडतोब पाठवून द्या.

**बाजीराव** : ( शुद्धीवर येऊन ) जा, सारेजण बाहेर जा ! घटकाभर एकटा पडूं द्या मला—आणि राणोजी, मस्तानीबाबत आप्पांकडे कसलेहि निरोप पाठवूं नका. लहानपणापासून मला ठाऊक आहे, आप्पांचं मन जितकं कणखर आहे तितकंच हळवंही आहे. त्यांचं मन दुखावेल असं कांहींहि करायचं नाहीं. जा, कांहीं जरूर पडली तर हांक मारीन.

[ सर्वजण बाहेर जातात. ]

**बाजीराव** : एकांत मिळावा म्हणून मी सगळ्यांना जायला सांगितलं पण हा एकांत, अंतःकरणाचा हा एकटेपणाच माझं जीवन कोरून काढीत आहे ! सरदारांच्या गर्दींत सतत राहणारा, सैनिकांच्या समुदायांत वावरणारा, आप्त-मित्रांनी वेढलेला महाराष्ट्राचा हा पंतप्रधान आज एकटा, अगदीं एकटा पडला आहे ! पर्वताचा एखादा सुळका इतर शिखरांना मागें सारून आकाशांत उंच जातो; पण त्या उंचीबरोबरच, त्या श्रेष्ठतेबरोबरच त्या भकास, निळ्या पोकळींतील एकाकीपणा त्याला सहन करावा लागतो ! हा एकाकीपणा म्हणजे मरणाच्या आगमनाची पहिली चाहूल आहे, कालपुरुषाची ही सांवली आहे...संपलं, सारं कांहीं संपलं! जीवन या नांवानं ओळखलं जाणारं, सुखदुःखांनीं भरलेलं, हें मधुर आणि कठोर स्वप्न समाप्त झालं ! विश्रांति न घेतां मारलेल्या दूरवरच्या मजला, निष्ठावंत सैनिकांचा सहवास, घरांतल्या माणसांचं निःस्वार्थी प्रेम, स्त्रियांच्या मखमली शरीराचा उन्मादक स्पर्श... दिवसभर फुललेल्या कमलाच्या या कोमल पाकळ्या आतां मिटूं लागल्या ! दूरवर राहिलेल्या माझ्या प्रिय, पुण्यशील महाराष्ट्रा, नर्मदेच्या तीरावरून हा बाजीराव

तुला अखेरचा प्रणाम करीत आहे ! तुझ्या बाहूपाशांत मला मरण आलं असतं तर अधिक आनंद वाटला असता; तुझ्या पवित्र मातीमध्यें माझं हें मातीचं शरीर मिळून गेलं असतं तर अधिक समाधान लाभलं असतं. पण तें व्हायचं नव्हतं. माझ्या कर्मानुसार मला स्वर्ग प्राप्त होवो, अथवा नर्क प्राप्त होवो; स्वाभिमानाची आणि पराक्रमाची परंपरा महाराष्ट्रांत अखंड राहिली तर माझा आत्मा रौरवांतसुद्धा सुखी होईल आणि महाराष्ट्राच्या पठारावर भ्याड, दुर्बळ, परतंत्र नादानांची रहदारी सुरू झाली तर स्वर्गलोकांतसुद्धां मला नर्कलोकाच्या यातना होतील !...अंधार, दिशादिशांतून अंधार झिरपूं लागला आहे !... सर्वांच्या ऋणांतून होतां येईल तेवढं मुक्त होण्याचा प्रयत्न केला. आतां मरणा, ये ! ये आणि या अंधारांतून, या एकाकीपणांतून माझी मुक्तता कर !

[ काशीबाई येते, थबकते. ]

**बाजीराव** : कोण ? माझी हांक ऐकून खरोखर मृत्यूच माझ्या भेटीला आला ? बाजीरावचा दरारा मृत्यूलासुद्धा इतका वाटतो का ?...पण मृत्यूनं स्त्रीचं रुप घेतलं आहे ! जगाची उलथापालथ करणाऱ्या मायावी राक्षसा, स्त्रीचं रूप घेऊनच तुला यायचं होतं तर मस्तानीचं रूप घेऊन कां नाहीं आलास ? तें मोहक रूप घेऊन आला असतास तर मी धडपडत पुढें येऊन तुला मिठी मारली असती !

**काशीबाई** : महाराज मी आहें. मी नसायला पाहिजे पण मी आहें !

**बाजीराव** : कोण-तूं-तूं मृत्यू नव्हेस ?

**काशीबाई** : ( त्याच्याजवळ जाऊन ). असं काय अमंगल बोलायचं या तिन्हीसांजाच्या वेळीं ! मी आलें आहे-मला ओळखलं नाहीं का ?

**बाजीराव** : ओळखलं ! माझी धर्मपत्नी आहेस तूं ! जिच्याविषयींचं कर्तव्य मला पार पाडतां आलं नाहीं, ज्या साध्वीला मला सुख देतां आलं नाहीं ती माझी धर्मपत्नी आहेस तूं !

**काशीबाई** : माझी शपथ आहे असं कांहीं बोलाल तर ! आपल्या पायावर पडलें यांतच माझ्या आयुष्याची सार्थकता झाली.

**बाजीराव** : तूं आलीस, तूंच आलीस हें फार बरं झालं. मी सर्वांना कांहीं तरी दिलं, पण काशी, तुझ्यापासून मात्र मी सारं कांहीं हिरावून घेतलं !

क्षमा कर असं मी म्हणणार नाहीं, कारण त्या दोन शब्दांच्या उच्चारांत कांहीं अशी किमया नाहीं कीं हातांतून सुटलेले सुखाचे पक्षी त्यामुळें पुन्हा मणिबंधावर येऊन बसतील, स्वप्नांची उध्वस्त अमरावती पुन्हा उभी राहील! पण एवढं लक्षांत ठेव कीं तुझ्याप्रमाणं मीहि बंदीवान् होतों. आपण सारेच बंदीवान् होतों या अखेरच्या घटकेला—

**काशीबाई :** आतां एक अक्षर बोलाल तर बघा! तुम्हांला खरंच माझ्याबद्दल हें सारं वाटतं ना? मग माझं ऐकलं पाहिजे आतां.

**बाजीराव :** होय, तुझंच-फक्त तुझंच ऐकेन मी.

**काशीबाई :** मग मी सांगतें, असे वेडे वांकडे शब्द तोंडांतून काढायचे नाहींत, तसे विचारहि मनांत आणायचे नाहींत! दक्षिणेंतून माझ्याबरोबर दोन वैद्य आले आहेत. ते आतां इकडे येतील. तोंपर्यंत अगदीं स्वस्थ, शांत पडून राहायचं!

[ बाजीरावाला बिछान्यावर झोंपवून त्याच्या अंगावर पांघरूण घालते. ]

## प्रवेश दुसरा

[ सातारचा राजवाडा. शाहू आणि छत्रपती प्रवेश करतात. ]

**प्रतिनिधी :** जो वर्तमानकाळ होता त्याचा भूतकाळ झाला. जें राजकारण होतं त्याचा इतिहास झाला. महाराज, आतां मनाला आवर घातला पाहिजे.

**शाहू :** मनाला आवर! पुत्रापेक्षां प्रिय आणि पाठच्या भावापेक्षां अधिक निष्ठावंत असा तो माझा पराक्रमी पेशवा मला सोडून गेल्यावर मनाला आवर कसा घालतां येईल? बाजीरावांची ती उमदी, हंसतमूख मूर्ती, ही वार्ता ऐकल्यापासून मला सारखी डोळ्यासमोर दिसत आहे; आत्मविश्वासानें ओथंबलेले त्यांचे शब्द कानाला सारखे ऐकूं येत आहेत!

प्रतिनिधी, आयुष्याच्या ऐन अमदानींत बाजीराव आम्हांला असे अपंग करून सोडून गेले ही बातमी अद्यापही खरी वाटत नाहीं!

**प्रतिनिधी** : महाराज, राज्याच्या कल्याणाची धुरा ज्यांच्या खांद्यावरती आहे त्यांनीं शोकाच्या आवर्तांतून कर्तव्यबुद्धीनें बाहेर पडलं पाहिजे. फार दुःखदायक आहे; आपलंच नव्हे, माझंच नव्हे, तर साऱ्या देशाचं अंतःकरण चिरून, जाळून टाकणारी आहे. पण ही वार्ता म्हणजे एक सत्य आहे आणि सत्याचा स्वीकार करण्यांवाचून गत्यंतर नाहीं!

**शाहू** : होय,सत्यच आहे! साऱ्या राजधानीवर स्मशानाची कळा पसरली आहे, ओसाड निर्जन रस्ते धरणीवर अंग टाकून दिलेल्या माणसासारखे दुःखाकूल दिसत आहेत! हें सत्य आहे, महाराष्ट्राच्या अभागी राजा, कपाळकरंटं पण हें सत्यच आहे!

**प्रतिनिधी** : स्वामी, बाजीराव मनाचे खंबीर होते. स्वतःच्या कल्याणा-पेक्षा दौलतीच्या कल्याणाची चिंता त्यांना अधिक होती. त्यांचं अनुकरण आपण मागं राहणाऱ्यांनीं केलं पाहिजे. ताबडतोब पुण्याला दूत रवाना करून चिमाजी आणि नानासाहेब यांना इथं बोलावून घ्यावं. नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रं देण्यास विलंब होतां कामा नये.

**शाहू** : होय, चला, नानासाहेबांना पेशवाईचीं वस्त्रं घ्यायला पाहिजेत, कारण...बाजीराव वारले! बाजीराव वारले!

[ दोघेहि आंत जातात. ते जात असतांनाच 'वारले? बाजीराव वारले?' ही मस्तानीची किंकाळी पडद्यामागून ऐकूं येऊं लागते. ]

# प्रवेश तिसरा

[ पर्वतीच्या बागेंतून पळालेली मस्तानी पुणें शहराजवळील एका लहानशा गांवीं मुक्कामाला आलेली आहे. एका लहानशा डेऱ्यांमध्यें अत्यंत प्रक्षुब्ध होऊन ती उभी आहे. समोर दोन

दासी खालीं मान घालून आणि पदरानें डोळे टिपीत उभ्या आहेत. ]

**मस्तानी** : वारले? बाजीरावसाहेब वारले? चांडाळणी, मस्तानीच्या हाताशीं जंबिया आहे हें तूं विसरलीस. पुन्हा त्या अमंगलाच्या उच्चार कर, ता पापी जीभ मुळापासून छाटून टाकीन!

**दासी** : बाईसाहेब—

**मस्तानी** : तूं रडतेस? ( भांबावल्याप्रमाणें ) बाहेरूनही रडण्याचे आवाज माझ्या कानावर येत आहेत. खरंच, खरंच गेलें बाजीराव!

**दासी** : मराठ्यांचीं सारी दौलत आज अनाथ झाली!

**मस्तानी** : बाजीराव गेले! ( रडूं लागते ) माझा पराक्रमी मराठा मला भेटल्याशिवाय निघून गेला! सरकार, तुमच्या नांवाचा घोष करीत, अन्नपाणी वर्ज करून दोन महिने कारागृहांत काढले आणि शेवटीं प्राणांचे पंख करून, कैदखाना ओलांडून, तुमच्या दर्शनासाठीं एखाद्या पांखरासारखी आकाश झांपीत बाहेर आले...आणि तुम्ही, तुम्ही माझा असा विश्वासघात केलांत! कुठं शोधूं मी माझ्या बादशहाला! ( हुंदके देत कोचावर पडते. )

**दासी** : बाईसाहेब, सर्वांनाच हें दुःख आहे—

**मस्तानी** : ( एकदम आवेगानें उठून ) चांडाळणींनो, रडतां कां म्हणून! मीसुद्धा रडतें आहे! नाहीं, माझ्या साहेबाला हें आवडायचं नाहीं! मस्तानी रडायला लागली हें बाजीरावांना कोणीं सांगितलं तर—तर ते काय म्हणतील–ठाऊक आहे? ते म्हणतील, ही रडणारी मस्तानी माझी नाहीं! बाजीरावाची मस्तानी अशी रडत नसते. जा बाहेर जा साऱ्याजणीं—

**दासी** : काय करणार बाईसाहेब तुम्ही?—

**मस्तानी** : काय करणार? खुळ्यांनो, मस्तानीच्या सहवासांत राहूनहि तिचं मन ओळखलं नाहीं तुम्ही! जा म्हणतेना –( दोघी दासी जातात ) काय करणार? माझ्या बादशहाला भेटण्यासाठीं मी स्वर्गाला जाणार! जिवापलीकडे जतन करून जवळ ठेवलेली ही विखाराची चिमुट माझ्या राजाकडे मला घेऊन जाईल!

[ पाण्यानं भरलेल्या एका पेल्यांत वीष टाकते आणि पेला उचलत. तेवढ्यांत समशेर एक छोटी तरवार घेऊन धांवत येतो. मस्तानी चटकन पेला खालीं ठेवून त्याच्याकडे वळते. ]

**मस्तानी** : समशेर ! माझा-समशेर-कसा आलास तूं इकडे !

**समशेर** : आप्पासाहेबांनी शिलेदार सोबतीला देऊन मला इकडे पाठवलं ! आई, आमची ही नवी तरवार पहा !

**मस्तानी** : (स्वतःशीं) पर्वतीच्या बागेतून मी बाहेर पडलें हें आप्पासाहेबांना समजलेलं दिसतं. ते रागावले नाहींत...आणि आतां रागावणार कशासाठीं, कुणासाठीं !

**समशेर** : खास आप्पासाहेबांनीं आम्हाला दिली ही तरवार—

**मस्तानी** : ( अश्रू पुसून टाकून हंसते ) समशेर, माझ्या लाडक्या... पाहूं तुझी नवी तरवार ! किती सुंदर आहे रे !

**समशेर** : साहेबदेखील मला एक तरवार देणार आहेत. कधीं जायचं ग साहेबांकडे आपल्याला ?

**मस्तानी** : ( हुंदका आवरते ) बाळ, आतां मी एकटीच साहेबांकडे जाणार आहे अं. तुला वाड्यांत राहिलं पाहिजे.

**समशेर** : नाहीं जा. मी नाहीं—

**मस्तानी** : ( कठोरपणानं ) नाहीं ?

**समशेर** : राहीन मी आई !

**मस्तानी** : शहाणा बाळ माझा ! ( त्याला जवळ घेऊन कुरवाळते ) वाड्यांत रहायचं, वडीलधाऱ्यांचं, आप्पाचं, नानाचं नेहमी ऐकायचं. दादाशी, भाऊशीं कधीं भांडायचं नाहीं. लक्षांत राहील ना हें ?

**समशेर** : हो !

**मस्तानी** : माझ्या चिमुकल्या राजा, तुझ्या वडलांचं नांव काय रे ?

**समशेर** : बाजीराव !

**मस्तानी** : तुझ्या देशाचं नांव काय ?

**समशेर** : महाराष्ट्र !

**मस्तानी** : शाबास ! तुझ्या जातीचं नांव काय ?

**समशेर :** हिंदु...नाहीं...मुसलमान—

**मस्तानी :** वेडा ! समशेरबहाद्दर असं वेड्यासारखं बोलणार नाहीं कधीं ! काय तुझ्या जातीचं नांव ?

**समशेर :** माझ्या जातीचं नांव—

**मस्तानी :** ही दौलत कुणाची आहे ?

**समशेर :** मराठ्यांची ! आई, माझ्या जातीचं नांव मराठा !

**मस्तानी :** शाबास ! आणि तुझ्या आईचं नांव रें ?

**समशेर :** तूं !

**मस्तानी :** मी ? होय, या मोठ्या नांवांच्या प्रभावळींत तुझ्या आईच्या नांवाला जागा नाहीं ! आतां जा, शिलेदाराबरोबर ताबडतोब जा. जा—मी सांगितलेलं विसरूं नकोस. [ समशेरला एकदां जवळ घेतें, नंतर तो जातो. ]

**मस्तानी :** बाजीरावसाहेब, या दिरंगाईबद्दल माफी करा. मस्तानी आई होण्यासाठीं जन्माला आलेली नाहीं ! सोन्याच्या कंकणासारखी तुमच्या जीवनांत रुणझुण करण्यासाठीं मी जगांत आलें आहे. आणि तरी सुद्धां...पण आतां नाहीं दिरंगाई करणार ! समशेरबहाद्दरसुद्धा बाजीरावचा पुत्र आहे, त्याची काळजी करण्याचं मला काय कारण ? आप्पांनीं त्याच्या कमरेला समशेर बांधली आहे. ती समशेरच त्याचं रक्षण करील. पराक्रमी पुरुषा, अब्दागिरीसारखी माझ्या सौंदर्याची सावली सतत तुझ्या शिरावर धरली, पृथ्वीवरच्या प्रवासांत वाऱ्याची लहर होऊन तुझ्या भोंवतीं खेळत राहिलें, अश्विनीचं चांदणं होऊन तुझ्यावर बरसत राहिलें, मद्याच्या पेल्यावरील तरंग होऊन तुला विसावत आलें ! राया, स्त्रीला करतां येण्यासारखं होतं तें तुझ्यासाठीं केलं, आता जीवनाचे धागे तुटले म्हणून तुझ्यापासून दूर होऊं ? ( पेला उचलून विषप्राशन करूं लागते. ) दूर ? नाहीं, मस्तानी बाजीरावापासून केव्हांही दूर व्हायची नाहीं ! मरणाचा पाऊस पडला, शतकांच्या राशी वाहून गेल्या तरी विशाखा नक्षत्रांतील दोन चांदण्या कधीं दूर होतील कां !

[ चिमाजी, दासी वगैरे प्रविष्ट ]

**चिमाजी :** मस्तानीबाईसाहेब, काय करतां हें ! ठेवा तो पेला खालीं—

**मस्तानी** : पेला रिकामा झाला आहे, आप्पासाहेब, पेला रिकामा झाला आहे! त्या प्रखर विषानं मस्तानीच्या काळजाला हात घातला आहे!

**चिमाजी** : पार्वती, वैद्याला बोलाव ताबडतोब—

**मस्तानी** : ( आवेशानें ) खबरदार पार्वती, एक रेसभर हालशील तर भावजी–होय आप्पासाहेब, या शेवटच्या घटकेला मी तुम्हांला भावजी म्हणणार आहे–भावजी, मला वाचवायचा प्रयत्न करूं नका. पर्वतीच्या कैदखान्यांतून मी बाहेर पडलें म्हणून तुम्हीं रागावलां असाल. पण आतां तुम्हांला समजून येईल कीं त्या लहानशाच नव्हे तर या मोठ्या कैदखान्यांतून सुद्धां माझ्या बाजीरावासाठीं मी बाहेर जात आहें! उण्याअधिकाची माफी करा—

**चिमाजी** : माफी तुम्ही करायची. रावसाहेबांचं कळल्यापासून अंत:करण सारखं पिंजून निघत आहे. त्यांत नेहमीचा आजार विकोपाला जाऊं लागला. पण शेवटीं तुमची रावसाहेबांची भेट आम्ही होऊं दिली नाहीं–म्हणून बिछान्यावरून उठून तुमच्याकडे आलों. वाटेंतच या प्रकाराची वार्ता समजली. मलाहि आतां अधिक बोलवत नाहीं. झाल्या गेल्याबद्दल तुम्हीच मला उदार मनानं क्षमा करा!

**मस्तानी** : ( कोचावर रेलते ) क्षमा! भावजी, माझी कसली क्षमा मागतां? मराठी राज्याचे मोठे अधिकारी तुम्हीं; एका यःकश्चित कंचनीची क्षमा मागूं नका! तुम्हीं केलं तें दौलतीसाठीं केलं, पेशव्यांच्या हितासाठीं केलं हें का मला कळत नाहीं? माझी माफी मागूं नका. मी मोठी होतें पण ती फक्त बाजीरावांच्या महालांत, मी राणी होतें ती फक्त बाजीरावांच्या ज[illegible]ांत, मी देवता होतें ती फक्त त्या देवाच्या पायाशीं! हें माझं मोठेपण अभंग ठेवण्यासाठींच मी माझ्या मराठ्याकडे जात आहे!...जातें मी... असें कष्टी होऊं नका, आसवं गाळूं नका!...अमोल आनंदाची घटका आ[illegible] ही! आनंद, आनंद भरला आहे सगळ्या दिशांतून!...मोहरलेल्या मांडवाखाल[illegible] एखाद्या सुगंधाच्या लहरीसारखीं मी चाललें आहे. आलें मी...सरकार... आलें...माझ्या डोळ्यांत आसवं असलीं तरी तीं सुखाचीं आहेत. मी रड[illegible] नाहीं, माझ्या वीराबरोबर स्वर्गारोहण करताना मी हंसत–आ[illegible]

स्तानासारखी हसत आलें आहे! चला खाविंद, आपल्या अनंत ासाला सुरवात झाली! पांढरा शुभ्र पोशाख करून आपण आपल्या ावडत्या अबलग घोड्यावर स्वार व्हा..... आणि मी तुम्हांला आवडणारा पोशाख करून माझ्या सारंगावर स्वार होतें!.. मी तुम्हाला सांगितलं नाहीं , कीं तुमच्या रिकिबीच्या बरोबर माझ्या रिकिबी राहतील म्हणून? रेसभर माझा सारंग मागे राहणार नाहीं!...झालांत स्वार? चला... ासारख्या चांदण्यांतून...रुपेरी मेघावरून.. तारकांचीं फुलं खुडीत क्षितिजावरील किनखापी झालरी बाजूला सारीत...माझ्या बाजीरावा, आपण दोघं...आपण दोघं .. तुफान ..वे...गा.. नं...

[ कोसळून मागे पडते ]

: पडदा :.

स मा प्त

२५९८ ७१८३

IRBK-0102598

IPBr-0102598

IRBK-0102598